महाराष्ट्राचे शिल्पकार

# अनंत भालेराव



नरेन्द्र चपळगावकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार

# अनंत भालेराव

नरेन्द्र चपळगावकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

**महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. ३४**

प्रथमावृत्ती : ऑक्टोबर, २०१२

**प्रकाशक :**

सचिव,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

रवींद्र नाट्यमंदिर इमारत, २रा मजला,

सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

© प्रकाशकाधीन

**मुद्रक :**

व्यवस्थापक,

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,

मुंबई ४०० ००४.

**किंमत :** रु. ६२/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या चरित्र मालेमध्ये मराठवाड्याचे आणि महाराष्ट्राचे सुपुत्र अनंतराव भालेराव यांचे चरित्र प्रकाशित करण्याचा योग येत आहे याचा मला आनंद वाटतो. अनंतराव भालेराव हे मराठवाड्यात जन्मले, वाढले व तेथेच त्यांचे कर्तृत्व बहरले. मराठवाड्याचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इतिहास लक्षात घेताना अनंतरावांच्या नावाने कोणालाही विस्मरण होणे शक्य नाही. निजामशाहीतून महाराष्ट्रामध्ये मराठी राज्यामध्ये मराठवाडा सामील झाला, तो सर्व कालखंड अनंतरावांनी प्रत्यक्ष अनुभवला, त्या काळातील अनेक महत्त्वाच्या घडामोडींचे ते केवळ साक्षीदार नव्हते तर त्यामध्ये त्यांनी सक्रिय भाग घेतलेला होता. मराठवाडा हा गोदावरीसारख्या पवित्र लोकमातेच्या काठच्या संतांचा प्रदेश. त्या प्रदेशाला सात्त्विकतेचे आणि सुसंस्कृतपणाचे लेणे मुळातच लाभले आहे. मराठी भाषेचा अस्सल अभिमान मराठवाड्यामध्ये प्रकर्षाने आढळून येतो. अशा या मराठवाड्याची सुसंस्कृत सात्त्विकता आणि हृदयाचा मोठेपणा अनंतरावांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये काठोकाठ भरलेला होता. तो मोठेपण त्यांनी हाती घेतलेल्या प्रत्येक कार्यातून दिसून आलेला आहे.

अनंतराव भालेराव हे मराठवाडा वृत्तपत्राचे संपादक होते. त्यांची पत्रकारिता ही टिळक, आगरकर यांच्या पठडीतली पत्रकारिता 'वज्रादपि कठोराणी, मृदुनि कुसुमादपी' अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वासारखी त्यांची पत्रकारिताही होती. तिची समाजाशी असलेली नाळ अनंतरावांनी कधी तुटू दिली नाही. म्हणूनच त्यांच्यातील कार्यकर्ता सदैव समाजासाठी विविध रूपाने राबत राहिला. आपली पत्रकारितासुद्धा त्यांनी कार्यकर्त्याच्या भूमिकेतून निभावली. समग्र समाजाच्या भल्याचे पक्के भान असलेले अनंतराव हे एक आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व होते. समाजासाठी विविध पातळ्यांवर कार्य करताना त्यांनी सामान्य माणूस नजरेआड होऊ दिला नाही आणि अखेरपर्यंत त्यांची वाणी आणि लेखणी समाजासाठी कार्यरत

राहिली. मराठवाड्याने जी अनेक दिगंत स्वरूपाची व्यक्तिमत्त्वे महाराष्ट्राला दिली त्यातील अनंतरावांचे व्यक्तिमत्त्व हे अजोड स्वरूपाचे होते असे म्हणता येईल.

अनंतराव भालेरावांसारख्या व्यक्तीचे चरित्र लिहिण्यासाठी तशाच महत्त्वाच्या लेखकाची आवश्यकता होती. न्या. नरेंद्र चपळगावकर यांनी अनंतरावांचा जीवनपट जवळून पाहिला होता ते त्यांचे निकटचे स्नेही होते. त्यांच्यासारख्या लेखकांने अनंतरावांचे चरित्र लिहिण्यासाठी मान्यता दिली याचा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला अभिमान वाटतो. त्यांच्या साक्षेपी लेखणीतून उतरलेले अनंतराव भालेरावांचे हे चरित्र वाचकांना रोचक वाटेल असा मला विश्वास वाटतो.

**मधु मंगेश कर्णिक,**

**अध्यक्ष,**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

स्थळ : मुंबई,

दिनांक : ६ ऑक्टोबर २०१२.

# लेखकाचे मनोगत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या मालेत एक झुंजार पत्रकार व दैनिक मराठवाड्याचे संपादक अनंत भालेराव यांचे चरित्र आज प्रकाशित होत आहे. हे लिहून मराठीतील या थोर पत्रकाराचे पुण्यस्मरण करण्याची संधी साहित्य संस्कृती मंडळाने मला दिली याबद्दल मंडळाचे मन:पूर्वक आभार मानले पाहिजेत.

पत्रकारिता हा जेव्हा एक व्यवसाय नव्हता, आपले विचार प्रसृत करण्याचे व समाजाला मार्गदर्शन करण्याचे ते एक साधन होते अशा काळात घडलेल्या महाराष्ट्रातील त्या परंपरेचा शेवटचा पाईक मानता येईल अशा या पत्रकाराचे चरित्र महाराष्ट्राला अभिमान वाटावा अशा ध्येयवादी पत्रकारितेचे स्मरण वाचकांना करून देईल असा मला विश्वास आहे.

समाज मार्गदर्शकाने सर्व मोह बाजूला सारून व्रतस्थ राहावयाचे हे कठीण असते. अनंतरावासारख्यांना हे जमू शकले याचे एक कारण त्यांच्या संसार करणाऱ्या सुशिलाबाईसारख्या गृहीणींनी स्वत:ही समृद्धीचा सोस धरला नाही आणि पतीसारखेच जीवन स्वीकारले. अनंतरावांना आयुष्यभर सुख-दु:खाच्या सर्व प्रसंगात साथ देणाऱ्या सुशिलाबाई भालेरावांच्या स्मृतीला हे पुस्तक म्हणूनच अर्पण केले आहे.

**नरेन्द्र चपळगावकर**

सुशीलाबाई अनंत भालेराव
यांच्या स्मृतीस

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| (१) | मराठवाडा : प्रदेश आणि वृत्तपत्र | ... | १-८ |
| (२) | जडणघडण | ... | ९-२२ |
| (३) | राजकीय जागृतीच्या कामात | ... | २३-३४ |
| (४) | अहिंसकांची शस्त्रसंगत | ... | ३५-४६ |
| (५) | नव्या पक्षाचा प्रयोग आणि पत्रकारितेचा प्रारंभ | | ४७-५८ |
| (६) | राज्यपुनर्रचना | ... | ५९-६८ |
| (७) | नवी मांडामांड आणि नव्या चळवळी | ... | ६९-८४ |
| (८) | नवे प्रश्न, नवे संघर्ष | ... | ८५-१०२ |
| (९) | शेवटचे पर्व | ... | १०३-११५ |

# १. मराठवाडा : प्रदेश आणि वृत्तपत्र

अठराव्या शतकाच्या प्रारंभी औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दिल्लीतील मोगली सत्तेला उतरती कळा लागली. केंद्रीय सत्ता दुर्बल झाल्याचा फायदा घेत मोगलांचा दक्षिणेतील सुभेदार असलेल्या मीर कमरुद्दीन याने मोगलांचे वर्चस्व झुगारून दिले व इ.स. १७२४ मध्ये आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. कमरुद्दीनच्या घराण्याला आसफजाही घराणे व राजाला आसफजाह संबोधले जाई. सामान्य परिभाषेत आसफजाही राजांना निजाम म्हणून ओळखले जाते. आसफिया घराण्याची ही राजवट स्थिर झाली तेव्हा विदर्भाचे अमरावती, अकोला, बुलढाणा आणि यवतमाळ हे चार जिल्हे आणि मराठवाडा या नावाने ओळखला जाणारा औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, परभणी आणि नांदेड या तत्कालीन पाच जिल्ह्यांचा प्रदेश असा मोठा मराठी भाग त्या राज्यात समाविष्ट होता. अठरावे शतक संपत असताना निजामाने इंग्रजांचे मांडलिकत्व स्वीकारले. गैरकारभारामुळे कर्जबाजारी झालेल्या निजामाला ब्रिटिश सावकाराकडून जबरदस्त व्याजाने कर्ज घ्यायला लावून त्याच्या फेडीसाठी विदर्भाचे चार जिल्हे ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घेतले आणि ते कधीच परत केले नाहीत. मराठवाडा मात्र शेवटपर्यंत निजामाच्या ताब्यात राहिला आणि राजकीय पारतंत्र्याबरोबरच सांस्कृतिक पारतंत्र्यही भोगत राहिला.

विदर्भ वगळून उरलेल्या हैदराबाद संस्थानात तेलगू बहुभाषिक असलेला तेलंगण, मराठी बहुभाषिक असलेला मराठवाडा आणि कर्नाटकाचा काही भाग असे तीन वेगवेगळे प्रदेश होते. तेलंगण आठ जिल्ह्यांत, मराठवाडा पाच जिल्ह्यांत आणि कर्नाटक सुमारे तीन जिल्ह्यांत विस्तारलेला होता. यापैकी कोणत्याही विभागात उर्दूभाषिकांची बहुसंख्या नव्हती. लोकसंख्येपैकी बारा-तेरा टक्के असलेल्या मुस्लिमांचीच फक्त उर्दू ही मातृभाषा होती; परंतु ती राजाची भाषा असल्यामुळे राज्यकारभार

त्याच भाषेत होई. प्राथमिक शिक्षण वगळता माध्यमिक आणि उच्च शिक्षण उर्दूतच घेता येई. सर्वत्र उर्दूची सक्ती होती. अल्पसंख्य असलेल्या मुस्लिमांना सरकारी नोकऱ्यात प्राधान्य होते व जवळपास ८० टक्के नोकऱ्या त्यांनाच मिळत. आपले राज्य हे मुस्लिम संस्कृती आणि उर्दू भाषा यांचे केंद्र असले पाहिजे या आग्रहापोटी सर्वसामान्य जनतेचा धर्म, संस्कृती आणि भाषा यांना दाबून टाकण्यात आले होते. हिंदू धार्मिक किंवा सांस्कृतिक तसेच मराठी, तेलगू किंवा कन्नड भाषिक संस्थांना राजाश्रय तर नव्हताच; पण त्यांना काम करणेही कठीण होते. राजकीय संस्था स्थापन करण्याला बंदीच होती. खासगी शाळा काढणेही कठीण होते. छापखाना किंवा वृत्तपत्र सुरू करण्याची परवानगी हैदराबादला जाऊन थेट मंत्रिमंडळाकडून मिळवावी लागत असे व शक्यतो ती मिळत नसे. हिंदूंच्या उत्सवाला परवानगी घ्यावी लागे, देवळाची डागडुजी करू नये असे काही हुकूमही अस्तित्वात होते. हिंदू आणि मुस्लिम सण एकाच काळात आले तर हिंदूंनी आपले उत्सव शक्यतो खासगीपणे व वाद्य न वाजवता उरकून घ्यावेत असा सरकारचा आदेश असे. बहादूरयारजंग यांच्यासारख्या कडव्या नेत्याने 'इतेहादुल् मुस्लमीन' या मुस्लिम राजकीय संघटनेचे नेतृत्व स्वीकारले त्या काळात तर धर्मांतराच्या कार्यासाठी चक्क एक सरकारी खातेच स्थापन झाले.

१९३५ च्या 'भारत सरकार कायद्या'ने ब्रिटिश अमलाखालील भारतात प्रांतिक स्वायतत्ता प्रारंभ झाली. अनेक प्रांतात काँग्रेसची मंत्रिमंडळेही अस्तित्वात आली. मताधिकाराचा विस्तार झाला. लोकांच्या मतावर जर सरकार स्थापन झाले तर अल्पसंख्य असलेल्या मुसलमानांना हैदराबादेत सत्ता राखता येणार नाही याची कल्पना आल्यामुळे धर्मांतर करून मुस्लिमांची संख्या वाढवण्याचा प्रयत्नही झाला. दडपण आणून ज्यांना सक्तीने धर्म बदलण्यास भाग पाडता येणे सोपे होते ते होते दलित. अशा प्रयत्नांना राज्यसत्तेचे आणि सरकारी अधिकाऱ्यांचे पूर्ण साह्य असे. एवढे करूनही हिंदूंची प्रचंड बहुसंख्या आणि त्यांच्यावरील महात्मा गांधी आणि काँग्रेस यांच्या ब्रिटिश भारतात चाललेल्या चळवळीचा परिणाम यामुळे संस्थानात जबाबदार राज्यपद्धती स्थापन व्हावी व जनतेला राजकीय अधिकार मिळावेत ही आकांक्षा वाढतच राहिली.

अशा परिस्थितीत निजामी राज्यात वृत्तपत्रे किंवा नियतकालिके आणि तीही मराठीसारख्या लोकभाषेत चालवणे फारच अवघड होते. १८८२ साली 'औरंगाबाद समाचार' नावाचे एक साप्ताहिक औरंगाबाद येथे सुरू झाले. तसेच 'दक्षिणमित्र' नावाचे एक मासिकही औरंगाबादहून सुरू झाले. ऐतिहासिक माहिती, राज्य शासनाचे आदेश, काही कायद्यांची भाषांतरे असे विषय त्या मासिकात असत. ८ फेब्रुवारी १९०० पासून कृष्णाजी त्रिंबक जोशी यांनी संपादित केलेले व त्यांच्याच मालकीचे 'बीड समाचार' हे साप्ताहिक बीडहून प्रसिद्ध होऊ लागले. अंकाची तीन पाने मराठी तर एक पान उर्दू असे. चार वर्षे हे साप्ताहिक चालू होते. याशिवाय इतरही काही किरकोळ प्रयत्न झालेले दिसतात.

दीर्घकाळपर्यंत चाललेले आणि ज्यांनी मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासात नोंद घेण्यासारखी कामगिरी केली असे पहिले वृत्तपत्र म्हणजे 'निजाम विजय' लक्ष्मणराव फाटक यांच्या मालकीचे हे वृत्तपत्र हैदराबादहून ११ नोव्हेंबर १९२० पासून प्रसिद्ध होऊ लागले. या साप्ताहिकाच्या संपादनात पुढे हैदराबाद स्वातंत्र्यलढ्याचे एक नेते झालेले दिगंबरराव बिंदू आणि राघवेंद्रराव शर्मा त्यांना मदत करीत. १९२० ते १९४८ अशी निजामी राजवटीची सुमारे २८ वर्षे (त्यातील सहा महिन्यांचा काळ वगळला तर) नियमित प्रकाशित होऊन व सरकारी अवकृपेला चुकवीत चुकवीत ; लोकांपर्यंत सामाजिक व राजकीय घडामोडींची माहिती पोहोचवण्याचा, या साप्ताहिकाने प्रयत्न केला. नाव 'निजाम विजय' दिले होते, सरकारच्याविरुद्ध कडक भाषा कधीच वापरली नाही, जाहीरपणे सरकारविरोधी राजकीय मतप्रदर्शनसुद्धा फारसे केले नाही, तरी याही मवाळ वृत्तपत्राला ऑगस्ट, १९२९ ते जानेवारी, १९३० या काळात आपले प्रकाशन सरकारने बंद ठेवावयास लावले. जाती-जातीत वैमनस्य पसरवण्याचा आरोप या पत्रावर सरकारने केला; परंतु खरे म्हणजे जातीयवाद्यांना आळा घाला अशी नम्र भाषेत विनंती फक्त या पत्राने केली होती. १९२९ ते १९३१ अशी दोन वर्षे 'नागरिक' नावाचे एक साप्ताहिक हैदराबादहून प्रसिद्ध होत होते. त्याच्याही संपादनात दिगंबरराव बिंदू हे सहकारी होते. सरकारने घातलेल्या बंदीमुळे हे पत्र बंद झाले.

ब्रिटिश राजवटीत वृत्तपत्रातील मजकूर राजद्रोही ठरवून वृत्तपत्र, लेखक आणि संपादक यांच्यावर खटले भरले जात. १९०८ पासून महाराष्ट्रात अनेक वृत्तपत्रांवर असे खटले भरण्यात आले आणि त्यांना कडक शिक्षाही देण्यात आल्या. 'केसरी', 'प्रतोद' अशा अनेक नियतकालिकांवर खटले होऊन त्यात शिक्षाही झाल्या होत्या. अशा खटल्यात मजकुरात राजद्रोह काय हे सिद्ध करावे लागत असे. निजामाचे धोरण असे की, वर्तमानपत्र निघूच द्यायचे नाही आणि निघालेलेच असेल तर त्यात काहीही अप्रिय आले की, ते वर्तमानपत्रच बंद करून टाकायचे. त्यामुळे राजद्रोहाचे खटले हैदराबाद संस्थानात फारसे झाले नाहीत. अपवाद फक्त आनंद कृष्ण वाघमाऱ्यांचा.

१९३५-३६ च्या काळात भारतातील इतर प्रांताप्रमाणेच आपल्या संस्थानातही जबाबदार राज्यपद्धती अमलात यावी, लोकांना जबाबदार असे शासन निर्माण व्हावे अशी संस्थानातील अनेक तरुणांच्या मनात इच्छा निर्माण होऊ लागली होती. संस्थानात राजकीय कार्य करण्यास बंदी असल्यामुळे स्टेट काँग्रेस अशा नावाची कोणतीही संघटना स्थापन करणे शक्यच नव्हते. परिस्थितीतून मार्ग काढावा या इच्छेने १,२,३ जून १९३७ रोजी त्यावेळच्या परभणी जिल्ह्यातील परतूर या जहागिरीच्या गावी, मराठवाड्यातील कार्यकर्ते एकत्र जमले व त्यांनी महाराष्ट्र परिषद या नावाची एक संघटना स्थापन केली. या अधिवेशनापासून मराठवाड्यात निजामाच्या एकछत्री व जुलमी राजवटीविरुद्ध लोकचळवळीला प्रारंभ झाला. 'महाराष्ट्र परिषद' याच नावाने काही काळ मराठवाड्यात राजकीय कार्य होत राहिले.

परतूरच्या अधिवेशनाचे एक अध्वर्यू होते आनंद कृष्ण वाघमारे. औरंगाबादजवळच्या सिंदोन गावचे कुलकर्णीपण वाघमाऱ्यांच्या घरात होते. वडील महसूल खात्यात शिरस्तेदार होते. वडील प्लेगने अचानक वारल्यामुळे सातवीपर्यंत झालेले शिक्षण थांबवून, वाघमाऱ्यांनी मिळेल ती नोकरी स्वीकारली. रेल्वेतील ही नोकरी पुढे त्यांनी सोडून दिली आणि ते औरंगाबादला आले. एका विधवेशी विवाह केला आणि राजकीय चळवळीत स्वतःला झोकून दिले. वाघमारे आणि अनंतराव कुलकर्णी यांनी संयुक्तपणे 'महाराष्ट्र संघ' या नावाची राजकीय कार्यकर्त्यांची एक संघटना स्थापण्याचा प्रयत्न सुरू केला होता; परंतु नंतर परतूरच्या अधिवेशनात 'महाराष्ट्र परिषद' या

नावाची संघटना स्थापन करण्याचे ठरले तेव्हा 'महाराष्ट्र संघ' त्यातच विलीन झाला. वाघमारे हे मराठवाड्यातील राजकीय संघटनेचे पहिल्या संस्थापकापैकी एक मानले पाहिजेत.

लोकजागृतीसाठी वृत्तपत्राचे महत्त्व वाघमाऱ्यांनी ओळखले होते. स्वतः वृत्तपत्र सुरू करण्याचा त्यांचा प्रयत्न होताच. अर्थात हैदराबाद संस्थानात वृत्तपत्र सुरू करणे ही फार अवघड गोष्ट होती. स्वतःचे वृत्तपत्र सुरू होण्यापूर्वी हैदराबाद संस्थानातील लोकस्थितीची ओळख, संस्थानाबाहेरील जनतेला व्हावी यासाठी त्यांनी महाराष्ट्र, लोकशक्ती अशा संस्थानाबाहेरील व 'निजाम विजय' या संस्थानातील वृत्तपत्रातही लेख लिहिले. 'हैदराबाद संस्थानातील लोकस्थिती' हा पाच हप्त्यात प्रसिद्ध झालेला त्यांचा दीर्घ लेख, अधिकृत आकडेवारीच्या आधाराने हैदराबाद संस्थानातील सामाजिक व राजकीय स्थिती स्पष्ट करणारा आहे. हा लेख पुढे पुस्तिकारूपाने प्रसिद्ध करून संस्थानातही वितरित करण्यात आला. संस्थानात शिक्षण आणि वैद्यकीय मदतीच्या अपुऱ्या सोयी, मराठीला होणारा उर्दूचा सासुरवास, निजामाचे धर्मवेड आणि पैशाचा हव्यास, राजकीय व धार्मिक हक्कांची अवहेलना इत्यादी बाबींकडे वाघमाऱ्यांनी लक्ष वेधले आहे.

महाराष्ट्र परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या निमित्ताने 'ऊठ, महाराष्ट्रा ऊठ' या शीर्षकाचा त्यांचा एक लेख 'निजाम विजय'मध्ये प्रसिद्ध झाला आहे. या लेखात तरुणांनी आणि शेतकऱ्यांनी परतूरला यावे आणि आपल्या भवितव्याचा विचार करावा असे आवाहन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र परिषदेपुढील कार्य' या शीर्षकाच्या आणखी तीन लेखात वाघमाऱ्यांनी संस्थानातील कार्यकर्त्यांसाठी राजकीय कार्याची दिशा सांगितली आहे. वाघमाऱ्यांचे विचार हे तत्कालीन परिस्थितीत अत्यंत जहाल होते. इतर वृत्तपत्रांत ते प्रसिद्ध करणे फार काळ शक्य झाले नसते. त्यासाठी स्वतंत्र व स्वतःचे वृत्तपत्र हवे होते. 'मराठवाडा' या नावाने वाघमाऱ्यांनी एक साप्ताहिक सुरू केले. १० फेब्रुवारी १९३८ रोजी 'मराठवाडा'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. मराठवाडा खुद्द निजाम राज्यात छापणे आणि प्रसिद्ध करणे शक्यच नव्हते, त्यामुळे तो पुण्याला छापून संस्थानात पाठवला जाऊ लागला. अंक प्रसिद्ध झाल्यानंतर

लगोलग त्यावर बंदी आली. वाघमाऱ्यांनी बंदीतून मार्ग काढण्यासाठी वृत्तपत्राचे नाव बदलण्याची युक्ती योजिली. बंदी आली की नवे नाव आणि नव्या नावावर बंदी आली की आणखी वेगळे नाव असा क्रम सुरू झाला. अवघ्या एक वर्षात 'मराठवाडा', 'नागरिक', 'संग्राम', 'रणदुंदुभी', 'समरभूमी', 'हैदराबाद स्वराज्य', 'मोगलाई', 'कायदेभंग', 'सत्याग्रह', 'कायाकल्प' व 'संजिवनी' अशा अकरा नावांनी 'मराठवाडा' वर्षभरात प्रसिद्ध झाला. 'संजिवनी'पत्र अग्रलेखाशिवाय छापले जाऊ लागले तेव्हा त्यावर काही काळ बंदी आली नाही. मराठवाडा वृत्तपत्राची पार्सले संस्थानात रेल्वेने येत व महत्त्वाच्या स्टेशनात आऊटर सिग्नलजवळ ती टाकून दिली जात. कार्यकर्ते ती घेऊन जाऊन हातोहात वितरित करीत. शेवटी सरकारने वाघमाऱ्यांवर राजद्रोहाचा खटला भरला आणि त्यात त्यांना दीड वर्षांची शिक्षा झाली. स्वातंत्र्याची पहाट जवळ आली तेव्हा १९४६-४७ च्या सुमाराला या वृत्तपत्राचा पुनर्जन्म झाला.

वाघमाऱ्यांचे राजकीय विचार अतिशय स्पष्ट होते. 'महाराष्ट्र' वृत्तपत्रात ९ सप्टेंबर १९३७ रोजी प्रसिद्ध झालेल्या 'निजामशाहीत सभास्वातंत्र्याची गळचेपी' या आपल्या लेखात संस्थानात कायदेभंगाची चळवळ सुरू केली पाहिजे, त्याशिवाय गत्यंतर नाही हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. 'सरकारच्या अरेरावीमुळे उद्दीपित होणाऱ्या तरुणांच्या कर्तृत्वशक्तीचा ओघ कायदेभंगासारख्या शांततेच्या मार्गाकडे वळवला जाणे आज अत्यंत आवश्यक आहे' असे वाघमाऱ्यांचे प्रतिपादन आहे. आपली ही चळवळ ताबडतोब यशस्वी होईल असा त्यांना भ्रम नाही. 'चळवळ पूर्णपणे यशस्वी न झाली तरी दुःखाचा उसासा टाळण्याची शक्यता निर्माण होण्याइतका आजच्या परिस्थितीत बदल हा खात्रीने होईलच' असा त्यांना विश्वास आहे. लोककल्याणाच्या आणि सोयीच्या दृष्टीने मराठवाड्यातील सरकारी कार्यालयांचे व्यवहार मराठीतून चालावे असा ठराव मराठवाडा साहित्य संमेलनाने संमत केला होता. त्याला विरोध करताना सरकारने दिलेल्या थातुरमातुर उत्तराची आणि उर्दूच्या त्यातील समर्थनाची वाघमाऱ्यांनी कडक शब्दांत हजेरी घेतली आहे.

हैदराबाद स्टेट कॉंग्रेसवर, स्थापण्याच्या दिवशीच, हैदराबाद सरकारने बंदी घातली होती. त्याविरुद्ध लोकमत व्यक्त करण्यासाठी 'स्टेट कॉंग्रेस दिन' साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी यांनी काय करावे आणि या एका दिवशी सरकारशी कोणताही व्यवहार कसा करू नये याचा विस्तृत कार्यक्रमच वाघमाऱ्यांनी सांगितला आहे. चळवळीच्या काळात वृत्तपत्र कसे असावे याचा उत्तम आदर्श दादा वाघमाऱ्यांनी 'मराठवाडा' आणि त्याचे विविध अवतार यांच्या माध्यमातून आपल्यासमोर ठेवला आहे.

आ. कृ. वाघमारे यांच्या राजकीय हक्कांच्या आग्रहाबरोबरच मराठी भाषा व वाङ्मय याबद्दलची त्यांची आस्था त्यांच्या संपादकीय कार्यातील महत्त्वाचा भाग होती. स्वतः वाघमाऱ्यांचे फारसे शिक्षण झाले नव्हते तरीही त्यांचे मराठी व इंग्रजी वाचन उत्तम होते. त्यांची वाङ्मयीन समजही चांगली होती. मराठवाड्यात विपुल असलेल्या प्राचीन वाङ्मयाचे संपादन व पुनर्मुद्रण करण्यासाठी एक मासिक काढण्याची त्यांची योजना होती. मुद्रणालय व नियतकालिक या दोन्हींसाठी सरकारची परवानगी आवश्यक असे. वाघमाऱ्यांनी मित्र आणि भाऊ यांच्या नावे त्यासाठीचे अर्ज दिलेले असतानाही त्यांना परवानगी नाकारण्यात आली. 'मराठवाडा' सुरू झाल्यानंतर एक विशेष पुरवणी काढून त्यांनी मराठवाड्यातील त्या काळच्या महत्त्वाच्या लेखकांचे निवडक साहित्य प्रकाशित केले होते. १९३९ साली नांदेडला दुसरे निजाम प्रांतीय मराठी साहित्य संमेलन भरले. त्यावेळी वाघमाऱ्यांनी लिहिलेल्या अग्रलेखात संस्थानातील मराठी भाषा आणि साहित्य यांची शासकीय धोरणामुळे होणारी होरपळ जशी सांगितली तशीच साहित्य संस्थांना त्यांनी करावयाच्या कर्तव्याची आठवणही करून दिली. 'मराठी भाषा बोलणारांची संख्या घटत असताना व मराठी भाषेला जगणे अशक्य होत असताना आमची साहित्य संमेलने व परिषदा मोठ्या कडाक्याच्या वादविवादानंतर फार तर एखादा ठरावच पास करणार काय? त्यासाठी त्यांनी सत्याग्रह करावा असे मी म्हणत नाही; पण यासाठी चौकशी करणे, साधार माहिती गोळा करणे, ती पत्राद्वारे व शिष्टमंडळाद्वारे सरकारपुढे मांडणे, प्रचार करणे इत्यादी अनेक गोष्टी करावयास उत्कट इच्छेशिवाय कसली अडचण आहे?' असा प्रश्न वाघमाऱ्यांनी विचारला आहे.



एन ४०५८-२

भारताला स्वातंत्र्य मिळाले तरी हैदराबाद मात्र निजामाच्या जोखडात कायमच होते. चळवळीचे शेवटचे पर्व त्यानंतर सुरू झाले. 'मराठवाडा' पत्राची आता तर अधिक आवश्यकता होती. १९ मार्च १९४८ रोजी 'मराठवाडा'चा पुनर्जन्म झाला आणि मुंबईतून तो प्रसिद्ध होऊ लागला. आचार्य अत्र्यांनी त्यांच्या नवयुग मुद्रणालयात तो छापून देण्याची जबाबदारी घेतली होती. पोलीस ॲक्शन झाल्यानंतर लगोलग म्हणजे ऑक्टोबर १९४८ पासून 'मराठवाडा' हैदराबादहून प्रसिद्ध होऊ लागला. १९५३ साली अनंतरावांना संपादक करून वाघमारे निवृत्त झाले आणि पुढे 'मराठवाडा' हे वृत्तपत्र 'अनंत भालेरावांचा मराठवाडा' या नावाने ओळखले जाऊ लागले आणि अनंतराव 'मराठवाड्याचे संपादक अनंतराव' म्हणून महाराष्ट्रभर ओळखले गेले.

स्वातंत्र्य या मूल्याबद्दल अतुलनिष्ठा, समाजाविषयी प्रेम आणि भाषा, संस्कृती व साहित्य या विषयीची आस्था हे 'मराठवाडा' पत्राच्या संपादनातील विशेष हा दादा वाघमाऱ्यांचा वारसा होता. सुदैवाने मराठवाड्याचे, नंतरच्या काळात ज्यांनी संवर्धन केले त्या अनंतरावांचा पिंडही याच गुणावर पोसलेला होता.

# २. जडणघडण

सुमारे शंभर वर्षांपूर्वी औरंगाबाद जिल्ह्याच्या पश्चिम भागात म्हणजे वैजापूर, गंगापूर, कन्नड या टापूत एक प्रवचनकार आणि सत्त्वशील वारकरी म्हणून काशीनाथबुवा खंडाळकर ओळखले जात. त्यांच्याविषयी आदर आणि श्रद्धा बाळगणारा फार मोठा वर्ग या भागात होता. काशीनाथबुवांचे लग्न लहानपणीच झालेले आणि मन मात्र अध्यात्माची ओढ लागलेले. वयाच्या १३-१४ व्या वर्षी घरी न सांगताच काशीनाथ सरळ आळंदीला विष्णुबुवा जोगांच्याकडे गेला. त्याचवेळी बीड जिल्ह्यातल्या नेकनूर गावच्या बंकटस्वामी नावाने पुढे ओळखला गेलेला साधारण काशीनाथच्याच वयाचा एक मुलगाही तेथे आला होता. जोगबुवांच्या सान्निध्यात, त्यांच्या मार्गदर्शनाने काशीनाथचे वाचन, पारायण सुरू झाले. साधारणतः वर्ष-दीड वर्ष असे गेल्यावर एके दिवशी विष्णुबुवांनी काशीनाथला घरी परतून आपल्या कुटुंबीयांसमवेत राहा असे सांगितले. जाण्यापूर्वी त्याला पुढच्या जीवनाविषयी मार्गदर्शक उपदेशही केला. जोगबुवा म्हणाले, 'आता तू माळ घालून वारकरी झाला आहेस. नेमाने वारी करीत जा आणि जीवन निर्मळ ठेव.'

आळंदीहून वैजापूरजवळच्या खंडाळ्याला येताना काशीनाथ जेथे जेथे विसावला तेथे त्याला स्वप्नात दोन समाध्या दिसल्या. आम्हाला मुक्त कर असे जणू त्या समाध्या सांगत होत्या. काशीनाथ शिऊरजवळ आला; पण गावाच्या बाहेरच त्याला त्या समाध्या सापडल्या. झाडेझुडपे वाढलेली आणि खूप तणही झालेले. अशा तळ्याकाठच्या भागात त्या समाध्या होत्या. त्यातली एक होती शंकरस्वामींची. वारकरी पंथात आदराचे स्थान असलेल्या शंकरस्वामींची समाधी त्याला सापडली होती. आजूबाजूचा भाग स्वच्छ करायला त्याने प्रारंभ केला. शिऊर हे खरे म्हणजे त्याच्या सासुरवाडीचे गाव. पण सासऱ्याकडे न जाता गावात माधुकरी मागून काशीनाथ

निर्वाह करू लागला. गळ्यात माळ तर होतीच. विरक्तीही होती. तो आता काशीनाथबुवा म्हणून ओळखला जाऊ लागला. शिऊरच्या आसपासचे लोक दर महिन्याच्या वारीसाठी समाध्यांजवळ जमू लागले आणि काशीनाथबुवांनी तेथे हरिनाम सप्ताह केला. पाच वर्षे समाध्यांच्या सान्निध्यात राहिल्यानंतर काशीनाथ आपल्या गावी खंडाळ्याला गेला.

घरात कुलकर्णीपण तर होतेच. काशीनाथबुवा ते काम करू लागले. पण वारीच्या-आड ते आले तेव्हा सगळे दप्तर वरिष्ठांच्या स्वाधीन करून काशीनाथबुवांनी ते सोडून दिले आणि नंतर कुठे कुठे व्यापाऱ्यांच्या दुकानावर मुनीमाची नोकरी केली. अर्थात काशीनाथबुवांची नोकरी म्हणजे भगवद्‌भक्तीतून उरलेल्या वेळी होणार. या नोकऱ्या त्यांच्याविषयी मालकाच्या मनात असलेल्या आदरामुळेच टिकून राहत. अशा एका वारकऱ्याच्या घरात १४ नोव्हेंबर १९१९ रोजी वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथे अनंत भालेरावांचा जन्म झाला.

काशीनाथबुवांना विठाबाई, शांताबाई आणि मुक्ताबाई अशा तीन मुली आणि अनंत, भगवान, जयकृष्ण आणि उद्धव अशी चार मुले, अशी सात अपत्ये झाली. अनंत हा त्यांचे दुसरे अपत्य. भालेराव हे कुटुंबाचे जुने आडनाव अनंतरावांच्या पिढीने घेतले. एरव्ही त्यांच्या कुटुंबाला खंडाळकर म्हणूनच ओळखले जाई.

अनंत वडलांना दादा म्हणे. अल्प मोबदल्याच्या, त्यातही अनिश्चित नोकऱ्या आणि विरक्ताचा प्रपंच, त्यामुळे संसार ओढगस्तीचाच. दादांना मुलांचे शिक्षणही करणे अवघड होते. गंगापूरला असलेली दादांची बहीण कौसल्या चांगल्या घरात पडली होती. दुर्दैवाने नवरा गेला तरी त्याच्या माघारी तिने घर चांगले सांभाळले होते. भावाच्या मुलांपैकी अनंताला तिने शिक्षणासाठी आपल्याकडे ठेवून घेतले.

काशीनाथबुवा करंजगावाला तेव्हा एका व्यापाऱ्याकडे मुनीम होते. सुटीत अनंत करंजगावला येई. गावात तेव्हा दत्तू मास्तरांची एक खासगी शाळा होती. सुटीत आलेला अनंता या शाळेत बसे. तेथे औटकीपर्यंतचे पाढे शिकला. तेथेच मोडी आणि बाळबोध सुलेखनाचे कित्ते त्याने गिरवले. उरलेल्या वेळात मित्रमंडळीबरोबर खोड्याही केल्या. ही बेरकी मंडळी स्मशनातसुद्धा जायची. स्मशानात पुरलेली प्रेते उदमांजरे कित्येकवेळा उकरून काढायची. एकदा असेच अर्धवट उकरलेले प्रेत

अनंताच्या मित्रांनी पूर्ण उकरून काढले आणि ते झाडाला टेकून ठेवले. सकाळी तिकडून जाणाऱ्या पहिल्या माणसाची बोबडी वळली. त्याने गावात जाऊन भूत पाहिल्याचा बोभाटा केला.

सातवीपर्यंतचे शिक्षण आत्याकडे गंगापूरला झाल्यावर आठवीचा वर्ग तेथे नसल्यामुळे अनंता औरंगाबादला आला. धावणी मोहल्ल्यात शिखांच्या एका 'संगत'मध्ये एक खोली भाड्याने घेऊन काही मित्र राहू लागले. त्यातलाचा एक मित्र होता नागनाथ परांजपे. पुढच्या काळात स्वातंत्र्याच्या चळवळीत नागनाथ अनंतरावांचा निकट सहकारी बनला. 'संगत'च्या आवारातच राहणारा एक गृहस्थ साडेचार रुपये महिना घेऊन जेवण देई. तेथेच या मित्रांची सोय होई.

निजामाच्या राजवटीत एक सरकारी हायस्कूल जिल्ह्याचे ठिकाणी असे आणि तालुक्याच्या ठिकाणी फक्त सातवीपर्यंतच्या शाळा. औरंगाबादला भडकल गेट-जवळ असलेल्या इमारतीत सरकारी हायस्कूल आणि इंटरमिजिएट कॉलेज दोन्ही भरत. संबंध मराठवाड्यात औरंगाबादला असलेले ते एकमेव महाविद्यालय. हायस्कूलपर्यंतचे वर्ग आणि इंटरचे दोन वर्ग तेथे चालत. अनंता या हायस्कुलात दाखल झाला.

शाळेला सुटी लागली म्हणजे अनंता वैजापूरला जाई. काशीनाथबुवा आता वैजापूरला लखुशेठकडे नोकरीला होते. अनंताचे सुटीत करावयाचे उद्योग आता बदलले होते. तो आणि त्याचा मित्र रघुनाथ भालेराव वैजापूरच्या महादेवाच्या देवळात एक व्यायामशाळा चालवत. एक छोटेसे वाचनालयही त्यांनी सुरू केले होते.

१९३७ साली अनंत मॅट्रिकची परीक्षा दुसऱ्या वर्गात पास झाला ; पण संस्कृत विषयात तो संबंध हैदराबाद संस्थानात पहिला आला होता. त्यामुळे त्याला दरमहा पंधरा रुपयांची एक सरकारी शिष्यवृत्ती मिळाली होती. शिक्षण पुढे चालू ठेवण्याची शक्यता निर्माण झाली होती. अनंताने औरंगाबादला इंटरसाठी नाव नोंदवले. पुढच्या शिक्षणासाठी हा मुहूर्त मात्र काही बरा नसला पाहिजे. हैदराबाद संस्थानात लोकजागृतीचे वारे वाहू लागले होते. संस्थानाला लागून असलेल्या ब्रिटिश भारतातील मुंबई, मध्यप्रांत आणि मद्राससारख्या प्रांतात निवडणुका झाल्या होत्या. १९३५ च्या कायद्याप्रमाणे प्रांतांना काही बाबतीत स्वायत्तता मिळाली होती. निवडणुकात काँग्रेस आणि मुस्लिम

लीग आणि काही इतर पक्षांनी भाग घेतला होता. काही प्रांतांत तर नंतर काँग्रेसची मंत्रिमंडळेही अस्तित्वात आली. लोकांना जबाबदार असलेली सरकारे अस्तित्वात येऊ शकतात याचे उदाहरण हैदराबाद संस्थानातील जनतेला शेजारीच पाहावयास मिळाले. साहजिकच लोकांच्या राजकीय आकांक्षा वाढल्या होत्या. अशा परिस्थितीत संस्थानातील तरुणांच्या मनात आपल्याकडेही लोकशाही यावी व आपण संस्थानी एकाधिकारशाहीच्या जोखडातून मुक्त व्हावे अशी इच्छा निर्माण होऊ लागली होती.

खुद्द अनंताच्या महाविद्यालयातच गोविंददास श्रॉफ या नावाचे एक तरुण शिक्षक रुजू झाले होते. वर्गात ते विज्ञान शिकवीत. पण संपर्कात आलेल्या मुलांना ते स्वातंत्र्याचाही मंत्र शिकवीत. औरंगाबाद शहरात वि.गो. कर्वे यांच्यासारखे राष्ट्रप्रेमी शिक्षक होते आणि तरुण मनांना भारून टाकील असे वातावरण निर्माण होऊ लागले होते. गोविंदभाई मार्क्सवादी; त्यामुळे त्यांच्या संपर्कात येणाऱ्यांचे मार्क्सवादाचे अध्ययनही सुरू होई. अनंतरावही त्या प्रभावातून सुटलेले नव्हते. अर्थात मार्क्सवादाची अगदीच जुजबी ओळख आणि तीही स्वातंत्र्याच्या लढ्याला पूरक म्हणून त्या काळात झाली होती. शोषणाला विरोध आणि समतेचा आग्रह हे त्याचे दृश्यरूप होते.

हैदराबाद शहरातील काही कार्यकर्त्यांच्या मनात काँग्रेस संघटनेचे काम सुरू करण्याचे होते. संस्थानी भागात अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या शाखा स्थापन करण्याचे काँग्रेस नेतृत्वाचे धोरण नव्हते. संस्थानी प्रजेने आपापले लढे स्वतंत्र संघटना स्थापन करून चालवावेत असे राष्ट्रीय नेतृत्वाचे म्हणणे होते. 'हैदराबाद स्टेट काँग्रेस' या नावाची काँग्रेसचे ध्येयधोरणच चालवणारी संघटना स्थापन करण्याचे या मंडळींनी ठरवले. ९ सप्टेंबर १९३८ रोजी यासाठीची एक बैठक हैदराबादेत झाली आणि स्टेट काँग्रेसची स्थापना करण्याचे ठरले. त्याच्या आदल्यादिवशीच स्टेट काँग्रेस संघटनेवर बंदी घालत असल्याचा आदेश सरकारने काढला.

राजकीय संघटना स्थापन करायचा आपला हक्क बजावयाचा असेल तर आता सत्याग्रह हाच एक मार्ग होता. संस्थानातील राजकीय कार्यकर्ते गांधीजींचे मार्गदर्शन घेत. गांधीजींशी विचारविनिमय करून ऑक्टोबर १९३८ मध्ये स्टेट काँग्रेस स्थापनेसाठी सत्यागह करण्याचे ठरले. सत्याग्रह्यांच्या पहिल्या काही तुकड्यांनी राजधानी हैदराबादेत सत्याग्रह केला. मराठवाड्यातही सत्याग्रह करण्याचे ठरले. गोविंदभाई श्रॉफ हे

चळवळीचे नियोजन करीत होते. त्यांनी केलेल्या नोंदणीत अनंत आणि त्यांचे मित्र सामील झाले; परंतु वैजापुरात पहिला सत्याग्रह दुसऱ्यांनीच करण्याचे ठरले होते; पण सत्याग्रहासाठी ज्यांनी नाव नोंदवले होते ते ऐनवेळेला आलेच नाहीत. त्यामुळे नियोजन करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर टाकण्यात आली होती ते अनंतराव आणि त्यांचे रघुनाथ आणि भीमराव हे दोन मित्र या तिघांनीच आयत्यावेळी सत्याग्रह करण्याचे ठरवले.

वैजापुरातील महादेवाच्या मंदिरात १८-१९ वर्षांचे हे तीन तरुण जमले. स्टेट काँग्रेसची उद्दिष्टे जाहीर करणारी उर्दू आणि मराठी पत्रके औरंगाबादहून आणलेलीच होती. तिघांनी वंदे मातरम् म्हटले. सत्याग्रही कोण हे ओळखणे शक्य व्हावे म्हणून तिघांनी स्वतःच आणलेले हार आपल्या गळ्यात घालून घेतले आणि मंदिरातून घोषणा देत बाजार चौकाकडे निघाले. बाजार चौकात ते पोहोचल्यानंतर जमलेल्या थोड्याशा लोकांसमोर त्यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसचे आम्ही सभासद आहोत हे जाहीर करणारी पत्रके वाचून दाखवली. हे सगळे आटोपले तरी अद्याप पोलीस आलेच नव्हते. पोलीस आल्याशिवाय सत्याग्रह कसा होणार? आणखी काही वेळा या तिघा सत्याग्रहींनी घोषणा दिल्या. शेवटी एकदाचे पोलीस आले. त्यांनाही काय करावे याचा पूर्वानुभव नव्हता. आम्हाला पकडा, आम्ही कायदा मोडला आहे हे सत्याग्रहींनीच सांगितल्यावर पोलिसांनी त्यांना पकडले आणि हातकड्या घालून गावभर मिरविले. नंतर त्यांना घेऊन ते पोलीस ठाण्यात गेले. खटला कोणत्या कलमाखाली व कसा भरायचा याचा खल होईपर्यंत एक-दोन पोलीस अधिकाऱ्यांनी तिन्ही तरुण सत्याग्रहींना बडवून आपला हात साफ करून घेतला.

१९ दय १३४८ (इ.स. १९३८) फसली रोजी झालेल्या या गुन्ह्याबद्दल वैजापूर कोर्टात खटला चालला आणि पंचवीस तारखेला तिन्ही सत्याग्रहीना दोन-दोन महिन्याची सक्तमजुरी आणि शंभर रुपये दंड अशी शिक्षा झाली. दंड भरायचा नव्हताच. त्यामुळे तीन महिने शिक्षा भोगून सत्याग्रही बाहेर आले. अनंतराव सत्याग्रह करणार आहेत हे घरी कोणालाच माहीत नव्हते. त्यांनी सत्याग्रह केल्यामुळे काशीनाथबुवा थोडे नाराज होणे स्वाभाविक होते. अनंता आता मॅट्रिक झाला होता तेव्हा त्याने एखादी नोकरी करावी व कुटुंबाची जबाबदारी घ्यावी अशी त्यांची स्वाभाविकच इच्छा होती. त्या काळात मॅट्रिकनंतर नोकरी मिळणे सोपे होते. पण अनंताने सत्याग्रह

केल्यावर तू सत्याग्रह केलाच आहेस तर माफीबिफी मागू नकोस असा निरोप मात्र त्यांनी दिला.

तुरुंगातून अनंतराव बाहेर आले आणि त्यांचे राजकीय शिक्षण पुढे चालू झाले. गोविंदभाईंचा अभ्यासवर्ग तर चालू होताच. एकीकडे मार्क्सवाद आणि दुसरीकडे वडलांच्या आणि घरच्या वातावरणाने झालेले वारकरी संप्रदायाचे संस्कार अशा दुहेरी पेडांनी अनंतरावांचे व्यक्तित्व घडले. अनंतराव आयुष्यभर देवळात कधी गेले नाहीत. ईश्वराचे सगुणरूप त्यांच्या मनाला कधीच भावले नाही. तसे त्यांना निरीश्वरवादीच म्हणावे लागेल; पण तरीही रक्तातला आणि मनातला संतांचा उपदेश आणि स्वभावातील सात्त्विकता सतत प्रगट होत राहिली.

अनंतरावांचे इंटरचे दुसरे वर्ष चालू असतानाच त्यांनी सत्याग्रह केला होता. तुरुंगातून ते सुटून आले आणि महाविद्यालयात गेले. तोपर्यंत महाविद्यालयात आणखी एक आंदोलन सुरू झाले होते. औरंगाबादचे सरकारी हायस्कूल आणि इंटरमिजिएट कॉलेजमधील विद्यार्थ्यांत लोकप्रिय असलेले गोविंदभाई श्रॉफ यांना सरकारने महाविद्यालयातून ९ नोव्हेंबर १९३८ रोजी तडकाफडकी काढून टाकले होते. गोविंदभाई विद्यार्थ्यांत करीत असलेली जागृती आणि त्यांच्यात जागवीत असलेले स्वातंत्र्यप्रेम सरकारला सहन झाले नव्हते. काही विद्यार्थ्यांनी गोविंदभाईंच्या मार्गदर्शनानुसार स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहासाठी नावेसुद्धा नोंदविली होती. आपला असंतोष कसा व्यक्त करावा या विचारात विद्यार्थी असतानाच त्यांना असे समजले की, हैदराबाद येथे उस्मानिया विद्यापीठाच्या वसतिगृहात हिंदू विद्यार्थी चार-पाच महिन्यांपासून 'वंदे मातरम्' हे गीत प्रार्थना म्हणून रोज म्हणत आहेत. औरंगाबादच्या विद्यार्थ्यांनी १४ नोव्हेंबर १९३८ पासून आपल्याही वसतिगृहात ते म्हणावयाला प्रारंभ केला. प्राचार्यांनी हे गीत म्हणण्याला बंदी केली. विद्यार्थ्यांनी ऐकले नाही आणि बंदीच्या निषेधार्थ अन्नसत्याग्रह सुरू केला. मध्यस्थीचा प्रयत्न झाला तेव्हा हैदराबादला हे गीत म्हणू दिले जात असले तर येथेही म्हणू दिले जाईल असे प्राचार्यांनी आश्वासन दिले होते. गोविंदभाईंच्या सल्ल्यानुसार आपले आंदोलन सुरूच ठेवण्याचे ठरवले गेले.

मुलांना मातृभाषेत न शिकू देता लादण्यात आलेले उर्दू माध्यम, उस्मानिया विद्यापीठाचा गणवेष म्हणून मुस्लिम पद्धतीच्या पोषाखाची-शेरवानीची-सक्ती, अभ्यासक्रमात करण्यात

आलेला धार्मिक भेदभाव, संस्थानातील सांस्कृतिक दडपशाही अशा अनेक कारणांनी खदखदणारा असंतोष 'वंदे मातरम्' गीताच्या रूपाने प्रगट झाला होता. शेवटी सरकारने कडक कारवाई करण्याचे ठरवले आणि 'वंदे मातरम्' म्हणण्याचा आग्रह धरणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना संस्थानातील शिक्षणसंस्थातून काढून टाकण्यात आले. ज्यांना काढून टाकण्यात आले त्यात अनंतरावही होते.

'वंदे मातरम्' आंदोलनातील महाविद्यालयीन विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी नागपूर-जबलपूरकडे तर शालेय विद्यार्थी अहमदनगर, खामगाव अशा गावी गेले. तेथील शिक्षणसंस्थांनी या मुलांच्याबद्दल सहानुभूतीचा दृष्टिकोन स्वीकारला आणि आपल्या संस्थेत प्रवेश दिला. काही मित्रांबरोबर अनंतराव नागपुरात गेले आणि जानेवारी १९३९ मध्ये त्यांनी तेथील सिटी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. नागपूरला जी मुले नागपूर विद्यापीठाच्या परीक्षा उत्तीर्ण झाली त्यांनी हैदराबाद संस्थानात परत आल्यावर पुन्हा शिक्षण चालू करायचे असेल तर 'वंदे मातरम्' चळवळीत भाग घेतल्याबद्दल माफीनामा लिहून द्यावा, अशी अट हैदराबाद सरकारने घातली. अनंतराव माफीनामा लिहून देणे शक्यच नव्हते. त्यामुळे त्यांनी शिक्षणच थांबवण्याचा निर्णय घेतला.

हैदराबाद संस्थानात सरकारी शाळा थोड्या आणि त्यांचे माध्यम व वातावरण उर्दू. त्यामुळे खासगी शिक्षणसंस्था चालवणे हा स्वातंत्र्यलढ्याचा एक भागच समजला जात होता. संस्थानातील सत्याग्रह गांधीजींच्या सल्ल्याने थांबवण्यात आल्यानंतर राजकीय मंदीच्या या काळात राष्ट्रीय विचार देणाऱ्या खासगी शाळा काढणे व त्यात शिकविणे हे एक करण्यासारखे काम होते. त्याशिवाय चरखासंघ चालवणे आणि खादीचा प्रसार करणे हेही काम कोणी करीत असे. १९३८ साली अनंतराव औरंगाबाद जवळच्या हर्सूल तुरुंगात असताना मनोहर सोनदे, विनायक चारठाणकर, राजाराम कोकीळ अशा काही मित्रांची तुरुंगात ओळख झाली होती. या तरुणांनी आपणही एखादी खासगी शाळा काढावी असा विचार केला होता. अनंतराव नागपूरहून परत आल्यानंतर या विचाराला पुन्हा चालना मिळाली.

नवीन शाळेला परवानगी मिळणे संस्थानात फारच कठीण होते. तेव्हा एखाद्या नाममात्र अस्तित्वात असलेल्या जुन्या शाळेचा पुनरुद्धार करणे हा एक राजसंमत होऊ शकणारा मार्ग होता. परभणी जिल्ह्यातील सेलू गावी बालवर्ग ते दुसरी असे

तीन वर्ग चालवणारी नूतन विद्यालय नावाची एक शाळा अस्तित्वात होती. सेलूला स्थायिक झालेले लक्ष्मणराव कुलकर्णी, गरूड गुरुजी या शाळेत शिकवत होते. शाळेचे मुख्याध्यापक म्हणून रंगनाथराव कंधारकर काम करीत होते. वकिलीची परीक्षा पास झालेले विनायकराव चारठाणकर सेलूला येऊन दाखल झाले. काही दिवसातच वैजापूरहून अनंतराव आणि मनोहर सोनदे सेलूला आले. सेलूच्या रामवाड्यात तेव्हा एक व्यायामशाळाही चालत असे. सुमारे शंभर तरुण रोज व्यायामाच्या निमित्ताने एकत्र जमत. पाथरी हे तालुक्याचे गाव असले तरी सेलू हे तालुक्यातले सर्वांत मोठे आणि व्यापारी गाव होते.

अनंतराव सेलूला आल्यानंतर गावातले व्यापारी, वकील आणि इतर प्रतिष्ठितांची एक बैठक रामवाड्यातच बोलावण्यात आली. बरीच मंडळी जमली होती. खासगी शाळा काढायची तर ती अंबाजोगाईला चालणाऱ्या स्वामी रामानंद तीर्थांच्या शाळेच्या धर्तीवर चालवावयाची असा निर्णय झाला. सद्याच्या शाळेत तिसरी,चौथी आणि पाचवी असे तीन वर्ग ताबडतोब वाढवावेत असेही ठरले. सर्व मदतीचे आश्वासन गावकऱ्यांनी दिले. लक्ष्मणराव, गरूड यांच्या जोडीला अनंतराव, विनायकराव आणि मनोहर सोनदेही नूतन विद्यालयात शिक्षक झाले. अनंतरावांना मुख्याध्यापक पद देण्यात आले. वर्ग सहा झाले आणि शिक्षक पाचच होते. नंतर मग दत्तोपंत गाजरे शिक्षक म्हणून रुजू झाले आणि शाळा व्यवस्थित चालू लागली. पुढे आणखीही दोन शिक्षक आले. विस्तारित शाळा पाच-सहा महिने रुळली म्हणजे मग औपचारिक उद्घाटन करायचे आणि त्यासाठी स्वामीजींना बोलावयाचे असे ठरले होते.

शाळा सुरू झाली आणि सरकारने लगेच इशारा दिला. गावात एक सरकारी शाळा आहे त्यामुळे आणखी दुसऱ्या शाळेची आवश्यकता नाही असे सरकारने कळवले. खरी अडचण येणार होती ती सातवीचा वर्ग उघडल्यानंतर. सातवीची परीक्षा सरकारी बोर्ड घेत असे व सरकारी मान्यता असलेल्या शाळेच्या मुलांनाच त्या परीक्षेला बसता येत असे. पण तो प्रश्न उपस्थित होण्यास अजून दोन वर्षे होती. तोपर्यंत मान्यतेसाठी प्रयत्न करता येणार होता.

सेलूच्या रामवाड्यात सुरू झालेल्या विस्तारित शाळेचे उद्घाटन करण्यासाठी रामानंद तीर्थ आले. स्वामीजी एव्हाना हैदराबादमधील स्वातंत्र्यलढ्याचे नेते म्हणून

ओळखले जाऊ लागले होते. त्यांनी स्वतःच हिप्परग्याच्या शाळेचे मुख्याध्यापक पद सोडून अंबाजोगाईला आल्यावर तेथीच अशाच एक नाममात्र अस्तित्वात असलेल्या शाळेचे इतरांच्या सहकार्याने आणि नागरिकांच्या पाठिंब्याने पुनरुज्जीवन केले होते. स्वामीजींच्याबरोबर उद्घाटन समारंभासाठी अंबाजोगाईच्या शाळेतील त्यांचे सहकारी बाबासाहेब परांजपे हेही आले होते.

रामवाड्याचे पटांगण सुशोभित केले होते. एक मोठे व्यासपीठही तयार केले होते. स्वामीजी हे अन्यायाच्याविरुद्ध बंडखोरीचे प्रतीक म्हणून ओळखले जाऊ लागले होते. त्यांना पाहण्याची, त्यांचे भाषण ऐकण्याची उत्सुकता तर होतीच; त्याचबरोबर थोडीशी भीतीही होती. मोठ्या संख्येने नागरिक समारंभाला आले होते. समारंभानंतर काही दिवसांनी हर्सूलच्या तुरुंगात बरोबर असलेल्या राजाराम कोकीळांना आणि वैजापूरचे एक मित्र राजाराम टकसाळे यांनाही अनंतरावांनी बोलावून घेतले. सेलूच्या शाळेच्या कामासाठी जमलेल्या मित्रांपैकी विनायकराव चारठाणकर आणि मनोहर सोनदे हे विवाहित होते. त्यांनी वेगळी घरे केली; पण अनंतराव, कोकीळ, टकसाळे, लक्ष्मणराव, गरूड हे सगळे अविवाहितच होते. ते रामवाड्यातच एक-दोन खोल्यांत एकत्र राहू लागले. सर्वांनाच सरसकट दरमहा १५ रुपये पगार होता. त्यापेक्षा जास्त देणे परवडणारच नव्हते. ही कार्यकर्ती मंडळी शिक्षकही होती आणि संस्थाचालकसुद्धा होती. काही दिवसांनी जिंतूरच्या तहसील कचेरीत कारकुनी करणारे सोनाजीराव कुलकर्णी सेलूला आले. चांगली नोकरी सोडून ते आले होते. त्यांचे उर्दू चांगले होते म्हणून ते उर्दू शिकवू लागले आणि सरकारी नियमातली एक गरज शाळेने पूर्ण केली. उर्दू हा अनिवार्य विषय होता. उर्दूचा शिक्षक मिळाला होता. काही दिवसांनीच नागपूरला कॉलेजमध्ये अनंतरावांबरोबर असलेले गोविंदराव देशमुखही शाळेला येऊन मिळाले. ते उत्तम गणित शिकवत.

उद्घाटनाच्या वेळी चार-पाच हजारांची आश्वासने उपस्थितांनी दिली होती. पण शाळेला कायम मदतीची गरज होती. त्यासाठी काही दिवसानंतर व्यापाऱ्यांनी मोंढ्यातील खरेदी- विक्रीवर शाळेच्या मदतीसाठी सेस बसवला व व्यवहाराच्या रुपयामागे एक-दोन पैसे शाळेला मिळू लागले. चार-पाच महिन्यानंतर डेप्युटी कलेक्टरांनी सेस बंद करा म्हणून व्यापाऱ्यांना दम दिला; परंतु सेस चालूच राहिला. व्यापारी खंबीरपणे राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळेमागे उभे राहिले होते.

सेलूच्या शाळेत शिक्षण चांगले दिले जात असल्यामुळे त्यात काही थोडी मुस्लिम मुलेही दाखल झाली होती. कडवी मुस्लिम राजकीय संघटना म्हणून संस्थानात कुख्यात असलेल्या इत्तेहादुल मुस्लमीनच्या स्थानिक शाखा अध्यक्षाची मुलेसुद्धा याच शाळेत शिकत होती. परभणी जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यांनी काही प्रतिकूल शेरे लिहिण्याचा प्रयत्न केला म्हणून शिक्षक मंडळी औरंगाबादला शिक्षण सहसंचालकाकडे गेली. त्यांनी शाळेची बाजू समाजावून सांगण्यात आली. आठ-दहा दिवसांनी स्वतःच सहसंचालक सेलूला आले आणि त्यांनी शाळेची दोन दिवस तपासणी करून शाळेबद्दल फार चांगला अभिप्राय लिहिला. वयाने लहान असणारी निष्ठावान तरुण शिक्षक मंडळी या शाळेला लाभली आहेत याचा त्यांनी अभिप्रायात उल्लेख तर केलाच होता; शिवाय या शाळेचा आदर्श इतरांनी गिरवावा अशी शिफारसही केली होती.

शाळेत उर्दू जाणणारे आणि शिकवू शकणारे शिक्षक होते. पण सरकारच्या दृष्टीने अडचणीची बाब म्हणजे ते हिंदू होते. शेवटी उर्दू मातृभाषा असलेलाच शिक्षक पाहिजे असा आग्रह सरकारने धरला. तेवढ्यासाठी अडचण नको म्हणून शाळेने उर्दू मातृभाषा असलेला शिक्षक पाहिजे अशी जाहिरात हैदराबादच्या उर्दू वृत्तपत्रात दिली. मुलाखतीसाठी फक्त एकच उमेदवार आला. तो मुसलमान होता तरी जातीय चळवळीच्या विरुद्ध होता, उत्तम मराठी जाणत होता आणि फडके-खांडेकरांच्या काही कथांचे उर्दू अनुवादही त्याने केले होते. हे सुसंस्कृत शिक्षक अमजद युसुफजई नूतन विद्यालयात चांगलेच रुळले.

खासगी राष्ट्रीय विचारांच्या आणि सरकारी अवकृपेची सतत भीती असलेल्या सेलूच्या शाळेत पंधरा रुपये दरमहा पगार मिळवणाऱ्या अनंतरावांचे याच काळात लग्न झाले. कळमनुरीच्या शामराव मुळ्यांच्या सगळ्यात धाकट्या मुलीशी-सुशीलेशी अनंतरावांचे लग्न ठरले. मुलगी पाहायला अनंतरावांबरोबर त्यांची आई होती आणि दंड घातलेले म्हणजे मधे जोड दिलेले एक साधे पातळ ती नेसलेली होती. रंगाने काळसावळा, तोंडावर देवी येऊन गेल्याच्या अगदी पुसट खुणा असलेला उंचापुरा मात्र अगदीच साधी राहणी असलेला नवरा मुलगा, जेलमध्ये जाऊन आला असला तरी वारकरी घराचे संस्कार लाभलेला होता. सध्या प्राप्तीही फारशी नसली तरी मुलगा कर्तबगार दिसत होता. शामरावांनी जावई पसंत केला.

सुशीलाबाई त्या काळच्या मानाने प्रौढच म्हणजे १७-१८ वर्षांच्या होत्या. चौथीपर्यंत कळमनुरीच्या शाळेत त्या शिकल्या होत्या. मात्र चौथी बोर्डाच्या हिंगोलीला जाऊन दिलेल्या परीक्षेत त्या नापास झाल्या होत्या. शामरावांचे घरचे हे शेवटचे कार्य. त्यामुळे लग्न जोरात झाले. वऱ्हाडी बायकांची चौकन्हाणी (गावातल्या प्रत्येक चौकात चौरंग मांडून प्रत्येकीचे पाय धुणे) सुद्धा झाले. खुद्द व्याहीबुवाच निरुपणकार त्यामुळे त्यांची वारकरी-फडकरी स्नेही मंडळी आणि नवऱ्या मुलाचे चळवळीतील काही सहकारी आवर्जून आले होते. लग्नानंतर सुशीलाबाईंना घेऊन अनंतराव सेलूला आले. अविवाहित शिक्षकांची वसतिगृहवजा खोली सोडून एक वेगळी जागा त्यांनी पाहिली आणि संसार सुरू झाला.

शाळा सुरळीत सुरू होऊन जवळपास तीन वर्षे झाली होती. शाळेत काम करणारे अनंतराव आणि त्यांचे मित्र आयुष्यभर शिक्षक म्हणूनच राहायचे या उद्देशाने शाळेत दाखल झालेले नव्हते. शिक्षक होणे हा त्यांच्या लेखी स्वातंत्र्य चळवळीचाच एक भाग होता. जसजशी गरज पडेल तसतशी त्यांची भूमिका बदलणार होती.

देशातील राजकीय परिस्थितीने १९४२ साली एक महत्त्वाचे वळण घेतले. मुंबईला गोवालिया टँक मैदानावर अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन ऑगस्ट महिन्यात भरणार होते. गांधीजी एका व्यापक व निर्णायक चळवळीची घोषणा या अधिवेशनात करतील अशी अपेक्षा देशभर व्यक्त होत होती. सेलूतील शिक्षकांपैकी काहींनी या अधिवेशनाला जावे असे ठरले. स्टेट काँग्रेसवर स्थापनेपूर्वीच बंदी आल्यामुळे 'महाराष्ट्र परिषद' या परतूरच्या अधिवेशनात स्थापण्यात आलेल्या संघटनेमार्फत राजकीय काम सुरू करावे असे ठरले होते. महाराष्ट्र परिषदेची एक शाखा सेलूत उघडली. एक खादी भांडारही उघडले होते.

परभणी जिल्ह्यातून वीस-पंचवीस लोक मुंबईच्या काँग्रेस अधिवेशनाला गेले. अनंतराव, विनायकराव चारठाणकर, सोनदे या शिक्षकांबरोबरच भांगडियाजींसारखे गावातले काही राष्ट्रीय विचाराचे व्यापारीही त्यात होते. ८ ऑगस्टच्या रात्री गांधीजींनी 'करेंगे या मरेंगे' असा निर्वाणीचा संदेश आपल्या भाषणात दिला. दडपशाहीचे चक्र ताबडतोब फिरू लागले. रातोरात सर्व राष्ट्रीय पुढारी पकडले गेले. सेलूची मंडळी

विखरून आणि लपतछपत वेगवेगळ्या मार्गाने सेलूला परत येऊन पोहोचली. सेलूतील मंडळी चळवळ चालू ठेवू इच्छित होती; पण मोडतोडीच्या मार्गावर त्यांचा विश्वास नव्हता. सत्याग्रहाचाच मार्ग त्यांना भावणारा होता. बहुतेक महत्त्वाचे कार्यकर्ते शाळेत शिक्षक होते. सत्याग्रह तर करावयाचाच होता; पण शाळा सुरळीत चालू राहील अशी व्यवस्था करावी लागणार होती. अनंत भालेराव शाळेचे मुख्याध्यापक. तेव्हा त्यांनी सध्या सत्याग्रह करू नये व शाळा किमान चालू राहील एवढ्या शिक्षकांनीही प्रत्यक्ष सत्याग्रहात जाऊ नये असा निर्णय झाला. भूमिगत राजकीय काम सुरू करावे परंतु ते शाळेत न करता त्यासाठी दुसरी जागा वापरावी असेही त्यांनी ठरवले.

सेलूच्या एका जीनिंग फॅक्टरीचे व्यवस्थापक म्हणून आबाराव बोधनकर काम करत होते. तेच नूतन विद्यालयाचे चिटणीससुद्धा होते. त्यांच्या जीनिंग आणि प्रेसिंग फॅक्टरीमध्ये नूतन विद्यालयातील शिक्षक व इतर काही तरुण व्हॉलिबॉल, बॅडमिंटन, हुतूतू असे खेळ खेळत. कित्येकवेळा फॅक्टरीच्या आवारातल्या बोधनकरांच्या घरातच या शिक्षकांचे जेवणही होई. फॅक्टरीच्या आवारातल्या दोन खोल्या चळवळीच्या कामासाठी आबारावांच्या संमतीने घेतल्या. सोनद्यांनी एक सायक्लोस्टाईलिंग मशीन आणले आणि सेलू गावातल्या महत्त्वाच्या घरात चळवळीची माहिती देणारी पत्रके रात्रीच येऊन पडू लागली. विनायकराव आणि मनोहरराव सोनदे या शाळेतल्या शिक्षकांनी सत्याग्रह केल्यामुळे शाळेची झडती झाली. मुख्याध्यापक असलेल्या अनंतरावांना बोलावून दमदाटीही करण्यात आली; पण शाळा सुरळीत चालूच राहिली.

बेचाळीसची चळवळ हळूहळू थंडावत गेली. संस्थानातील चळवळीला नवे स्वरूप द्यावे लागणार होते. महाराष्ट्र परिषदेच्या शाखा मराठवाडाभर उघडाव्यात व परिषदेच्या कामासाठी जिल्हावार संघटक नेमावेत असा निर्णय घेण्यात आला होता. शाळेचे मर्यादित कार्यक्षेत्र सोडून आपण आता पूर्णवेळ राजकारणाला द्यावा आणि चळवळीत उतरावे असे अनंतरावांच्या मनात येत होते. आपला विचार त्यांनी सहकाऱ्यांना आणि गोविंदभाईसारख्या ज्येष्ठांना बोलून दाखवला. गोविंदभाईंनाही अनंतरावांसारखा सहकारी संघटनात्मक कामासाठी हवाच होता. मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान

एक आणि शक्यतर अधिक पूर्णवेळ कार्यकर्ते नेमावयाचे होते. अनंतरावांनी सेलूच्या शाळेचा निरोप घेण्याचे ठरवले आणि २५ तीर १३५३ फसली (इ. स.१९४४) रोजी एक राजीनामा संस्थेचे तत्कालीन चिटणीस बोधनकर यांच्याकडे सुपूर्द केला.

अनंतरावांचे हे राजीनाम्याचे पत्र त्यांच्या त्यावेळच्या मन:स्थितीचा आलेख म्हणून महत्त्वाचे आहे. त्यातील काही भाग म्हणूनच येथे उद्धृत केला आहे.

जवळजवळ पाच वर्षांचा काळ होत आहे. मी माझ्याजवळ असलेल्या अल्पशक्तीसह आपल्या आणि तितक्याच अभिमानाने माझ्या संस्थेत सेवा करीत आलो आहे... ज्या काही शिक्षकांची गणना संस्थापकवर्गात केली जाते त्यापैकीच मी एक आहे...

मला हेही माहीत आहे की, आपली संस्था एका विशिष्ट ध्येयाने अस्तित्वात आली, विशिष्ट ध्येयासाठीच जोपासली गेली आणि त्यासाठीच ती यापुढे जगणार आहे. या ध्येयाची प्रखरता भोवतालच्या खेचाखेचीत नाइलाज म्हणून कमी झालेली आहे हे कबूल करणेच बरे. तरी पण या ध्येयभक्तिकरिता लागणारी आंतरिक तळमळ, श्रद्धा आणि त्यागभावना या त्रयींचा जोवर विसर संस्थेच्या चालकास पडणार नाही तोपर्यंत यशस्विता आपली आहे आणि आपण तिचे.

या सर्व गोष्टींची मला खात्री आहे म्हणूनच आज संस्थेस सोडण्याच्या परवानगीबद्दल आपल्याकडे विनम्रपणे याचना करताना मला अतिशय दु:ख होत आहे. मी आज तरी संस्थेस कायमचे सोडण्याच्या विचाराने बाहेर पडत आहे. संस्थेच्याच ध्येयासाठी आज मला बाहेर पडावे लागत आहे. संस्थानातील एकंदर परिस्थिती जितकी स्पष्ट आहे तितकीच असह्य नाही असे म्हणण्याचे धाडस कोण करील? या सर्व विषवृक्षाचे मूळ कुठल्या भूमीत आणि किती खोल रुतलेले आहे याचा शोध जनसेवा हेच आपल्या जीविताचे सारसर्वस्व आहे असे मानून त्या प्रीत्यर्थ आपल्या एकूण एक सुखाचा, विलासाचा व शक्तींचा त्याग या वंद्य तापसीयांनी केलेला असून, तन्नाशार्थ त्यांनी राष्ट्रातील सामर्थ्याला हाक दिली आहे. त्यांच्या हाकेला ओ न देता शाळेत चार मुलांना जमवून क्रियाशून्य आणि शुकवत पाठ देत जर आम्ही बसू तर

आम्हास जे साध्य आहे त्याची प्राप्ती तर राहोच, पण नाशच बघण्याची पाळी येईल याची मला भीती वाटते.

...मी शाळेतून अनेक गोष्टी शिकून बाहेर जात आहे. संस्थेने मला अत्यंत प्रभावी व पवित्र मंत्रांचा पाठ दिला आहे. निर्लेपसेवा, त्यागी जीवन, निरहंकारवृत्ती, श्रद्धा, औदार्य आणि अंतःकरणाच्या विशालतेचे धडे मी मुलांना मुखाने शिकवत असताना मनाने स्वतः शिकलो. त्यांना संपूर्णपणे आत्मसात करण्यासाठी व या दिव्यातून यश घेऊन बाहेर पडण्यासाठी आपणच मला ही प्रेरणा दिली आहे, असा माझा विश्वास आहे.

शेवटी आपणा सर्वांना प्रणाम ! ...मला पुत्रवत व भ्रातृवत सांभाळले याबद्दल मी खरोखरच आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. या ॠणाच्या ओझ्याखाली परमेश्वर मला सदैव ठेवो. म्हणजे आपल्या उपकारांची सर्वकाल स्मृती राहील.

मला आशा आहे की आपण सर्व गोष्टींचा विचार करून माझा हा राजीनामा मंजूर कराल.

कळावे.

विनित,

**अनंत भालेराव**

संस्थेच्या कार्यकारी मंडळाने अनंतरावांचा राजीनामा मंजूर केला. अनंतराव औरंगाबादला जाऊन गोविंदभाईंना भेटले. महाराष्ट्र परिषदेच्या औरंगाबाद येथील कार्यालयाचे चिटणीस म्हणून अनंतरावांनी काम करावे असे त्यांना सांगण्यात आले. १९४४ च्या मे महिन्यात सेलूच्या विद्यालयाची जबाबदारी अनंतरावांनी सोडली आणि त्यांचा शिक्षकावतार संपुष्टात आला.

## ३. राजकीय जागृतीच्या कामात

१९२० सालच्या सुमारास भारतातील राजकारणाबरोबरच लहान प्रमाणात का होईना पण हैदराबाद संस्थानातील राजकीय वातावरण वळण घेऊ लागले होते. लोकमान्यांच्या निधनानंतर महात्मा गांधींचे नेतृत्व देशभर सर्वमान्य होऊ लागले. महात्मा गांधींच्या राजकारणाचे स्वरूप असे होते की त्यात आरामखुर्चीवर बसून राजकारण करण्याची सवलतच नव्हती. देशातल्या सर्वसामान्य माणसाला कवेत घेणारे आणि आपल्या ध्येयासाठी सर्वप्रकारच्या त्यागाला तयार असणाऱ्या नेतृत्वालाच स्वीकारू शकणारे ते राजकारण होते. गांधीजींचा पहिला लढा सुरू होण्यापूर्वीच म्हणजे १९१८ साली अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची एक शाखा हैदराबादेत स्थापन झाली होती व अखिल भारतीय काँग्रेसच्या भारतात कोठेही भरणाऱ्या अधिवेशनांना संस्थानातील कार्यकर्तेही हजर राहू लागले होते.

१९२१ च्या मे महिन्यात 'हैदराबाद राजकीय सुधारणा संघ' या नावाची एक संस्था संस्थानच्या राजधानीत स्थापन झाली होती आणि राज्यकारभारात कोणत्या सुधारणा केल्या जाव्यात याविषयीचे आपले मत सरकारला कळवण्याचे तिने ठरवले. अशा सुधारणाविषयी लोकमत व्यक्त करण्याकरता एक राजकीय परिषद भरवावी असे या संस्थेने ठरवले. पहिल्या राजकीय परिषदेसाठी परवानगीचा अर्जही करण्यात आला; परंतु सरकारने परवानगी दिली नाही. शेवटी संस्थानाबाहेरच अशा परिषदा भराव्या लागतील हे व्यावहारिक सत्य कार्यकर्त्यांना उमगले. १९२३ मध्ये काकीनाडा येथे झालेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनाला जोडून माधव श्रीहरी ऊर्फ बापूजी यांच्या अध्यक्षतेखाली पहिली हैदराबाद संस्थान राजकीय परिषद भरली. त्यानंतर दुसरी परिषद लगेच भरू शकली नाही. तीन वर्षानंतर १९२६ च्या मुंबई काँग्रेस अधिवेशनात विदर्भाचे नेते या.मा. काळे यांच्या अध्यक्षतेखाली दुसरी हैदराबाद

राजकीय परिषद' झाली. त्यानंतर दोन वर्षांनी पुण्यात नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली तिसरी 'हैदराबाद राजकीय परिषद' भरली तर १९३१ मध्ये अकोल्याला बॅ. रामचंद्र नाईक यांच्या अध्यक्षतेखाली चौथी 'हैदराबाद राजकीय परिषद' झाली. दोन-तीन वर्षांच्या अंतरानंतर होत गेलेल्या या हैदराबाद राजकीय परिषदा संस्थानाबाहेर भरल्या होत्या. हैदराबादमध्ये राजकीय हक्क नागरिकांना दिले जावे, संघटनांचे स्वातंत्र्य असावे आणि लोकांना जबाबदार असलेले शासन प्रस्थापित व्हावे अशा मागण्या या परिषदांमध्ये सामान्यतः करण्यात आल्या होत्या.

१९३५ मध्ये 'निजाम सब्जेक्टस् लीग' म्हणजे निजामाच्या प्रजाजनाचा संघ या नावाची एक संघटना स्थापन झाली. ही संघटना स्थापन करण्यात संस्थानातील काही वजनदार मुस्लिम नागरिकांचा पुढाकार होता. संघटनेचा भर राजकीय स्वातंत्र्यापेक्षा मुल्की म्हणजे संस्थानातील मूळ रहिवाशांना नोकऱ्यात व कारभारात अधिक प्राधान्य मिळावे यावरच अधिक होता. शिक्षण आणि अनुभव या दोन्ही दृष्टीने उपयुक्त असलेली मुस्लिम मंडळी संस्थानात पुरेशा प्रमाणात उपलब्ध नव्हती. शिवाय बाहेरची व्यक्ती असल्यास संस्थानातील अंतर्गत राजकारणात ढवळाढवळ करण्याची तिची इच्छा होत नाही. या दोन्ही कारणांमुळे ब्रिटिश भारतातील विशेषतः उत्तरप्रदेशातील शिया मुस्लिमांना निमंत्रित करून संस्थानात अधिकारपदावर नेमण्याचे निजामाचे धोरण होते. त्याविरुद्ध हा पवित्रा होता.

१९३६ मध्ये सातवे निजाम मीर उस्मानअली खान राज्यावर येऊन पंचवीस वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने नंतर एक उत्सवही साजरा झाला. अर्थात त्यात जनतेचा सहभाग फारसा नव्हता. १९३५ च्या कायद्यान्वये भारतात काही प्रमाणात प्रांतिक स्वायतत्ता अस्तित्वात आली. छत्तीस साली झालेल्या निवडणुकांतून निवडलेल्या लोकप्रतिनिधींची सरकारेसुद्धा अस्तित्वात आली. हैदराबादच्या सरहद्दींना लागून असलेल्या मुंबई, मध्य प्रदेश आणि मद्रास या राज्यांत भारतीयांची मर्यादित स्वायतत्ता भोगणारी मंत्रिमंडळे स्थापन झालेली पाहून संस्थानातील लोकांच्या राजकीय अपेक्षा वाढणे स्वाभाविक होते. लोकांच्या डोळ्यात धूळफेक म्हणून काही थातुरमातुर उपाय

योजण्यात आले. १९३७ मध्येच निजामाने आरमदू अय्यंगार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून राजकीय सुधारणांबद्दल शिफारशी करण्याचे काम तिला दिले. या समितीत काँग्रेसच्या चळवळीशी संबंध असलेले एक मवाळ नेते व हैदराबाद शहरातील वकील काशीनाथराव वैद्य यांचा समावेश होता. अय्यंगार समितीवर मुख्य दडपण होते निजाम आणि मुस्लीम संघटनांचे. या दोन्हींची इच्छा प्रस्तावित केल्या जाणाऱ्या कायदेमंडळात हिंदुंचे बहुमत नसावे, कायदेमंडळाला मर्यादित अधिकार असावेत आणि मताधिकार सार्वत्रिक न करता तो शक्यतो मर्यादित ठेवावा अशी असणे स्वाभाविक होते. हैदराबाद संस्थानातील कारभारात मुस्लिमांना असलेले प्राधान्य आणि महत्त्व लोकशाही आल्यास कमी होईल ही साधार भीती इत्तेहादुल मुस्लमीन संघटनेला आणि तिच्या बहादूरयार जंगासारख्या नेत्यांना वाटत होती.

या पार्श्वभूमीवरच संस्थानातील सजग लोक आपण काय करावे याचा विचार करत होते. अखिल भारतीय काँग्रेसचे काम करण्याची परवानगी नव्या परिस्थितीत मिळणे शक्यच नव्हते. 'महाराष्ट्र संघ' या नावाने एक संघटना काढण्याचा विचार आनंद कृष्ण वाघमारे आणि अनंतराव कुलकर्णी या दोघांनी केला होता. हे दोघेही परतूरला झालेल्या अधिवेशनाला हजर होते व त्या अधिवेशनात 'महाराष्ट्र परिषद' या नावाने संघटना स्थापन करावी व तिच्याद्वारे राजकीय जागृती घडवून आणावी असा झालेला निर्णय त्यांनीही मान्य केला होता. मराठवाड्यातील त्यावेळी पाचही जिल्ह्यांतील तरुण परतूरला भरलेल्या अधिवेशनाला हजर होते. त्यात संस्थानातील ज्येष्ठ आणि तुलनेने थोडीशी मवाळ मंडळी अधिक संख्येने असली तरी गोविंदभाई श्रॉफ यांचे नेतृत्व मानणाऱ्या तरुणांची संख्याही त्यात लक्षणीय होती. या तरुणांत अनंत भालेराव यांचाही समावेश होता.

दरवर्षी महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन व्हावे असे ठरले होते. दोन अधिवेशनाच्या-दरम्यान सातत्याने महाराष्ट्र परिषदेचे कार्य चालू राहावे म्हणून एक स्थायी समितीही निवडण्यात आली होती. स्थायी समितीचे अध्यक्ष गोविंदराव नानल तर दिगंबरराव बिंदू आणि अनंतराव कुलकर्णी हे दोघे सरचिटणीस होते. नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे पुढे भारताचे पंतप्रधान झालेले पी. व्ही. नरसिंहराव यांची महाराष्ट्र परिषदेच्या

उपाध्यक्षपदी निवड झाली होती. नरसिंहराव तेलगू भाषिक असले तरी त्यांना उत्तम मराठी येत होते. परतूर अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या गोविंदराव नानलांनी मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चर्चा आपल्या अध्यक्षीय भाषणात केली. परतूरच्या अधिवेशनात संमत झालेले ठराव सरकारकडे पाठवण्याव्यतिरिक्त फारसे काम या वर्षात झालेले दिसत नाही.

महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन १ आणि २ जून १९३८ रोजी लातूरला भरले. परतूरचे अधिवेशन महाराजा किशनप्रसादांच्या जहागिरीत भरल्यामुळे सरकारी नियंत्रणांचा फारसा जाच तेथे झाला नव्हता. लातूरला मात्र सरकारने परिषदेला जेवढे म्हणून अडथळे आणता येतील ते सर्व अडथळे आणले. लातूरच्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते बॅ. श्रीनिवास शर्मा. तरुण आर्यसमाजी नेते असलेले शर्मा न्या. केशवराव कोरटकरांचे जावई होते. अधिवेशनाला सरकारने परवानगी, खळखळ करीत का होईना, दिली तरी अध्यक्षांची मिरवणूक आणि ध्वजवंदन या कार्यक्रमांना मनाई करण्यात आली. स्वागताध्यक्ष आणि अध्यक्ष यांची भाषणे जिल्हाधिकाऱ्यांना दाखवून मान्य करवून घ्यावी अशी अट सरकारने घातली होती. भाषणे तर पूर्वीच छापली गेली होती आणि ती प्रतिनिधींना वाटण्यातही आली होती. व्यासपीठावरून भाषण करताना स्वागताध्यक्ष किंवा अध्यक्ष आपले छापील भाषण वाचता-वाचता थांबून येथून पुढचा मजकूर वगळलेला आहे असे सांगत. श्रोत्यांच्या हातातील छापील प्रतीत तो मजकूर असेच व श्रोते तो मजकूर मनातल्यामनात वाचत. असा सगळा विनोदी प्रकार झाला. जिल्हाधिकाऱ्यांनी संमत होणारे ठरावही अडवून धरण्याचा प्रयत्न केला. शेवटी या प्रकारचा निषेध म्हणून अधिवेशन स्थगित करण्याच्या बाजूने प्रतिनिधींनी कौल दिला.

या अधिवेशनातच घडलेली महत्त्वाची घटना म्हणजे अंबाजोगाईचे शाळेचे चालक आणि मुख्याध्यापक स्वामी रामानंद तीर्थ यांना शाळेचे काम सोडून राजकारणासाठी पूर्णवेळ देण्याची विनंती करण्यात आली व ती त्यांनी मान्य केली. अधिवेशन संपल्याबरोबर स्वामीजी अंबाजोगाई सोडून हैदराबादला गेले. या संन्याशाच्या नेतृत्वाखाली निजामाच्या एकछत्री अमलाच्या विरोधातील स्वातंत्र्यलढा हैदराबादची जनता लढली.

स्वामीजी हैदराबादेत आले तरी शहरात जी श्रीमंत आणि मवाळ राजकारणी मंडळी होती त्यांनी स्वामीजींचा आपला नेता म्हणून मनोमन स्वीकार केलेला नव्हता व ते स्वाभाविकही होते. हैदराबादच्या लढ्याचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थांसारखा एक सर्वसंग परित्याग केलेला संन्याशीच उत्तम करू शकेल असे आनंद कृष्ण वाघमारे आणि इतरांना वाटले आणि त्यांनी स्वामीजींना शाळेचे मर्यादित क्षेत्र सोडून राजकारणात येण्याची विनंती केली होती. स्वामीजी हैदराबादेत आल्यानंतर सुमारे पंधरा दिवसांनी २९ जून १९३८ रोजी काशीनाथराव वैद्यांच्या घरी बी. रामकृष्णराव, जी. रामाचारी वगैरेंनी जी बैठक बोलावली व हैदराबाद स्टेट काँग्रेस संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला त्या बैठकीला स्वामीजी अगर वाघमारे, बिंदू अशा कोणालाही निमंत्रण नव्हते. स्वामीजी स्वतःच सभासद नोंदणी करणाऱ्या कार्यकर्त्यास भेटले व स्टेट काँग्रेसचे सभासद झाले.

स्टेट काँग्रेसच्या कामाला संस्थानात बंदी असल्यामुळे सत्याग्रह संपल्यानंतर १२-१३ सप्टेंबर १९३९ ला मनमाड येथे स्थायी समितीची एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून गोविंदराव नानल आणि चिटणीस म्हणून स्वामी रामानंद तीर्थ यांची निवड करण्यात आली. या समितीने स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवावी व तिला काम करू द्यावे यासाठी संस्थानी अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार आणि इतर मार्गाने प्रयत्न केले. स्टेट काँग्रेस असो वा महाराष्ट्र परिषद, संस्थानातील जनतेची मुख्य मागणी संस्थानात जबाबदार राज्यपद्धती सुरू करावी ही होती. जनतेच्या हक्कांचा तो गाभाच होता. जबाबदार राज्यपद्धतीची कल्पना आपल्याला पूर्णपणे अमान्य आहे हे निजामाने पुढे एका विशेष राजपत्राद्वारेच जाहीर केले.

८ ऑगस्ट १९४० रोजी भारताचे व्हाइसरॉय लिनलिथगो यांनी भारताला वसाहतीचे स्वराज्य देणे हेच ब्रिटिश शासनाचे अंतिम उद्दिष्ट आहे असे निःसंदिग्ध शब्दांत जाहीर केले; मात्र ही गोष्ट क्रमाक्रमाने अमलात येणार होती. त्यासाठी किती वेळ लागणार हे माहिती नव्हते. मात्र भारताचे स्वातंत्र्य नजीकच्या भविष्यकाळात येणार आहे आणि त्यासाठी भारताला तयार व्हावे लागणार आहे याची जाणीव महात्मा गांधींसारख्या लोकनेत्यांना होऊ लागली होती. स्वातंत्र्यानंतरच्या भारताचा कारभार चालवण्यासाठी

आणि लोकांचे नेतृत्व करण्यासाठी निष्ठावान कार्यकर्त्यांचा एक संच देशभर निर्माण व्हावा आणि त्यांचे नेतृत्व जनमानसात ठसावे अशी गांधीजींची इच्छा असणार. त्यानुसार त्यांनी सामुदायिक सत्याग्रहाच्या मोहिमेऐवजी निवडक कार्यकर्त्यांना वैयक्तिक सत्याग्रह करण्याची परवानगी द्यावी असा निर्णय घेतला.

सत्याग्रह करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांची वैचारिक तपासणी करून मग त्यांना सत्याग्रहाची परवानगी देण्यात येत असे. हैदराबाद संस्थानात स्वामीजी आणि इतर चार लोकांना सत्याग्रहाची परवानगी मिळाली होती. स्वामीजी, हिरालाल कोटेचा, मोतीलाल मंत्री, अच्युतभाई देशपांडे, देवरामभाई चौहाण हे पाच जण सत्याग्रह करून तुरुंगात गेले. इकडे मजलिस इतेहादुल मुस्लमिन या जातीयवादी संघटनेने आक्रमक भूमिका घेत हैदराबादला स्वातंत्र्य द्यावे, निजामाकडून ब्रिटिशांनी घेतलेले भूभाग परत करावेत, निजामाचे सैन्य वाढवण्यात यावे अशा मागण्या चालवल्या होत्या. मार्च १९४१ मध्ये तर सिकंदराबादेत पाकिस्तान दिनही साजरा करण्यात आला होता. जबाबदार सरकार म्हणजे हिंदू बहुसंख्येचे सरकार हे उघडच होते कारण संस्थानात हिंदूंची संख्या ८५ टक्के होती. त्यामुळे जबाबदार राज्यपद्धती निजाम आणि मुस्लिम नेते कोणालाच नको होती.

अशा परिस्थितीत राजकीय जागृतीचे काम करण्यासाठी संघटना बांधण्याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक होते. महाराष्ट्र परिषदेच्या शाखा मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत व महत्त्वाच्या तालुक्यांत स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू झाले. प्रत्येक जिल्ह्याला एक संघटक नेमण्यात आला. औरंगाबाद जिल्हा कार्यालयात कार्यालय चिटणीस म्हणून अनंत भालेराव यांनी काम करावे असे ठरले व अनंतराव औरंगाबादला आले. सुपारी मारुतीजवळ एक भाड्याचे घर घेऊन अनंतरावांचे कुटुंब राहू लागले. पत्नी सुशीलाबाई, अरुण, सविता आणि अशोक ही तीन मुले आणि धाकटा भाऊ जयकृष्ण असे सर्व त्या छोट्याशा जागेत राहत. जागेच्या गुजराती मालकीणबाई भाडे घेत नसाव्यात. महाराष्ट्र परिषदेचे कार्यालय किराणा चावडीजवळील संग्रामसिंह चौहानांच्या जागेत होते. अनंतराव त्या कार्यालयात काम करू लागले. महाराष्ट्र परिषदेच्या पूर्णवेळ कार्यकर्त्यांना त्यावेळी ३० रुपये दरमहा मानधन दिले जाई. त्यात सुशीलाबाईंना संसार भागवावा लागे.

औरंगाबादच्या कार्यालयातील कामाचे मार्गदर्शन गोविंदभाई श्रॉफ करीत. इतर जिल्ह्यांतील कामात सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने गरजेप्रमाणे बाहेरून संघटक पाठवण्याची गरज भासू लागली. त्यानुसार औरंगाबादेतील सुमारे वर्षभराच्या कामानंतर अनंतरावांना परभणीला पाठवण्यात आले. श्रीनिवासराव बोरीकर आणि मुकुंदराव पेडगावकर यांच्या मार्गदर्शनानुसार अनंतराव परभणी जिल्ह्यातील महाराष्ट्र परिषदेची संघटनात्मक जबाबदारी सांभाळू लागले. वडगल्लीतल्या मधुकर फुटाण्यांच्या वाड्यात अनंतरावांचे बिऱ्हाड नांदू लागले.

महाराष्ट्र परिषदेची सभासद नोंदणी करणे, नवीन कार्यकर्ते शोधणे, लोकांच्या तक्रारींची नोंद घेणे व जातीय जुलमाविरुद्ध लोकांचे मनोबल वाढवणे अशी कामे अनंतराव करू लागले. युद्धाच्या शेवटच्या पर्वात आणि त्यानंतरही काही काळ सर्वच आवश्यक वस्तूंची टंचाई संस्थानात जाणवत होती. पेट्रोल, डिझेल; रॉकेल हे तर बाहेरूनच येई; पण संस्थानात धान्याची टंचाईही मोठ्या प्रमाणात जाणवत होती. सरकारने शेतकऱ्यांकडून धान्य जमा करण्यासाठी दोन योजना केलेल्या होत्या. पहिली म्हणजे लेव्ही. शेतकऱ्याच्या जमिनीच्या व उत्पन्नाच्या प्रमाणात ठरावीक धान्य त्यांच्याकडून सक्तीने सरकार विकत घेई त्याचे नाव लेव्ही. दुसरी होती खुशखरेदी. खुशीने, राजीमर्जीने जर शेतकऱ्याला लेव्हीपेक्षा अधिक धान्य द्यावयाचे असेल तर ते सरकार खुशखरेदी म्हणून विकत घेई. लेव्ही आणि खुशखरेदी या दोन्हींचे कागदावरचे नियम वेगळे आणि प्रत्यक्षात सरकारी अधिकाऱ्यांच्या दडपशाहीचे नियम वेगळे असत. लेव्हीचे नियम काय आहेत हे सामान्य शेतकऱ्यांपर्यंत न जाऊ देता दंडामुडपीने अधिक धान्य देण्यास त्यांना भाग पाडले जाई. त्यासाठी सर्व प्रकारचे मार्ग महसूल खात्याचे अधिकारी वापरीत व पोलिसांचेही साह्य घेत.

लेव्हीबद्दल होणाऱ्या सरकारी जुलमामुळे शेतकऱ्यांत मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला होता. महाराष्ट्र परिषदेच्या कार्यकर्त्यांनी लेव्हीचे उर्दूतील नियम मराठीत भाषांतर करून त्याच्या प्रती गावोगाव वितरित केल्या. नियमापेक्षा अधिक धान्य जबरदस्तीने मागितले तर ते देऊ नका असा प्रचारही ते करू लागले. सरकारी दडपशाहीच्याविरुद्ध शेतकऱ्यांना संघटित करू लागले. आजवर स्वातंत्र्याची चळवळ

बहुतांशी मध्यमवर्गापुरती मर्यादित होती; ती आता लेव्हीजुलुमाविरुद्धच्या आंदोलनामुळे खेडोपाडी पसरली व ग्रामीण भागातील शेकडो लोक स्वातंत्र्याच्या चळवळीत सामील झाले. परभणी जिल्ह्यात यानिमित्ताने लोकजागृती करण्यात अनंतरावांचा मोठाच भाग होता.

परभणीत काही दिवस काम केल्यानंतर अनंतरावांना नांदेड जिल्ह्याचे संघटक म्हणून पाठवण्यात आले. औरंगाबादमध्ये गोविंदभाई श्रॉफ, परभणीत श्रीनिवासराव बोरीकर आणि मुकुंदराव पेडगावकर आणि नांदेडला भगवानराव गांजवे, शामराव बोधनकर आणि गोपाळशास्त्री देव असे ज्येष्ठ कार्यकर्ते मार्गदर्शन करीत; पण प्रत्यक्ष जबाबदारीचे काम तरुण कार्यकर्ते करीत. महाराष्ट्र परिषदेला मिळालेल्या अशा कार्यकर्त्यांपैकी अनंत भालेराव आणि नागनाथ परांजपे हे प्रमुख होते. अनंतरावांना औरंगाबाद, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यांची जबाबदारी वेगवेगळ्या वेळी सोपविण्यात आली तर नागनाथ परांजपे यांना बीडला पाठवण्यात आले होते. त्यापूर्वी काही दिवस निजामाबाद जिल्ह्याचेही काम नागनाथराव बघत होते. लाला बिंदाप्रशाद यांना औरंगाबाद आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांचे काम काही काळ देण्यात आले होते. याव्यतिरिक्त जिल्हा संघटक म्हणून काम करण्यासाठी काही कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची निवड झालेली दिसते. औरंगाबादला चंद्रगुप्त चौधरी, बीडला आर.डी. देशपांडे आणि नांदेडला व्ही.डी. देशपांडे अशा कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी जिल्हा संघटक म्हणून काम केलेले आहे. १९४४-४५ मध्ये महाराष्ट्र परिषदेच्या पूर्णवेळ कार्यकर्त्यांची संख्या ३५ होती आणि त्यापैकी फक्त १९ लोकांना दरमहा तीस रुपये मानधन दिले जात होते. महाराष्ट्र परिषदेच्या प्राथमिक सभासदांची संख्या यावेळी सोळा हजारांच्या जवळपास होती; वर्षभरातच ती ३४ हजारांवर गेली.

१९४५-४६ च्या सुमाराला अनंतराव महाराष्ट्र परिषदेचे नांदेड जिल्हा संघटक म्हणून नांदेडला दाखल झाले. शामराव बोधनकर आणि त्यांचे बंधू जीवनराव यांचे घर हे कार्यकर्त्यांचे आणि संघटनेचे आश्रयस्थानच असे. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर खेडोपाडी फिरून अनंतराव राजकीय जागृती करीत होते. २१ ऑक्टोबर १९४६ रोजी स्टेट कॉंग्रेसचे एक कार्यकर्ते गोविंदराव पानसरे हे त्यांच्यावर भरलेल्या एका

खटल्यासाठी न्यायालयात हजर राहून परत येत असताना गुंडांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा खून केला. गांधीजींच्या मार्गाने विधायक काम करीत असलेल्या पानसऱ्यांच्याविषयी जनमानसात खूपच आदर होता. बिलोली कोर्टाने त्यांना जामीनावर सोडल्यानंतर ते बैलगाडीत बसून कोंडलवाडीकडे जात असताना रस्त्यात अर्जापूर नजीक त्यांचा खून झाला होता. या खुनामुळे नांदेड जिल्ह्यात संतापाची लाटच उसळली. पानसऱ्यांचा खून सोमवारी झाला होता त्यामुळे दर सोमवारी खुनाच्या जागेवर यात्रा भरू लागली.

६ जानेवारी १९४७ रोजी पानसऱ्यांच्या स्मृतियात्रेत वीस-पंचवीस हजार लोक जमले होते. सभेला परवानगी नसूनही तेथे सभा घेण्याचे काँग्रेसने ठरवले. बिलोलीचा फौजदार झैदी वीस सशस्त्र पोलिसांना घेऊन तेथे आला. पानसरे यांच्या तात्पुरत्या समाधीजवळ चार सशस्त्र पोलीस उभे होते. सभा सुरू झाली आणि तेवढ्यात पोलिसांची व्हॅन भरधाव समाधीजवळ आली. गाडी आपल्या अंगावर येऊ नये म्हणून बसलेले स्त्री-पुरुष आणि मुले यांच्यात पळापळ झाली. झैदीने गोळ्या झाडण्याचा हुकूम केला आणि या गोळीबारात तीन लोक ठार आणि पाच जण जखमी झाले. जमलेल्या व शांतपणे बसलेल्या लोकांवर गोळ्या झाडण्यात आल्या व ते मृत्युमुखी पडले हे पाहताच लोक संतप्त झाले. त्यांनी पोलिसांना घेरले. अनंतरावांनी आपल्या सहकाऱ्यांसह लोकांना मोठ्या मुश्किलीने आवरले नसते तर लोकांनी काही पोलिसांना मारून टाकले असते. शेवटी लोक पांगले आणि मोठा अनर्थ टळला.

जुलै १९४६ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी उठल्यानंतर १६ ते १८ जून १९४७ रोजी स्टेट काँग्रेसचे पहिले अधिवेशन हैदराबाद येथे भरले. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या अधिवेशनात लोकांचा उत्साह जबरदस्त होता. अधिवेशनाने स्वातंत्र्यासाठी निर्णायक लढ्याची घोषणा केली. बेचाळीस सालच्या गोवालिया टँकवरील अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनाची आठवण करून देईल असे वातावरण होते. स्टेट काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक २९, ३० जून आणि १ जुलै १९४७ रोजी संस्थानाबाहेर सोलापूर येथे भरली. कार्यकारिणीने कृतिसमिती नेमण्याचा अधिकार अध्यक्षांना दिला. कृतिसमितीने आखलेल्या कार्यक्रमात

सरकारशी असहकार करावा, विधानसभा, नगर परिषदा, जिल्हा बोर्डस् आणि ग्रामपंचायती याच्या सभासदांनी राजीनामे द्यावेत, सरकारी बँकांतील ठेवी काढून घ्याव्यात, धान्य वसुलीला सहकार्य देऊ नये, सरकारी कार्यक्रमावर बहिष्कार टाकावा, ७ ऑगस्टला संघराज्यात सामील होण्याचा निर्धार प्रगट करणारा संघराज्य दिन पाळावा आदींचा समावेश होता.

इतेहादुल मुस्लमीनने 'रझाकार' नावाची एक स्वयंसेवक संघटना उभारली होती. नाव स्वयंसेवक संघटनेचे असले तरी प्रत्यक्षात ती गुंडगिरीला प्रोत्साहन देणारी संघटना होती. असाहाय्य हिंदूवर अत्याचार करणे आणि हिंसक हल्ले करणे हा संघटनेचा प्रत्यक्षातील कार्यक्रम होता. केवळ वैधानिक सत्याग्रहाने अशा गुंडगिरीला प्रतिकार करणे अवघड होते. लढ्याचे मार्गदर्शन करणाऱ्या कृतिसमितीने लोकांचे मनोधैर्य कायम ठेवण्यासाठी संस्थानच्या सरहद्दीवर प्रतिकार शिबिरे उभारावीत व त्यातील कार्यकर्त्यांना सशस्त्र प्रतिकाराची परवानगी द्यावी असा निर्णय घेतला होता. गांधीजींच्याही कानावर हा निर्णय घालण्यात आला होता. कृतिसमितीचा एक कार्यक्रम जंगल सत्याग्रह हा होता. संस्थानात कोणत्याही खासगी शेतजमिनीत शिंदीची झाडे उगवत. शिंदीच्या झाडाचे उत्पन्न सरकारी समजले जाई. त्यामुळे ती आपल्या शेतात असली तरी शेतकऱ्याला तोडता येत नसत. जंगल सत्याग्रहात अशी झाडे तोडून टाकायची हा मुख्य भाग होता. शिवाय सरकारी मालकीची इतर झाडेही तोडण्यात येणार होती.

ऑक्टोबर, १९४७ मध्ये जंगल सत्याग्रह सुरू झाला. नांदेड जिल्ह्यात या कार्यक्रमाचा विशेष जोर होता. अनंत भालेराव, नागनाथ परांजपे आणि रघुनाथ रांजणीकर हे तीन पूर्णवेळ कार्यकर्ते या भागात काम करत होते. ऑक्टोबर, १९४७ मध्ये बारड गावात कार्यकर्ते जमले. बारड आणि लहान या दोन गावांतील राजाराम देशमुख, साहेबराव देशमुख आणि आबासाहेब लहानकर यांच्या पुढाकाराने जंगल सत्याग्रह करण्याचे ठरले. सात-आठ हजार लोक पाटनूरकडे निघाले. तीन-चार तासांत कुऱ्हाडी घेतलेल्या या मंडळींनी अनेक झाडे- त्यात सरकारी जंगलही होते- जमीनदोस्त केली. बारा पोलिसांच्या छोट्याशा तुकडीने पिछाडीवर असलेल्या काही सत्याग्रहींना पकडले हे

सरकारशी असहकार करावा, विधानसभा, नगर परिषदा, जिल्हा बोर्डस् आणि ग्रामपंचायती याच्या सभासदांनी राजीनामे द्यावेत, सरकारी बँकांतील ठेवी काढून घ्याव्यात, धान्य वसुलीला सहकार्य देऊ नये, सरकारी कार्यक्रमावर बहिष्कार टाकावा, ७ ऑगस्टला संघराज्यात सामील होण्याचा निर्धार प्रगट करणारा संघराज्य दिन पाळावा आदींचा समावेश होता.

इतेहादुल मुस्लमीनने 'रझाकार' नावाची एक स्वयंसेवक संघटना उभारली होती. नाव स्वयंसेवक संघटनेचे असले तरी प्रत्यक्षात ती गुंडगिरीला प्रोत्साहन देणारी संघटना होती. असाहाय्य हिंदूवर अत्याचार करणे आणि हिंसक हल्ले करणे हा संघटनेचा प्रत्यक्षातील कार्यक्रम होता. केवळ वैधानिक सत्याग्रहाने अशा गुंडगिरीला प्रतिकार करणे अवघड होते. लढ्याचे मार्गदर्शन करणाऱ्या कृतिसमितीने लोकांचे मनोधैर्य कायम ठेवण्यासाठी संस्थानच्या सरहद्दीवर प्रतिकार शिबिरे उभारावीत व त्यातील कार्यकर्त्यांना सशस्त्र प्रतिकाराची परवानगी द्यावी असा निर्णय घेतला होता. गांधीजींच्याही कानावर हा निर्णय घालण्यात आला होता. कृतिसमितीचा एक कार्यक्रम जंगल सत्याग्रह हा होता. संस्थानात कोणत्याही खासगी शेतजमिनीत शिंदीची झाडे उगवत. शिंदीच्या झाडाचे उत्पन्न सरकारी समजले जाई. त्यामुळे ती आपल्या शेतात असली तरी शेतकऱ्याला तोडता येत नसत. जंगल सत्याग्रहात अशी झाडे तोडून टाकायची हा मुख्य भाग होता. शिवाय सरकारी मालकीची इतर झाडेही तोडण्यात येणार होती.

ऑक्टोबर, १९४७ मध्ये जंगल सत्याग्रह सुरू झाला. नांदेड जिल्ह्यात या कार्यक्रमाचा विशेष जोर होता. अनंत भालेराव, नागनाथ परांजपे आणि रघुनाथ रांजणीकर हे तीन पूर्णवेळ कार्यकर्ते या भागात काम करत होते. ऑक्टोबर, १९४७ मध्ये बारड गावात कार्यकर्ते जमले. बारड आणि लहान या दोन गावांतील राजाराम देशमुख, साहेबराव देशमुख आणि आबासाहेब लहानकर यांच्या पुढाकाराने जंगल सत्याग्रह करण्याचे ठरले. सात-आठ हजार लोक पाटनूरकडे निघाले. तीन-चार तासांत कुहाडी घेतलेल्या या मंडळींनी अनेक झाडे- त्यात सरकारी जंगलही होते- जमीनदोस्त केली. बारा पोलिसांच्या छोट्याशा तुकडीने पिछाडीवर असलेल्या काही सत्याग्रहींना पकडले हे

ऐकताच खवळलेल्या लोकांनी पोलिसांना घेरले. अनंत भालेराव आणि आबासाहेब लहानकर हे पोलीस उभे होते तेथेपर्यंत हिंमतीने गेले. पोलीस सशस्त्र होते आणि अनंतराव आणि आबासाहेब पूर्णपणे नि:शस्त्र; पण पोलिसांची हिंमतच पूर्णपणे खचली होती. नि:शस्त्र अनंतराव आणि आबासाहेबांनी पोलिसांची शस्त्रे काढून घेतली. अंगावरील गणवेश उतरावयास लावून त्यांना खांद्यावर तिरंगी झेंडा घेऊन फिरण्यास भाग पाडण्यात आले. या गोष्टीमुळे लोकांचे समाधान झाले व त्यांनी पोलिसांना सुरक्षित परत जाऊ दिले. प्रकरण चिघळले असते आणि अनंतराव आणि आबासाहेबांनी मध्यस्थी केली नसती तर दोन्ही बाजूने हिंसाचार झाला असता. हे दृश्य सात-आठ हजार लोक समक्ष पाहत होते. लोकांचे मनोधैर्य उंचावण्यासाठी हा प्रसंग उपयोगी पडला.

लेव्हीबद्दल होणाऱ्या जुलुमाचा निर्देश वर आलाच आहे. मुधोळ तालुक्यातील किरगुळ या मोठ्या गावाच्या आसपासच्या पंधरा-वीस खेड्यांतील लोकांची तक्रार अशी होती की मागच्या वर्षी पिकांची नीट पाहणी न करताना जबरदस्तीने जास्त लेव्ही वसूल करण्यात आली आहे. यंदा पिके चांगली नाहीत. सरकारने व्यवस्थित पाहणी करावी आणि खऱ्या आणेवारीची नोंद करून घ्यावी. सरकारने याबद्दल काहीच केले नाही. एकीकडे संतापलेले लोक आणि दुसरीकडे लेव्ही वसूल करण्यासंबंधी वरिष्ठांचा आग्रह अशा कात्रीत सापडलेला नांदेडचा कलेक्टर शहाबुद्दीन रजा घेऊन हैदराबादला जाऊन बसला. त्यांच्या जागेवर विल्यम बी. बट या नावाचा जिल्हाधिकारी आला. त्याने जबरदस्तीने लेव्ही वसूल करण्याचे ठरवले. पोलिसांची आणि लष्कराची तुकडी त्याने आणून ठेवली. लेव्ही मागण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यासमोर गावातल्या बायका आडव्या पडत आणि त्यांना घरात जाणेच मुश्किल होई. लेव्ही न देणाऱ्या काही शेतकऱ्यांच्या घरावरील पत्रे काढून जप्त करण्यात आले. रात्री काही तरुण मुलांना पकडून पोलीस घेऊन गेले. कार्यकर्त्यांनी तेवढेच पोलीस पळवून आणले. आमच्या मुलांना सोडा म्हणजे पोलिसांना सोडू असा निरोप पाठवण्यात आला. प्रतिकार करणारी तरुण मुले सुटली आणि पोलिसांनाही सुखरूप परत पाठवून देण्यात आले. लेव्ही विरोधी लढ्यात किरगुळ हे एवढे प्रसिद्ध झाले की स्वामीजींनीही या गावाला भेट दिली. अन्यायाच्या विरुद्ध लढण्याची हिंमत किरगुळ भागाने शिकवली.

संस्थानच्या हद्दीत काम करणे आता खूपच कठीण झाले होते. कोणत्याही क्षणी अटकही होण्याची शक्यता होती. बारड हे अनंतराव आणि इतरांना आश्रय देणारे गाव होते. बारडला मुक्कामाला असतानाच अनंतराव टाईफाईडने आजारी पडले. रोगाचे निदान झाल्यावर त्यांना उपचारासाठी नांदेडच्या सरसरांच्या घरात असलेल्या काँग्रेसच्या कार्यालयात हलवण्यात आले. काही दिवसांनी बरे झाल्यावर सरहद्दीबाहेर शिबिरात दाखल होण्याचा त्यांनी निर्णय घेतला. नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्यालय संस्थानाबाहेर यवतमाळ जिल्ह्यातल्या उमरखेड येथे सुरू करण्यात आले होते. अनंतराव कार्यालय सांभाळण्यासाठी उमरखेडला गेले. तेथेच एक प्रतिकार शिबिरही सुरू झाले होते. त्या शिबिरात अनंतराव दाखल झाले.

## ४. अहिंसकांची शस्त्रसंगत

एखाद्या सरंजामदारांच्या सत्तेने जर गुंडगिरीला राजाश्रय दिला आणि त्यांच्या सर्व प्रकारच्या जुलमांकडे डोळेझाकच नव्हे तर साह्य करावयाचे ठरवले तर हतबल झालेली जनता काय करील? अशा सरकारविरुद्ध केवळ अहिंसक सत्याग्रह नेहमीच प्रभावी ठरेल असे नाही. हैदराबाद संस्थानात हिंदूंना भयभीत करावयाचे व संस्थान सोडण्याला भाग पाडावयाचे असे धोरण मजलिस इतेहादुल मुस्लमीन या राजकीय संस्थेने व रझाकार या तिच्या स्वयंसेवक संघटनेने आखले आणि १९४५-४६ पासून आजवर संस्थानात तुरळक अस्तित्वात असलेल्या गुंडगिरीला संघटित रूप प्राप्त झाले. प्रक्षोभक भाषणे करून चिथावणी देणे हा रोजचा कार्यक्रम झाला व त्याचे परिणामही दिसू लागले. १९४० साली दोन व्यक्तीतील किरकोळ भांडणाचे निमित्त करून बीदर या जिल्ह्याच्या ठिकाणची बाजारपेठच- ज्यात हिंदू व्यापाऱ्यांची दुकाने होती- जाळून टाकण्यात आली. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचे एक कार्यकर्ते गोविंदराव पानसरे हे त्यांच्यावर भरलेल्या राजकीय खटल्यातील सुनावणीला हजर राहून परतत असताना २१ ऑक्टोबर १९४६ रोजी नांदेड जिल्ह्यातील अर्जापूर येथे त्यांचा खून करण्यात आला. पुढे अशीच प्रकरणे संस्थानभर होऊ लागली. २२ मार्च १९४८ रोजी औंढा नागनाथ या ज्योतिर्लिंग स्थानी देवळाचे दरवाजे बंद करून मंदिराच्या आवारात बॉम्बचा स्फोट करण्यात आला व स्त्रियांचे विनयभंगाचे आणि त्यांचे दागिने काढून घेण्याचे प्रकार घडले. लोहा या कंधार तालुक्यातील मोठ्या गावात रझाकारांनी ट्रकमध्ये येऊन हल्ला केला व गावातील गडीवर असलेल्या मक्तेदार आणि पटवाऱ्यांच्या घरात घुसून लुटालूट केली आणि दोघांना ठार करण्यात आले. रोहिले आणि रझाकार यांच्या या दिवसाउजेडी करण्यात आलेल्या गुंडगिरीविरुद्ध तहसीलदारांनी केलेली तक्रार दुर्लक्षिण्यात आली व त्याला तू अशा गोष्टीत लक्ष

घालू नको असा सल्ला देण्यात आला. सतप्रवृत असलेल्या त्या तहसीलदाराने-फरीद मिर्झा यांनी सरकारी नोकरीचाच राजीनामा दिला. लोकांना आपले सामर्थ्य कळावे व दहशत बसावी म्हणून राजधानी हैदराबादेत तसेच संस्थानातील अनेक गावांत रझाकारांनी सशस्त्र मिरवणुका काढण्याचा क्रम सुरू केला. भारत सरकारने हैदराबादेतील परिस्थितीबाबत पुढे जी श्वेतपत्रिका प्रकाशित केली त्यात दिलेल्या आकडेवारीप्रमाणे संस्थानातील १४४१ खेड्यांतून १७ कोटी ८५ हजार ३८७ रुपयांची लूट करण्यात आली. ८७८८ घरे जाळण्यात आली. ९२१ खून पडले व हजारावर बलात्कराची प्रकरणे झाली अशी माहिती देण्यात आली आहे. रझाकारांच्या क्रूर कृत्यांची आकडेवारी पाहिली म्हणजे कोणाच्याही अंगावर शहारा येईल.

जुलै १९४७ च्या शेवटच्या आठवड्यात हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक सोलापुरात झाली. १६ ते १८ जून रोजी हैदराबाद शहरात झालेल्या स्टेट काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात लढ्याचे रणशिंग फुंकण्यात आले होते व कोणत्याही क्षणी पुढाऱ्यांची धरपकड होऊ शकत होती. १९४२ च्या मुंबई काँग्रेस अधिवेशनाचा अनुभव सर्वांच्या स्मरणात होता. सोलापूरच्या बैठकीत लढ्यासाठी एक कृतिसमिती स्थापन करण्याचा अधिकार अध्यक्ष स्वामीजींना देण्यात आला होता. त्यांनी नेमलेल्या या कृतिसमितीत स्वतः स्वामीजी नव्हते. ते सत्याग्रह करून तुरुंगात जाणार होते. कृतिसमितीचे सदस्य मात्र संस्थानाबाहेर राहून लढ्याचे नेतृत्व करणार होते. त्यात दिगंबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ वगैरेंचा समावेश होता.

भारताच्या स्वातंत्र्याच्या आगमनाच्या नौबती झडू लागल्या होत्या. ७ ऑगस्टला भारतीय संघराज्यात स्थापन होण्याचा निर्धार व्यक्त करण्यासाठी संस्थानातील जनतेने संघराज्यदिन पाळावा व भारत स्वतंत्र होईल त्या दिवशी म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्यदिन, भारताचा राष्ट्रध्वज उभारून साजरा करावा असा आदेश कृतिसमितीने दिला होता. या प्रमाणे ठिकठिकाणी कार्यक्रम झाले. संस्थानात भारताचा राष्ट्रध्वज हा परकीय ध्वज ठरवणारा आणि तो उभारणे गुन्हा ठरवणारा एक हुकूम जारी करण्यात आला होता, तरीही लोकांनी धैर्याने राष्ट्रध्वज उभारले. अनेक ठिकाणी लोकांची धरपकड झाली. काही ठिकाणी राष्ट्रध्वज हातात घेऊन मिरवणुकाही काढण्यात

आल्या. तो एक सत्याग्रहच होता. त्याही लोकांना अटक करून त्यांच्यावर खटले भरण्यात आले.

संस्थानातील जनतेचे मनोधैर्य टिकविण्यासाठी संस्थानच्या सरहद्दीवर प्रतिकार शिबिरे उभारावीत, शिबिरातील कार्यकर्त्यांनी शस्त्रे मिळवावीत आणि संस्थानच्या हद्दीत घुसून संस्थानात येणाऱ्या मालावरील जकात वसून करणारी सरहद्दीवरील करोडगिरी नाकी, पोलीस ठाणी आणि रझाकारांचे अड्डे यावर हल्ले करावेत असा कार्यक्रम आखण्यात आला होता. शक्यतो मनुष्यहानी होऊ नये याची काळजी घ्यावयाची होती; परंतु काहींना काही हानी तर होणारच होती.

संस्थानातील कार्यकर्त्यांना मोडतोडीचे किंवा शस्त्रास्त्र चालविण्याचे काहीच शिक्षण नव्हते. सशस्त्र चळवळ करायची तर निदान प्राथमिक माहितीतरी आवश्यक होती. कृतिसमितीने निवडक कार्यकर्त्यांची एक बैठक मनमाडला बोलावली. त्या बैठकीला शिरुभाऊ लिमये, धुळ्याचे उत्तमराव पाटील आणि गुजरातचे छोटूभाऊ पुराणिक हजर होते. भूमिगत कार्य कसे करावे आणि बॉम्ब कसे तयार करावे याबद्दलचेही मार्गदर्शन छोटूभाऊंनी केले. या शिबिराला बाबासाहेब परांजपे हजर होते. बाबासाहेबांनी पुण्यात प्रकाशक रा.ज. देशमुखांच्या जागेत बॉम्ब तयार करण्याचा कारखानाच काही दिवस चालवला. बाबासाहेब परांजपे, रा.ज. देशमुख, कॉन्टिनेंटल प्रकाशनाचे अनंतराव कुलकर्णी आदी अनेक लोकांना मुंबई सरकारच्या पोलिसांनी अटक केली. त्यानंतर ते केंद्र सोलापूरला हलवण्यात आले. मिळेल तेथून शस्त्रे मिळवण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. मध्यप्रदेशात अधिकारारूढ असलेल्या रविशंकर शुक्ला- द्वारकाप्रसाद मिश्रा यांच्या मंत्रिमंडळाची हैदराबाद लढ्याला पूर्ण सहानुभूती होती व त्यांनी शस्त्रे मिळवून देण्यालाही साह्य केले. काही कार्यकर्त्यांचे शस्त्रेशिक्षणही करविण्याची त्यांनी व्यवस्था केली होती.

निकामी म्हणून एखादे शस्त्र निकालात काढण्याची सोय होती. चांगली शस्त्रे निकामी ठरवून ती हस्तांतरित करायची असे अनेक मार्ग अवलंबविण्यात आले. शस्त्रे पुरवावयाची हे ठीक; पण ती कोणाच्या हातात देणार? चुकीच्या माणसांच्या हातात शस्त्रे पोहोचली तर अनर्थ ओढवू शकणार होता. शेवटी कृतिसमितीने सीताराम

पप्पू यांना आपले प्रतिनिधी ठरवून मध्यप्रदेश सरकारला तसे सांगितले. गोविंदभाईंच्या सहीची चिठ्ठी आणली म्हणजे मग शस्त्र दिले जाई. पेट्रोल तेव्हा दुर्मिळ झाले होते. त्यासाठीही मध्यप्रांत सरकारने कुपने दिली. मोडतोडीसाठी जिलेटिनच्या कांड्या आवश्यक असतात. विदर्भात अनेक खनिजांच्या खाणी होत्या. त्यांना खोदकामासाठी जिलेटिन लागे. मध्यप्रदेश सरकारात मंत्री असलेल्या आणि पूर्वी सनदी सेवेत असलेल्या गांधीवादी रा.कृ. पाटलांनी एका खाणमालकाला बोलावून त्याच्या साठ्यापैकी काही जिलेटिन हैदराबाद कार्यकर्त्यांना द्यायला लावले. अशी सर्व मदत मध्यप्रदेशातून झाली.

सर्वात अवघड बाब होती गांधीजींच्या कानावर लढ्याचे हे शस्त्रवळण घालण्याची. आजवरचा हैदराबाद लढा अहिंसक होता आणि त्याचे मार्गदर्शक गांधीजीच होते. आता प्राप्त परिस्थितीमुळे अपवाद म्हणून हातात शस्त्रे घ्यावी लागणार होती. गोविंदभाई गांधीजींना दिल्लीत भेटले आणि त्यांनी ही गोष्ट गांधीजींना स्पष्टपणे सांगितली. गांधीजींची प्रतिक्रिया फार नेमकी आणि महत्त्वाची होती. ते म्हणाले, "भ्याडाप्रमाणे पळून जाण्याऐवजी लोक शस्त्र घेऊन का होईना मुकाबला करताहेत ही समाधानाची गोष्ट आहे." संस्थानातील असह्य परिस्थिती गांधीजींनी लक्षात घेतली होती.

शामराव बोधनकर, भगवानराव गांजवे आणि गोपाळशास्त्री हे नांदेड जिल्हा काँग्रेसचे नेते अगोदरच उमरखेडला पोहोचले होते. जिल्हा काँग्रेसचे कार्यालय उमरखेडला हलवण्यात आले होते. अनंतराव कार्यालयाची जबाबदारी पार पाडत होतेच; त्याचबरोबर शिबिरात एक कार्यकर्ते म्हणूनही दाखल झाले. नागनाथ परांजपे हे अनंतरावांचे शाळेपासूनचे मित्र. तेही याच शिबिरात दाखल झाले. एक निधड्या छातीचा जिवावर उदार होणार कार्यकर्ता म्हणून लढ्याच्या काळात नागनाथ परांजपे लोकांना ओळखीचे झाले.

सरहद्दीवरील प्रत्येक शिबिरातील प्रमुख कार्यकर्ते हाती घ्यावयाच्या मोहिमांच्या योजना आखत. उमरखेड शिबिरातील कार्यकर्त्यांनी अठ्ठेचाळीस सालच्या प्रारंभी एका धाडसी मोहिमेची आखणी केली. सुमारे शंभर-सव्वाशे कार्यकर्ते या मोहिमेत

भाग घेणार होते. प्रत्यक्ष कोठे हल्ला करावयाचा आहे याची फारशी वाच्यता करण्यात आली नाही.

मोहीम मोठ्याच धाडसाची आणि जोखमीची होती. पेणगंगा ओलांडून निजामी हद्दीत बरेच आत असलेल्या उमरी या गावी असलेल्या हैदराबाद स्टेट बँकेच्या शाखेवर हल्ला करायचा होता. स्टेट बँक ऑफ हैदराबादच्या सर्वत्र असलेल्या शाखा निजाम सरकारच्या अधिकोषाचेही काम करीत. उमरी गाव बरेच मोठे होते आणि गावात एक पोलीस ठाणेही होते. पोलिसांचा प्रतिकार होणारच होता. सहकाऱ्यांपैकी कोणीही प्राण गमावू शकत होते. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारताचा स्वातंत्र्यलढा मुख्यतः अहिंसक असताना बेचाळीसच्या चळवळीत मोडतोडीचे आणि परकीय सरकारच्या खजिन्याची लूट करण्याचे प्रकार ब्रिटिश मुलखात झाले होते. उमरीच्या बँक शाखेवरील हल्ल्याचा मुख्य उद्देश निजामी राजवटीला आणि तिला पूरक म्हणून काम करणाऱ्या रझाकारासारख्या प्रवृत्तींना दहशत निर्माण करणे हा होता. अर्थात लढ्यासाठी निधी तर हवाच होता.

पेणगंगा ओलांडली आणि काही मंडळी ढेपाळली. वेगवेगळी कारणे सांगून ते अंग काढून घेऊन परत जाण्याचा विचार बोलू लागले. सर्वांच्या पिछाडीला चालत होते नागनाथ परांजपे. ऐन मोक्याच्या क्षणी दगा देणाऱ्या सहकाऱ्यांची गय करणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. त्यांनी सरळ हातातल्या रायफलीने ढेपाळणाऱ्या एकाच्या पायावर प्रहार केले आणि तो विव्हळू लागला; पण नंतर मुकाट्याने बरोबर चालू लागला.

उमरखेडहून निघतानाच तीन तुकड्यांत कार्यकर्त्यांची विभागणी करण्यात आली होती. पोलीस स्टेशनवर नागनाथरावांची तुकडी हल्ला करणार होती. पोलिसांना तेथेच गुंतवणे व शक्यतर त्यांची शस्त्रे ताब्यात घेणे हे काम त्या तुकडीने करावयाचे होते. बाबूराव कुंटूरकर आणि मोहन शर्मा यांनी उमरी रेल्वेस्टेशनवर हल्ला करायचा होता आणि अनंतराव व रघुनाथ रांजणीकर वगैरेंच्या तुकडीने प्रत्यक्ष बँकेवर हल्ला करायचा होता.



एन ४०५८-४

अनंतराव आणि त्यांच्या तुकडीतील आबासाहेब लहानकर बँकेच्या इमारतीत घुसले. त्यांच्याजवळ ४५ बोअरची दोन पिस्तुले होती. शस्त्र चालवण्याचा रघुनाथराव रांजणीकर सोडून कोणालाच फारसा अनुभव नव्हता आणि लुटायचे म्हणजे काय हे फक्त सिनेमातच पाहिले होते. आबासाहेब दारातून आले तर अनंतराव खिडकीतून. दोघांनी आपापल्या जवळील पिस्तुले काढून 'हँडस् अप' म्हटले. कॅशियरच्या हातात बँकेच्या तिजोऱ्यांच्या किल्ल्या होत्या. त्याला किल्ल्या देण्यासाठी आबासाहेबांनी दरडावले, पण त्याने त्या देण्याच्याअगोदरच आबासाहेबांची गोळी त्याच्या पोटातून गेली. त्या काळी हैदराबाद संस्थानात सरकारी खजिने, कार्यालये व स्टेट बँकेसारख्या सरकारी बँका यांच्या रक्षणासाठी अरब पहारेकरी असत. उमरी शाखेच्या रक्षणासाठीसुद्धा काही अरब होते. त्यातला एक गच्चीवर बंदूक घेऊन बसला होता. अरब गोळी लागून ठार झाला. मॅनेजरसाहेब बॅडमिंटन खेळायला निघाले होते. मॅनेजरने चारदोन थपडा मिळँताच अलमाऱ्या उघडून दिल्या. दोन अरब शस्त्रे रोखून आले तर त्यांना जीव गमवावा लागला. पोलीस ठाण्यावरील सर्व जवानांना कोंडून ठेवण्यात आले आणि त्यांची सर्व शस्त्रे नागनाथरावांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ताब्यात घेतली. उमरी रेल्वे स्टेशनवरील तारयंत्र तोडून टाकण्यात आले. बँकेवरील दरोड्याची बातमी बाहेर लवकर जाऊ नये यासाठी तसे करणे आवश्यक होते. स्टेशन मास्तरकडे असलेली किरकोळ शिल्लक ताब्यात घेण्यात आली.

सुमारे अडीच-तीन तासांत सगळी मोहीम संपली आणि एकवीस लाख रुपयांच्या निजामी नोटा ताब्यात आल्या होत्या. रात्रीचे आठ वाजत आले होते. २२ मैल जायचे होते. रस्त्यात सुदैवाने काही झाले नाही. पेणगंगेच्या पलीकडे कार्यकर्ते आणि रक्कम सुरक्षित पोहोचली. गोधाजीराव मुखरे यवतमाळ भागातील तालेवार नेते. त्यांच्या कोऱ्या मोटारीतून सर्व रक्कम मुंबईला सुरक्षित पोहोचवण्यात आली. वाहतुकीत फक्त १६२ रुपये हरवले तर तेही स्वतः भरण्याची गोधाजीरावांची इच्छा होती. अशी दानत असलेले नेते त्या काळात होते.

उमरी बँकेवरील हल्ल्याबाबत हैदराबादेतील तत्कालीन उर्दू वृत्तपत्रांनी जी हकिगत प्रसिद्ध केली आहे ती वाचनीय आहे. सुमारे सत्तर हल्लेखोरांच्या टोळीने हैदराबाद

स्टेट बँकेची उमरी शाखा, उमरीचे रेल्वेस्टेशन आणि पोलीस ठाणे या सर्वांवर एकाचवेळी हल्ला केला. हल्लेखोरांजवळ रायफली, मशीनगन्स, स्टेनगन्स व रिव्हॉल्व्हर्स वगैरे शस्त्रे होती. हल्लेखोरांनी एकवीस लक्ष सतरा हजार दोनशे रुपयांच्या हल्ली (म्हणजे उस्मानिया चलनातील) नोटा जाळून टाकल्या असे एका वृत्तपत्राने लिहिले आहे. निजामी लष्कराची सहावी बटालियन उमरीत नंतर पाठवण्यात आल्याची बातमी छापण्यात आली आहे. निजामाच्या पोलीस खात्याचे एक अधिकारी खानबहादूर अली अख्तर हे नागपूरला गेले व त्यांनी मध्यप्रांताचे मुख्यमंत्री रविशंकर शुक्ल आणि गृहमंत्री द्वारकाप्रसाद मिश्र यांची भेट घेतली. मध्यप्रांत सरकार या गुन्ह्याच्या चौकशीसाठी मदत करणार असून, काही व्यक्तींना अटक झाली असेही वृत्त उर्दू वृत्तपत्रात आढळते.

उमरी बँकेच्या लुटीतील मिळालेल्या पैशाचा पै न् पैचा हिशेब देण्यात आला. जे लढ्यात नव्हते आणि घरी आरामात बसले होते अशा मंडळींनी लढ्यात असणाऱ्यांच्या विरुद्ध प्रचार करण्यासाठी उमरी बँकेच्या लुटीचे हत्यार पुष्कळवेळा वापरले. कार्यकर्त्यांनी आपला जीव धोक्यात घालून मिळवलेला हा पैसा कृतिसमितीच्या मुख्य कार्यालयात जमा करण्यात आला होता. हे पैसे आपल्या ताब्यात यावेत अशी लढ्यापासून दूर असलेल्या मवाळांची इच्छा होती. वल्लभभाई पटेलांचाही बराच गैरसमज याबद्दल करून देण्यात आला होता. दिल्लीतील नेतृत्वाच्या आदेशानुसार शंकरराव देवांनी आणि एका सनदी हिशेब तपासनिसांनी हिशेबाची तपासणीसुद्धा केली व सर्व हिशेब बरोबर असल्याचे आढळून आले. पुढे हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या राजकारणात मवाळ आणि जहाल यांचा संघर्ष झाला तेव्हा जहालांना बाजूला सारण्यासाठी उमरी बँकेचे प्रकरण उपयोगी पडले. एकही माणूस न गमावता स्वतःच्या जीवावर उदार होऊन यशस्वी करण्यात आलेल्या या मोहिमेत शौर्याची परिसीमा गाठण्यात आली. शिवाय लुटीचा सर्व पैसा कृतिसमितीच्या स्वाधीन करून प्रामाणिकपणाचे आदर्श उदाहरण घालून देण्यात आले.

हैदराबाद संस्थानातील निजामाच्या राज्याविषयी भारत सरकारच्या आणि त्यातील राज्यसरकारांच्या मनात कितीही कटू भावना असली तरी राजनैतिक पातळीवर काही

शिष्टाचार पाळावेच लागत होते. उमरी येथील प्रकाराबद्दल निजाम सरकारने मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतिक सरकारकडे तक्रार नोंदवली. हल्लेखोर मध्यप्रांतांतून आले हेही तक्रारीत सांगण्यात आले होते. भारत सरकार आणि निजाम सरकार यांच्यात 'जैसे थे' करार झाला होता. त्यामुळे जाहीरपणे हैदराबाद स्टेट बँकेवरील हल्ल्याला पाठिंबा देणे मध्यप्रांत सरकारलाही शक्य नव्हते; निजाम सरकारने उमरी हल्ल्यात भाग घेतलेल्या काही कार्यकर्त्यांच्या नावाची पकड वॉरंटस् मध्यप्रदेश सरकारकडे बजावणीसाठी पाठवली होती. खबरदारीचे उपाय मध्यप्रांत सरकारने योजले. आपण चौकशी केली; पण काही सापडले नाही, वॉरंट असलेले लोक आढळून आले नाहीत असे कळवणे भाग होते. त्यासाठी उमरखेड येथील प्रतिकार शिबिर ताबडतोब विसर्जित करून त्या कार्यकर्त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी पाठवण्यात आले. काहींना तीर्थयात्रेला पाठवण्यात आले, तर नागनाथ परांजपे यांना बंगलोरला शस्त्रखरेदी केंद्रात मदतनीस म्हणून रवाना करण्यात आले. मुंबईस हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या कृतिसमितीचे एक कार्यालय होते. मोरारबागेतील या कार्यालयात अनंतरावांनी कार्यालयाचे चिटणीस म्हणून काम करावे असे त्यांना सांगण्यात आले. मुंबईचे हे कार्यालय लढ्याचे केंद्र कार्यालय म्हणून काम तर करत होतेच; शिवाय लढ्यासाठी शस्त्रे मिळविणारे एक केंद्र म्हणूनही तेथे काम चालत होते.

मुंबई कार्यालयाचे कामकाज पाहण्यासाठी आ.कृ. वाघमारे आणि स.कृ. वैशंपायन हे दोन ज्येष्ठ नेते उपलब्ध झाले होते. वाघमारे कार्यालयात बसत आणि मध्यवर्ती कार्यालयाच्याबरोबरच मुंबईतून सुरू करण्यात आलेल्या 'मराठवाडा' साप्ताहिकाचे संपादनही करीत. 'फ्रीडम' नावाचे एक इंग्रजी साप्ताहिक सुरू करण्यात आले होते. या साप्ताहिकाची जबाबदारी स. कृ. उर्फ भाऊसाहेब वैशंपायन यांनी घेतली होती. ते आणि दुसरे एक कार्यकर्ते शंकरलाल पटेल हे मुंबईत लढ्यासाठी शस्त्रे विकत घेण्याचा प्रयत्न करीत. अनंत भालेरावांना कार्यालयीन कामकाज, मराठवाडा पत्राच्या कामात वाघमाऱ्यांना मदत आणि शस्त्रखरेदीतही मदत करावयाची होती. वाघमारे आणि अनंतराव यांचा अधिक परिचय या काळात झाला.

शस्त्रास्त्र कायद्याप्रमाणे शस्त्रे विकत घेणे आणि बाळगणे यांना परवानगी लागत असे आणि परवानगीशिवाय शस्त्र बाळगणे हा गुन्हा होता. मुंबईत मोरारजी देसाईचे राज्य होते. मोरारजी कायद्याला चिकटून असणारे व त्याचे कठोरपणे पालन करणारे नोकरशाहीवृत्तीचे मुख्यमंत्री म्हणून प्रसिद्ध होते. त्यामुळे मध्यप्रांतात जसे सहानुभूतीचे वातावरण होते तसे मुंबई सरकारचे नव्हते. म्हणूनच मुंबईत शस्त्रास्त्र खरेदीचा प्रयत्न फारच जपून करावा लागत असे. पकडले गेल्यास क्षमेची शक्यता नव्हती. अनंतरावांना या शस्त्रखरेदी प्रकरणात बराच त्रास झाला. 'पोलिसांच्या जाळ्यात' या शीर्षकाच्या आपल्या एका आठवणीच्या लेखात अनंतरावांनी त्यावेळची हकिगत नोंदवली आहे.

मुंबईच्या फोर्ट विभागात असलेल्या न्यू सिटीजन बँकेत व्यवस्थापक म्हणून महादेव् गोविंद परांजपे काम करत होते. हैदराबाद लढ्यातले एक नेते रामचंद्र गोविंद उर्फ बाबासाहेब परांजपे यांचे महादेवराव हे धाकटे बंधू. त्यांच्याच कार्यालयात दातार नावाचा एक तरुण काम करत होता. लष्करातील काही गोऱ्या सोजिरांशी त्याच्या ओळखी होत्या. लष्करातील गोरे सैनिक आता स्वदेशी परतण्याच्या तयारीत होते व जवळची शस्त्रे मिळेल त्या भावाने काढून टाकण्याचा त्यांचा विचार असे. दातारांबरोबर अनंतराव काही गोऱ्या सैनिकांना भेटलेही. त्यातला एक ३०३ ची रायफल खांद्याला लटकून उघडपणेच मोरारबागेतल्या स्टेट काँग्रेस कार्यालयात आला व त्याने दोन हजार रुपयांत ती विकण्याची तयारी दर्शविली. पैसे मोजून दिल्यानंतर रायफल ताब्यात घेऊन ती ताबडतोब तेथून हलवण्यात आली. रायफल विकणाऱ्या त्या सैनिकांच्या मागे जर पोलीस असते तर अनंतराव आणि इतरांना त्याचवेळी अटक झाली असती.

एकदा दातारांनी उद्या आपल्याला पहाटेच चार वाजता ताजमहाल हॉटेलच्या जवळ एका ठिकाणी जायचे आहे, चार-पाच हजार रुपये बरोबर ठेवा असे अनंतरावांना सांगितले. दोघेही भल्या पहाटे टॅक्सीने त्या भागात गेले. तेथील एका दारावर टक टक केली तेव्हा इंग्रजीत शिवीगाळ करीत एका पूर्ण नागव्या गोऱ्या इसमाने दार उघडले. अर्धवट नशेत, अर्धवट झोपेत असलेल्या त्या माणसाने आत जाऊन दोन पिस्तुले

ठेवलेली एक सुबक केस आणली. अनंतरावांनी पैसे मोजून दिले. पिस्तुले ताब्यात दिल्यानंतर तो म्हणाला, 'मला एकदा डोळे भरून ती पिस्तुले पुन्हा पाहू द्या.' डोळे भरून त्याने पिस्तुले पाहिली आणि त्यावर हळूवारपणे हात फिरविली व नंतर जड अंत:करणाने ती अनंतरावांच्या हवाली केली. त्या पिस्तुलावर बाणाने विद्ध झालेल्या हृदयाचे कोरलेले चित्र सोन्याने भरले होते. त्याच्या लग्नात त्याला मिळालेली ती भेट होती.

दातारांच्याच मार्फत एकदा आणखी एक निरोप आला. काळ्या घोड्याजवळ इंडिया कॉफी हाऊसमध्ये अनंतराव आणि शंकरलाल पटेल यांना बोलावण्यात आले. 'आपण लष्करातील निवृत्त अधिकारी आहोत आणि आपले नाव बिलमोरिया आहे' अशी ओळख सांगणारा एक आणि स्वत:ची मेट्रो सिनेमाचा मॅनेजर अशी ओळख सांगणारा, गजधर असे स्वत:चे नाव सांगणारा दुसरा अशा दोन व्यक्ती तेथे आल्या. लष्करातील एका अधिकाऱ्याकडून काही पिस्तुले आणि रायफली मिळू शकतील असे त्यांनी सांगितले. अंबरनाथच्या लष्करी डेपोमधील एका अधिकाऱ्याकडून हा माल मिळणार आहे, असे बिलमोरिया यांनी सांगितले. दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी जमायचे ठरले.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी बिलमोरिया आणि गजधर यांच्याबरोबर एक लष्करी अधिकारीही आला होता. त्याच्या अंगावर लष्कराचा गणवेशही होता. आम्हाला प्रत्यक्ष वस्तू दाखवल्यावर मग आम्ही किंमत म्हणून वीस हजार रुपये देऊ असे अनंतरावांनी सांगितले. ते मान्य झाल्यावर तिसऱ्या दिवशी चौपाटीवर संकेतस्थळ ठरवण्यात आले. तेथे अनंतराव आणि शंकरलाल पटेल पोहोचले तेव्हा बिलमोरिया आणि गजधर एका गाडीजवळ वाट पाहत होते. त्या गाडीच्या डिक्कीत एक रायफल, कोरी करकरीत पिस्तुले आणि काही काडतुसे होती. सौदा पक्का झाला. दुसऱ्या दिवशी पैसे देऊन शस्त्रे ताब्यात घेत असताना पोलिसांनी रस्त्यातच अनंतराव, शंकरलाल पटेल, पद्माकर लाटकर वगैरे कार्यकर्ते आणि गजधर यांना पकडले व पोलीस ठाण्यात नेले. ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्याने सर्वांना वाईट वागणूक दिली. दुसऱ्या दिवशी बोरीबंदरच्या पोलीस मुख्यालयात सर्वांना हजर करण्यात आले. तेथे आय.जी.पी. नगरवाला होते. त्यांनी विचारपूस केल्यावर तेथील एका कोठडीत

अनंतराव, पद्माकर लाटकर, शंकरलाल पटेल आणि इतरांना ठेवण्यात आले. बाजूच्याच खोलीत गांधी हत्येबद्दल पकडण्यात आलेले सावरकर, गोळवलकर गुरुजी, करकरे इत्यादी मंडळी होती. नंतर कळाले की बेकायदेशीर शस्त्रे विकणारांचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी रचलेल्या एका सापळ्यात अनंतराव आणि इतर सापडले होते.

उमरीच्या बँकेवरील हल्ला आणि महात्मा गांधींचा खून एकाच दिवशी व साधारण एकाचवेळी झाला होता. या योगायोगाने पुढे हैदराबादच्या मुंबईतील कार्यकर्त्यांना चांगलाच मनःस्ताप भोगावा लागला. गांधी हत्येच्या चौकशीसाठी जी चक्रे फिरली त्यात बेकायदेशीर शस्त्रांच्या खरेदीची ठिकाणे आणि दलालही सापडले. गांधीहत्येतील काही आरोपींना शस्त्रे विकणारे आणि हैदराबादच्या कार्यकर्त्यांना शस्त्रे विकणारे एकच होते. गांधी हत्येच्या कटाशी संबंध नाही याची खात्री झाल्याशिवाय कोणालाच मुक्त करता येत नव्हते.

बोरीबंदर स्थानकाजवळच्या पोलीस मुख्यालयात प्राथमिक चौकशी झाल्यानंतर अनंतराव, शंकरलाल पटेल, सदाशिव चौधरी, दातार आणि गजधर यांना ठाण्याच्या तुरुंगात पाठवण्यात आले. हैदराबादच्या कार्यकर्त्यांना सोडावे म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे चिटणीस गोविंदराव देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ मोरारजीभाईंना भेटले. मोरारजी तेव्हा गृहमंत्री होते. त्यांनी शिष्टमंडळाला सांगितले की, खुद्द जवाहरलाल नेहरूंनीही जर बेकायदेशीर शस्त्रे बाळगली तर त्यांनाही मी सोडणार नाही.

अनंतराव दीड महिना ठाण्याच्या तुरुंगात होते. असे दिसते की हैदराबादच्या कार्यकर्त्यांची सुटका करण्यासाठी वल्लभभाईंनाही मध्यस्थी करावी लागली. त्यानंतर हैदराबाद कार्यकर्त्यांना सोडून देण्यात आले.

भारताला स्वातंत्र्य मिळताना भारत आणि पाकिस्तान अशी दोन संघराज्ये अस्तित्वात येणार असे ठरल्यानंतर, आपल्या भूक्षेत्रात असलेल्या किंवा लगत असलेल्या संस्थानांना आपल्या संघराज्यात सामील करण्याचे प्रयत्न सुरू झाले. संस्थानांचे स्वतंत्र अस्तित्व संघराज्याच्या अस्तित्वालाच धोका पोहोचवू शकत होते. सरदार पटेलांनी आपल्या मुत्सद्दीगिरीने आणि कौशल्याने भारतीय संघराज्याच्या सीमेतील बहुतेक सर्व संस्थानांना

संघराज्यात सामील होण्यास राजी केले. अपवाद होता तो हैदराबाद, जुनागढ आणि काश्मीर या तीन संस्थानांचा. हैदराबाद आणि जुनागड यांना सर्व बाजूंनी भारतीय संघराज्याने वेढलेले असतानाही त्यांचे दुराग्रह कायम होते. निजामाला स्वतंत्र राहावयाचे होते, तर जुनागडच्या नवाबाला पाकिस्तानात सामील व्हावयाचे होते. हैदराबादच्या निजामाने वाटाघाटींचे गुऱ्हाळ चालत ठेवून वेळ काढायला सुरुवात केली आणि दुसरीकडे संस्थानातील रझाकारासारख्या अतिरेक्यांना दहशत पसरवण्यास उत्तेजन दिले.

ही परिस्थिती फार काळ सहन करणे अशक्य होते. भारत सरकारने निजामाच्या कृष्णकृत्यांना जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी एक श्वेतपत्रिका प्रकाशित केली आणि पूर्वीच झालेल्या 'जैसे थे' कराराप्रमाणे अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण झाल्यामुळे, संघराज्य सरकारला संस्थानात सैन्य पाठवण्याचा असलेला अधिकार वापरण्याचे ठरवले. १३ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबादेत तिन्ही बाजूंनी भारतीय सैन्य घुसले. सैन्याचे प्रत्यक्ष नियंत्रण मेजर जनरल जयंतीनाथ चौधरी यांनी केले तर त्यांना दक्षिण विभागाचे सैन्यप्रमुख लेफ्टनंट जनरल महाराज राजेंद्रसिंह यांनी मार्गदर्शन केले. संस्थानात दाखल होणाऱ्या या भारतीय सैन्याला फारच किरकोळ प्रतिकार झाला आणि १७ सप्टेंबर रोजी भारतीय सैन्य हैदराबादच्या वेशीवर पोहोचले. सायंकाळी पाच वाजता 'रेडिओ दकन'च्या हैदराबाद केंद्रावर स्वतः निजामाने येऊन भाषण केले आणि शरणगती पत्करली. हैदराबादचे सैनिक आणि रझाकार दोन्ही मिळून बाराशे लोक ठार झाले, तर या कारवाईत हिंदी लष्कराचे फक्त दहा लोक कामाला आले. या कारवाईला 'पोलीस ॲक्शन' संबोधले जाते.

एका दुःस्वप्नाचा अंत झाला आणि हैदराबादमधील जनता मोकळ्याने श्वास घेऊ लागली. हैदराबाद मुक्त झाल्याबरोबर अहिंसक काँग्रेस कार्यकर्त्यांपैकी काहींनी आपद्धर्म म्हणून केलेली शस्त्रसंगत संपली.

## ५. नव्या पक्षाचा प्रयोग आणि पत्रकारितेचा प्रारंभ

निजामाच्या जोखडातून हैदराबाद संस्थान मुक्त झाले म्हणजे जीवन सुरळीत होईल, निदान सुरक्षितता लाभेल, राजकीय तणाव संपतील अशी सगळ्याच कार्यकर्त्यांप्रमाणे अनंतरावांचीही अपेक्षा होती; पण तसे व्हायचे नव्हते. हैदराबाद संस्थान मुक्त झाल्यावर ताबडतोब स्वातंत्र्यलढ्यात प्रमुख असलेल्या लोकनेत्यांकडे सत्ता सोपवली जाईल अशी स्वाभाविकपणेच अपेक्षा होती; परंतु तसे झाले नाही. हैदराबादमधील शस्त्रसत्तांतर सुलभतेने पार पडले, तरी राजकीय सत्तांतराच्याबाबत तसे झाले नाही. निजामाचे शरणागतीचे भाषण हैदराबादमध्ये भारत सरकारचे एजंट जनरल म्हणून काम करणारे कन्हैयालाल मुन्शी यांनी लिहून दिले होते आणि त्यात हंगामी मंत्रिमंडळ जाहीर करताना, लढ्याच्या काळात निजामाच्या जुलमी सत्तेला विरोध करण्याचे काँग्रेसचे अधिकृत धोरण बाजूला सारून ; निजामाच्या हस्तकांशी दोस्ती करणाऱ्या व्यक्तींनाही समाविष्ट करण्याचा सल्ला निजामाला देण्यात आला होता. चळवळीच्या शेवटच्या पर्वात लढ्यापासून शक्यतो अलिप्त असलेल्या अनेक मवाळांना नव्या सत्तेत कसे भागीदार करून घेता येईल याचे मनसुबे रचण्यात आले होते. हैदराबाद स्टेट काँग्रेसमधील स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, दिगंबरराव बिंदू आदींचा गट या चळवळीत अग्रभागी होता आणि जी. रामाचारी, बी. रामकृष्णराव, काशीनाथराव वैद्य आदी मवाळांचा गट काही अपवाद वगळले तर चळवळीपासून अलिप्त होता. चळवळीत भाग न घेतलेल्या काही प्रमुख कार्यकर्त्यांविरुद्ध स्टेट काँग्रेसचा निर्णायक लढा चालवणाऱ्या कृतिसमितीने शिस्तभंगाची कारवाई सुरू केली होती. त्यामुळे स्टेट काँग्रेस संघटनेमध्ये दुही निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला होता.

सप्टेंबरच्या चौथ्या आठवड्यात दिल्लीमध्ये हैदराबाद स्टेट कॉँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक झाली. स्टेट कॉँग्रेसच्या पुढाऱ्यांच्या केंद्रीय नेतृत्वाबरोबर चर्चा झाल्या; परंतु राजकीय सत्तांतर कसे होईल याबद्दल काही ठोस आश्वासन मिळाले नव्हते. ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवाड्यात संस्थानातील विविध ठिकाणी स्टेट कॉँग्रेसच्या नेत्यांनी दौरे केले. लोकांनी त्यांचे प्रचंड स्वागत केले. कृतिसमिती विसर्जित झाली आणि ३० नोव्हेंबर आणि १ डिसेंबर १९४८ रोजी बीदर येथे भरलेल्या हैदराबाद स्टेट कॉँग्रेसच्या स्थायी समितीच्या बैठकीत संघटनेतील जहाल आणि मवाळ यांचे मतभेद उफाळून आले. लढ्यात भाग न घेतलेल्या काही सभासदांवर स्टेट कॉँग्रेसच्या कृतिसमितीने शिस्तभंगाची कारवाई केली होती ती परत घ्यावी असा मवाळांचा आग्रह होता व ही गोष्ट चळवळीचे नेतृत्व केलेल्या जहालांना मान्य नव्हती. पोलीस ॲक्शन संपले तरी लष्करी प्रशासक म्हणून मे. ज. जयंतीनाथ चौधरी हेच काम पाहात होते. लगतच्या प्रांतातून काही मुलकी अधिकाऱ्यांना त्यांच्या मदतीला पाठवण्यात आले होते.

पोलीस ॲक्शन होऊन हैदराबाद मुक्त झाल्यानंतर संस्थानाबाहेर असलेले स्टेट कॉँग्रेसचे कार्यकर्ते संस्थानात परतू लागले. बरेचसे कार्यकर्ते आपापल्या जिल्ह्यात परत गेले. स्वतः स्वामीजी, गोविंदभाई श्रॉफ, स. कृ. वैशंपायन, आ. कृ. वाघमारे आणि त्यांचे निकटचे सहकारी हैदराबादेत आले. स्टेट कॉँग्रेसचा संसार हैदराबादेत आता उघडपणे सुरू झाला आणि कार्यकर्त्यांनीही मिळेल त्या छोट्या-मोठ्या जागेत आपले संसार थाटले. जानेवारी, १९४९ मध्ये अनंतराव, सुशीलाबाई आणि मुलांना घेऊन हैदराबादेत आले. काचीगुडा रेल्वेस्टेशनच्या यार्डापलीकडे सिटी इम्प्रूव्हमेंट बोर्डाने काही गाळे बांधले होते. त्यापैकी एक छोटासा गाळा अनंतरावांना मिळाला. अवघ्या दोन लहान खोल्या आणि त्याला जोडलेले छोटेसे स्वयंपाकघर आणि एक स्वच्छतागृह एवढीच जागा. त्यात अनंतराव, सुशीलाबाई, जयकृष्ण आणि उद्धव हे अनंतरावांचे दोन धाकटे भाऊ, अधूनमधून येणारा तिसरा धाकटा भाऊ भगवान, अरुण आणि सविता व अशोक ही अनंतरावांची मुले राहत. थोड्याच दिवसांत

हैदराबादेत शिक्षणासाठी मित्रांची एक-दोन मुले अनंतरावांकडे आली तीही तेथेच राहू लागली. जोडीला नागनाथ परांजपेसारखा अनंतरावांच्या कुटुंबाचाच घटक बनलेला चळवळीतला मित्रही असे. रात्री निम्या लोकांना तरी बाहेर व्हरांड्यात झोपावे लागे.

हैदराबादेत आल्यावर सुरुवातीचे काही दिवस अनंतरावांनी स्टेट काँग्रेसच्या कार्यालयात काम केले. स्टेट काँग्रेसचे ऑफिस मुंबईला असताना ते हे काम करतच होते. थोड्या दिवसांतच आ. कृ. वाघमाऱ्यांनी 'मराठवाडा' हैदराबादेतून प्रसिद्ध करण्यासाठी मुद्रणालयाची जुळवाजुळव करण्यास सुरुवात केली. हैदराबादचाच एक जुना प्रेस विकत घेण्यात आला. साप्ताहिकाच्या कामात मदत करण्यास अनंतरावांना वाघमाऱ्यांनी सांगितले. मुंबईतही तसे थोडेफार काम अनंतरावांनी केले होते. त्यांच्या जोडीला दुसरे सहायक म्हणून आले अच्युतभाई देशपांडे. मूळ जालन्याजवळच्या रांजणीचे देशपांडे एकनिष्ठ गांधीवादी होते. पाच-सहा महिने मराठवाड्यात काम केल्यानंतर, ते तेलंगणात शांतीयात्रेवर आलेल्या विनोबांचे सहकारी म्हणून काम करायला गेले आणि पुढे आयुष्यभर सर्वोदय चळवळीत काम करीत राहिले. त्यामुळे अनंतराव हे एकटेच दादा वाघमाऱ्यांना सहायक उरले. साप्ताहिकाच्या आकाराची 'मराठवाड्या'ची आठ पाने असत. स्वतः वाघमारे अग्रलेख लिहित आणि एखादे स्फुटही लिहित. अनंतराव बाकी सगळ्या पानांची जुळवाजुळव करीत.

खादीचे जाडेभरडे धोतर आणि खादीचा तसाच पांढऱ्या रंगाचा शर्ट असा सामान्य पोषाख असलेले अनंतराव रोज सायकल घेऊन घरून निघत. रेल्वे यार्डात दहा-बारा रूळजोड्यांवरून सायकल हातात उचलून घेऊन स्टेशनच्या प्लॅटफार्मवर यायचे आणि तेथून नारायणगुड्यात असलेल्या 'मराठवाडा' कार्यालयात जायचे. तेथून त्याच मार्गाने परत. पगार न सांगण्यासारखा आणि त्यात भलेमोठे कुटुंब सांभाळावयाचे ही कसरत अनंतराव आणि सुशीलाबाई करू लागले.

हैदराबादेत राजकीय घडामोडी वेगाने चालू होत्या. मराठवाड्याला बातम्यांचा तुटवडा पडण्याची शक्यताच नव्हती. या भागात प्रसिद्ध होणारे 'मराठवाडा' हेच

एकमेव मराठी वृत्तपत्र त्यामुळे त्याकडे खेडापाड्यातूनसुद्धा बातम्यांचा आणि तक्रारींचा ओघ चालू झाला. मराठवाड्यात आपले म्हणणे आणि आपली तक्रार छापून यावी असे सामान्य गावकऱ्यांनाही वाटू लागले आणि 'मराठवाडा' ही आपल्या कर्तव्याला जागला.

हैदराबाद संस्थानमधील संघटनात्मक गोष्टीकडे केंद्रीय नेतृत्वापैकी सरदार पटेल लक्ष देत होते. देशाला स्वातंत्र्य नुकतेच मिळाले आहे. अद्याप तो सशक्त झालेला नाही, अशा अवस्थेत सर्वच गटांना आणि लोकांना बरोबर घेऊन कारभार करावा लागेल अशी सरदारांची भूमिका होती. स्टेट काँग्रेसमधील गोविंदभाई श्रॉफ वगैरे नेत्यांना सरदारांचे हे सर्वसमावेशक धोरण मान्य नव्हते. डिसेंबर, १९४८ मध्ये कलकत्त्यात झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या दुसऱ्या काँग्रेसमध्ये, आशियातील विविध देशांना सशस्त्र उठाव करून क्रांती करण्यास ही योग्य वेळ आहे, असे निदान होऊन तसा आदेश कार्यकर्त्यांना देण्यात आला होता. त्याला अनुसरून अनेक दक्षिण आशियायी देशात सशस्त्र उठाव झाले. भारतीय कम्युनिस्टांनी तेलंगण हा हैदराबाद संस्थानचा तेलगू बहुभाषिक भाग ही नव्या धोरणाची- सशस्त्र उठावाची प्रयोगभूमी ठरवली होती. अठ्ठेचाळीस सालीच तेलंगणातील कम्युनिस्टांचा सशस्त्र लढा सुरू झाला होता. या पार्श्वभूमीवर सरदारांसारखा देशाचा गृहमंत्री कम्युनिस्टांबद्दल कडक धोरण स्वीकारू इच्छित होता. स्वातंत्र्यलढ्याच्या शेवटच्या टप्प्यातच अखिल भारतीय प्रजापरिषदेने आणि अखिल भारतीय काँग्रेस समितीने कम्युनिस्टांच्याबरोबर सहकार्य करावयाचे नाही असे ठरवले होते. त्याबद्दल महाराष्ट्र परिषद या मराठवाड्यातील स्टेट काँग्रेसच्या संघटनेने मात्र विरोधी सूर काढला होता व आम्हाला कम्युनिस्टांना बरोबर घेऊ द्या अशी मागणी केली होती. त्यातच मवाळांच्या तक्रारींची भर पडली. तेव्हा केंद्रीय नेते, मराठवाड्याचे जहाल नेतेच नेतृत्व करीत असलेल्या हैदराबाद स्टेट काँग्रेसकडे सावधपणे पाहत असणे स्वाभाविक होते.

सरदार पटेलांना व्यक्तिशः गोविंदभाईंच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका नव्हती व कार्यकुशलतेबद्दल विश्वासही होता. त्यामुळे त्यांनी दोन वेळा गोविंदभाईंना बोलावून

बरीच चर्चा केली व समजावूनही सांगितले; परंतु गोविंदभाईंची मते बदलली नाहीत. काँग्रेसचे स्वरूप हे सर्वसमावेश राहील. कामगार आणि शेतकऱ्यांचे नेतृत्व असलेल्या पुरोगामी संघटनेचे स्वरूप तिला देता येणार नाही असे वल्लभभाईंचे मत होते. गोविंदभाईंना मात्र काँग्रेस ही एक वेगाने समाजपरिवर्तन करू इच्छिणारी पुरोगामी संघटना बनावी, असे वाटत होते.

सत्तांतरांच्या प्रत्येक पायरीवर लढ्यात फारसे नसलेल्या मवाळांना झुकते माप दिले जाऊ लागले आणि आपल्या गटाला मुद्दाम सापत्नभावाची वागणूक दिली जात आहे असे गोविंदभाई आणि इतरांना वाटू लागले. जुने सरंजामदार नव्या पोशाखात सत्तेवर ताबा मिळवतील व त्यांना पाठबळही मिळेल हे दिसताच, बऱ्याच कार्यकर्त्यांनी स्टेट काँग्रेसचा त्याग करून नवी संघटना स्थापन करण्याचा विचार चालवला. १९४९ साली झालेल्या स्टेट काँग्रेसच्या संघटनात्मक निवडणुकात स्वामीजी आणि गोविंदभाई यांच्या नेतृत्वालाच कार्यकर्त्यांनी प्रचंड बहुमत दिले होते, त्यामुळे मवाळांनी एक समांतर काँग्रेस स्थापन केली होती. दोन्ही काँग्रेस संघटनांची तडजोड घडवून म्हणजे समांतर काँग्रेस विसर्जित करवून त्यातील काहींना अधिकृत स्टेट काँग्रेसमध्ये स्थान देण्यात आले. दिल्लीत झालेल्या या तडजोडीचा एक भाग म्हणून स्वामीजींना बाजूला सारून दिगंबरराव बिंदूंना संघटनेचे अध्यक्षपद देण्यात आले होते.

१९५० च्या फेब्रुवारीत गोविंदभाई श्रॉफ आणि स. कृ. वैशंपायन यांनी स्टेट काँग्रेसच्या कार्यकारिणीचा राजीनामा दिला. फेब्रुवारीच्या शेवटी निजामाबादला नवे अध्यक्ष दिगंबरराव बिंदू यांच्या अध्यक्षतेखाली स्टेट काँग्रेसचे दुसरे अधिवेशन भरले. त्या अधिवेशनाला स्वतः बिंदू आणि स्वामीजी वगळता इतर कोणी लढ्यातील ज्येष्ठ नेते हजरच नव्हते. या अधिवेशनानंतर १५ मार्च रोजी गोविंदभाई, बाबासाहेब परांजपे, आ. कृ. वाघमारे आणि स. कृ. वैशंपायन यांनी काँग्रेस संघटनेचाच राजीनामा दिला. 'जाती आणि वर्गविहीन समाजाच्या निर्मितीचे ध्येय काँग्रेसच्या आजच्या संघटनात्मक स्वरूपातून साध्य होऊ शकणार नाही अशी आमची खात्री झाली आहे, कारण प्रतिगामी शक्तींचे काँग्रेसवर वर्चस्व आहे' असे त्यांनी आपल्या राजीनामापत्रात

म्हटले होते. सत्ता ज्या संघटनेकडे आहे किंवा येण्याची शक्यता आहे त्यात सामील होण्यासाठी स्वतःचे पक्ष पुष्कळ वेळा सोडले जातात; येथे उलटा प्रकार होता. सत्ता काँग्रेसकडे येणारच होती आणि ही ज्येष्ठ मंडळी काँग्रेस सोडून बाहेर जात होती.

अनंतराव या सर्व राजकीय घडामोडी नुसतेच पाहत नव्हते तर या घडामोडींचे एक केंद्र असणाऱ्या 'मराठवाडा' कार्यालयातच काम करत होते. वाघमारे आणि ते हे दोघेही विचाराने गोविंदभाईंना जवळ होते आणि गोविंदभाई- बाबासाहेबांनी काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला तर आपणही त्यांच्याबरोबर जावे असे त्यांना वाटत होते. मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात बीडला मराठवाडा प्रांतिक काँग्रेस समितीची बैठक झाली. त्यात गोविंदभाई वगैरेंना राजीनामे परत घेण्याचा आग्रह करण्यात आला; परंतु त्याचा उपयोग झाला नाही. स्वामीजींच्या एकनिष्ठ अनुयायांत मधोमध दुफळी झाली होती. अनेक जुन्या कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्येच राहण्याचा निर्णय घेतला होता. मुकुंदराव पेडगावकर, राघवेंद्रराव दिवाण, फुलचंद गांधी, देवीसिंह चौहान, माणिकचंद पहाडे, गुलाबचंद नागोरी, पुरुषोत्तमराव चपळगावकर, रतनलाल कोटेचा, नारायणराव जोशी, श्रीराम भांगडिया, भगवानराव गांजवे, गोपाळशास्त्री देव वगैरे मंडळी काँग्रेसमध्ये राहिली. तर के. व्ही. नरसिंहराव, पी. व्ही. नरसिंहराव, अनंत भालेराव, विनायकराव चारठाणकर, काशीनाथ जाधव, रघुनाथ रांजणीकर, गंगाप्रसाद अग्रवाल, नागनाथ परांजपे, जीवनराव बोधनकर, जगन्नाथराव बर्दापूरकर वगैरेंनी काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला. यापैकी पी. व्ही. नरसिंहराव थोड्या काळातच पुन्हा काँग्रेसमध्ये परत गेले. नंतरच्या काळात ते देशाचे पंतप्रधानही झाले.

९-१० एप्रिल १९५० रोजी नांदेड येथे काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांचा एक मेळावा झाला. भांडवलशाही आणि प्रतिगामी जातीय शक्तींच्या विरोधात सर्व समाजवादी कार्यकर्त्यांनी एकजूट केली पाहिजे, असे सर्वसाधारण मत या बैठकीत व्यक्त करण्यात आले. राजकीय परिस्थितीबद्दल आणि पुढील धोरणाबद्दल विचार करण्यासाठी एक उपसमिती नेमण्यात आली, त्यात अनंत भालेरावांचाही समावेश होता. बाबासाहेब परांजपे आणि अनंतराव आदी काहींना आपण सरळ समाजवादी

पक्षात जावे असे वाटत होते. लोकशाही समाजवादावर त्यांचीही निष्ठा होती. गोविंदभाई आणि इतर मंडळींना मात्र हे मान्य नव्हते. अमेरिका आणि रशिया यांना एकाच मापाने मोजता येणार नाही असे त्यांचे मत होते.

मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हिंद मजदूर सभेच्या अधिवेशनाच्या निमित्ताने जयप्रकाश नारायण आणि अशोक मेहता हैदराबादेत येणार होते. गोविंदभाई, बाबासाहेब परांजपे, वैशंपायन आणि के. व्ही. नरसिंहराव यांनी त्यांची भेट घेतली ; मात्र समाजवादी पक्षात सामील होण्यासाठी अशोक मेहता त्यांचे मन वळवू शकले नाहीत. बाबासाहेब परांजपे आदींनी असा एका प्रस्ताव ठेवला होता की, काही दिवस समाजवादी पक्षाच्या शेतकरी आणि कामगार संघटनात काम करण्याची आम्हाला मुभा द्या, समाजवादी पक्षातले कार्यकर्ते आणि आम्ही यांनी काही दिवस बरोबर काम केले म्हणजे एकमेकांत विश्वासाचे वातावरण निर्माण होईल व नंतर आम्ही रीतसर समाजवादी पक्षात सामील होऊ. ही गोष्ट अशोक मेहतांना मान्य झाली नाही. एसेम जोशी यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीच्या वेळी लिहिलेल्या एका लेखात अनंतरावांनी त्यावेळच्या घडामोडीबद्दल काही माहिती दिली आहे.

'स्टेट कॉंग्रेसमधील पुरोगामी गटाचे विख्यात सूत्रधार भाई गोविंददास श्रॉफ व चळवळीचे प्रेरक बाबासाहेब परांजपे यांच्या तोडीचे मातब्बर पुढारीच या संघटनेचे नेतृत्व करीत होते. लोकशाही समाजवादाचा विचार स्टेट कॉंग्रेसमध्ये पूर्वीपासून शिरलेला होताच. वरील संघटनेची मंडळी विचाराने समाजवाद्यांच्या नजीक होती ; परंतु स्थानिक मतभेदामुळे त्यांच्या मनात काही शंका होत्या. साम्यवाद्यांचा सहप्रवासही घडलेला व घडत होताच. उपरोक्त सोशालिस्ट लीगने एकमताने असे ठरविले की, समाजवादी पक्षात विलीन होण्यापूर्वी समाजवाद्यांच्या वर्गीय संघटनांत त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळवावी. यात उद्देश एवढाच होता की, समाजवादी कार्यकर्ते व पक्ष यांच्यानजीक जावयास मिळेल व त्या मार्गात असलेले काल्पनिक अडसर प्रत्यक्ष अनुभवांनी दूर होतील. या दिशेने खूप प्रयत्न झाले. सोशालिस्ट लीगमधील कार्यकर्ते जवळजवळ पूर्णवेळ कार्यकर्ते होते. माझे स्मरण शाबूत असेल तर अशा

कार्यकर्त्यांची किमान संख्या मराठवाड्याच्या अवघ्या पाच जिल्ह्यात शंभरावर होती. हे सर्व कार्यकर्ते प्रामुख्याने ग्रामीण भागात व शेतकरीवर्गात काम करणारे होते. समाजवाद्यांच्या तेव्हाच्या शेतकरी संघटनेत काम करता यावे यासाठी पुढाऱ्यांनी बरेच प्रयत्न केले. अशोकभाईंकडेच याचा निर्णय सोपविण्यात आला होता. काय झाले ते वर सांगितलेच आहे.'

बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांपैकी बाबासाहेब परांजपेंचा अपवाद वगळला तर बहुतेक इतर लोक थोडेफार मार्क्सच्या प्रभावात होतेच ; मात्र त्यांना कम्युनिस्ट पक्षाची कार्यपद्धती अजिबात मान्य नव्हती, त्यामुळे त्यांना कम्युनिस्ट पक्षातही जायचे नव्हते. शेवटी 'लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्स' ही एक वेगळीच राजकीय संघटना स्थापन करून त्यात काम करावे असा निर्णय घेण्यात आला. अनेक गुणी ध्येयवादी कार्यकर्ते या संघटनेत आले. अनेक अपेक्षा निर्माण झाल्या होत्या ; परंतु नियतीच्या मनात काही वेगळेच होते. स्वातंत्र्यलढ्यात या कार्यकर्त्यांनी केलेल्या त्यागाबद्दल लोकांच्या मनात आदर होता ; परंतु काँग्रेस संघटनेविषयी असलेली कृतज्ञता नष्ट झालेली नव्हती. दुसरीकडे याच वेळी मराठवाड्यात बहुजन समाजाचे राजकारण करणाऱ्या कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्ष आणि कामगार किसान पक्ष अशा दोन पक्षांत काम सुरू केले होते. या दोन्हीही विचारप्रवाहाच्या लाटेत १९५२ च्या निवडणुकीत लीग सोशालिस्ट वर्कर्सची वाताहात झाली. लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्सने पाच पक्षांशी आघाडी केली त्यात कामगार किसान पक्षही होता. कम्युनिस्ट पक्षही त्यात सामील होता. लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्सचा एकही उमेदवार हैदराबाद विधानसभेवर निवडून येऊ शकला नाही. आघाडीतील बाकीच्या पक्षांचे उमेदवार मात्र निवडून आले. लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्सच्या एकाच उमेदवाराला अपवाद म्हणून यश मिळाले. लीगचे बाबासाहेब परांजपे लोकसभेवर निवडून गेले ; पण त्याचे कारण म्हणजे विधानसभेच्या काँग्रेस विरोधी सर्व उमेदवारांनी- शेका पक्षानेसुद्धा लोकसभेचे मत बाबासाहेबांना दिले होते.

अनंत भालेरावांनी लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्सचे उमेदवार म्हणून बिलोली मतदारसंघातून हैदराबाद विधानसभेची निवडणूक लढवली होती. स्वातंत्र्यापूर्वी त्यांनी नांदेड जिल्ह्यातच स्टेट काँग्रेसचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून काम केले होते. खेडोपाडी परिचय होता ; मात्र साधनसामग्री काहीच नव्हती. दोन-तीन सायकली आणि एखादी बैलगाडी यांच्या आधाराने निवडणुकीचा प्रचार झाला. निकाल इतर मतदारसंघाप्रमाणेच होता. काँग्रेसच्या उमेदवाराला १०,१४२ मते तर अनंतरावांना २,७३५ मते मिळाली होती. पराभव तर झालाच होता ; पण डिपॉझिटसुद्धा वाचलेले नव्हते.

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत देशभर, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात, समाजवादी पक्षाचे जे झाले तेच मराठवाड्यात 'लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्स' चे झाले. स्वातंत्र्याच्या लढ्यात अतुलनीय त्याग करणाऱ्या कार्यकर्त्यांविषयी जनमानसात आदर होता; परंतु राजकीय पक्ष म्हणून त्यांना काँग्रेसच हवी होती. जानेवारी, १९५२ च्या शेवटी निवडणुकीचे निकाल आले आणि नंतर काही महिन्यांनीच लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्सचे विसर्जन करून व्यक्तिगत पातळीवर प्रत्येकाने आपापल्या राजकीय भवितव्याबद्दल निर्णय घ्यावा असे ठरले.

बहुजन समाजातून आलेले अनेक तरुण कायकर्ते लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्समध्ये होते. ते आणि त्यांचे अनेक नेते यांनी नंतर कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. मराठवाड्यातील कम्युनिस्ट पक्षाला यामुळे बळ मिळाले. अनंत भालेराव आणि स्वतः गोविंदभाई मात्र अपक्ष राहून पुरोगामी राजकारण करीत राहिले.

'मराठवाडा' पत्राची मालकी आ. कृ. वाघमाऱ्यांची व्यक्तिगत होती. १९३८ ला त्यांनी प्रारंभ केलेले हे पत्र चळवळीच्या काळात पुन्हा जोमाने सुरू झाले आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात ते पक्षाचे मुखपत्र न बनता जनतेचे मुखपत्र बनले. काँग्रेस पक्षातून बाहेर पडलेल्या गोविंदभाईंशी वाघमाऱ्यांचे वैचारिक नाते कायम होते. वाघमाऱ्यांनीही काँग्रेस पक्ष सोडलेला होता. पुढील काळात 'मराठवाडा' चालवण्यासाठी एखादी विश्वस्त संस्था असावी असे त्यांच्या मनात आले.



एन ४०५८-५

१९५३ च्या सुमाराला त्यांनी 'मराठवाडा'साठी एक विश्वस्त मंडळ स्थापन केले. गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, अनंत भालेराव, जगन्नाथ बर्दापूरकर आणि स्वतः आ.कृ. वाघमारे असे या विश्वस्त मंडळाचे पाच सभासद होते. २ मे १९५३ रोजी या विश्वस्त संस्थेची नोंदणी हैदराबादेत झाली आणि नंतर त्यासंबंधीचे एक निवेदन 'मराठवाडा' पत्रात प्रसिद्ध झाले. याच महिन्यात वाघमाऱ्यांनी संपादकपद सोडून दिले आणि अनंत भालेराव यांना संपादक म्हणून नियुक्त केले.

स्टेट काँग्रेसमधील फुटीनंतर अनंत भालेरावांचे नाते सत्ताविरोधी राजकारणाशी जुळून गेले होते. अनंतरावांचे औपचारिक शिक्षण इंटरपर्यंतच झालेले असले तरी त्यांचे वाचन, गोविंदभाईसारख्या वैचारिक नेत्यांशी असलेला संबंध आणि होणाऱ्या चर्चा या सर्वांमुळे हळूहळू त्यांची एक वैचारिक बैठक निर्माण झाली होती. वृत्तपत्राच्या संपादकाला आवश्यक असणारे समाजनिरीक्षण, वस्तुस्थितीचे आणि लोकप्रश्नांचे आकलन आणि ते मांडण्याची क्षमता असल्यामुळे अनंतराव 'मराठवाड्या' ची जबाबदारी समर्थपणे सांभाळू शकतील असा विश्वास वाघमाऱ्यांच्या मनात निर्माण झाला होता.

'मराठवाडा' वृत्तपत्राशी वेगळ्या नात्याने संबंध आलेल्या स्वातंत्र्य चळवळीतील एका कार्यकर्त्याचा येथे उल्लेख केला पाहिजे. 'मराठवाडा' वृत्तपत्र छापण्यासाठी जेव्हा जयहिंद मुद्रणालय निघाले तेव्हा त्याचे व्यवस्थापक म्हणून श्रीधरराव कुलकर्णी काम पाहू लागले होते. मराठवाड्यातील परभणी जिल्ह्याचे श्रीधरराव १९४२ च्या लढ्यात सक्रिय होते. पुण्याला 'लोकशक्ती' या काँग्रेसच्या दैनिकात त्यांनी कामही केले होते. वृत्तपत्रातील कामाचा त्यांना अनुभव होता. परंतु स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचा सहभाग मुख्यतः आंध्रप्रदेशात झालेला होता. त्यामुळे मराठवाड्यातील चळवळीत पुढाकार घेतलेल्या वाघमारेप्रभृतींशी त्यांचे अनंतरावांसारखे संबंध आलेले नव्हते. पुढील काळात जेव्हा स्टेट काँग्रेस दुभंगली त्यावेळी गोविंदभाई-वाघमारे यांच्या विचारधारेशी ते जोडलेले नव्हते. साहजिकच अनंतरावांबद्दल परिचयाने वाघमाऱ्यांच्या मनात विश्वास निर्माण झाला आणि त्यांनी आपला वारस म्हणून अनंतरावांची निवड

केली; ती सार्थही ठरली. नंतरच्या काळात श्रीधररावांनी मराठीच्या अध्यापनावर लक्ष केंद्रित केले आणि मराठीचे एक व्यासंगी अभ्यासक म्हणून लौकिक मिळविला.

१९३८ मध्ये 'मराठवाडा' सुरू झाला असला तरी तो नियमितपणे १९४७ पासून निघत होता. १९४७ ते १९५३ अशी पाच-सहा वर्षे वाघमाऱ्यांनी संपादकपद सांभाळले होते. १९५३ पासून अनंत भालेराव संपादक म्हणून काम पाहू लागले. दादा (आ.कृ.) वाघमारे कार्यालयात वेगळ्या खोलीत येऊन बसत आणि 'मराठवाड्याच्या माळरानावरून' असे एक सदर लिहीत. परंतु मराठवाड्याच्या व्यवस्थापन- संपादनात अजिबात ढवळाढवळ करीत नसत.

स्वतः वाघमारे वाङ्मयाचे उत्तम जाणकार होते. मराठवाड्यातील लेखकांना प्रसिद्धीचे माध्यम उपलब्ध व्हावे म्हणून त्यांनी प्रयत्नही केले होते. मराठवाड्यातील लेखकांचे लेखन असलेली एक वाङ्मयीन पुरवणी त्यांनी १९४८ साली प्रकाशित केली होती. मराठवाड्यातील लेखकांचे चांगले लेखन मिळवून ते प्रसिद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. १९५० पासूनच 'मराठवाडा' चा दिवाळी अंक प्रकाशित होऊ लागला. १९५२ च्या दिवाळी अंकात बी. रघुनाथांची 'जनता लिंबेटाकळी' ही स्वातंत्र्यानंतरचे राजकीय वास्तव सांगणारी महत्त्वाची कथा प्रसिद्ध झाली आहे. 'मराठवाडा' दिवाळी अंकाने प्रारंभापासूनच साक्षेपाने निवडलेल्या मजकुरामुळे आपले स्वतःचे स्थान निर्माण केले.

मराठवाडा हे केवळ शहरी वाचकांसाठीचे वर्तमानपत्र न राहता ते वाघमारे-अनंतरावांच्या विशिष्ट दृष्टीमुळे मराठवाड्याचेच प्रादेशिक वृत्तपत्र व त्यातील ग्रामीण जनतेचे मुखपत्र बनले. 'गावात टपाल वेळेवर मिळत नाही' इथपासून 'वाघाने धुमाकूळ घातल्या' पर्यंत खेड्यापाड्यातील बातम्या मराठवाड्यात येत. हे आपले वृत्तपत्र आहे अशी भावना या काळात मराठवाड्यातील ग्रामीण जनतेत निर्माण झाली. तत्कालीन कनिष्ठ मध्यमवर्गीय मंडळींची नाळ ग्रामीण जनतेच्या सुख-दुःखाशी जोडलेली होती. मराठवाड्याचे संपादक ब्राह्मण असले तरी खेड्यातल्या जनतेचे

दुःख हे त्यांचेच दुःख होते. शिवाय ज्या राजकीय विचारप्रणालीचा स्वीकार वाघमारे-अनंतरावांनी केला होता ती विचारप्रणाली सामान्य जनतेचे प्रश्न मांडू इच्छिणारी, त्यांच्यासाठी लढणारी होती.

# ६. राज्यपुनर्रचना

२८ मे १९५३ च्या अंकावर अनंत भालेरावांचे नाव संपादक म्हणून प्रसिद्ध झाले आणि त्यांनी 'मराठवाडा' साप्ताहिकाची सूत्रे हाती घेतली. या काळात मराठवाड्यावर दूरगामी परिणाम करणाऱ्या अनेक घटना घडत होत्या. अनंतराव आणि साप्ताहिक 'मराठवाडा' हे या घटनांचे साक्षीदार तर होतेच; शिवाय या परिवर्तनाच्या प्रक्रियेत एक छोटेसे भागीदारसुद्धा होते. घडत असलेल्या घटनांचे स्वरूप लक्षात घेऊन त्याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करायची, लोकशिक्षण करायचे हे आपले संपादकीय कर्तव्य अनंतराव तर करीत होतेच, शिवाय या घटनांच्या अनुरोधाने जो बदल होणार आहे त्यात मराठवाड्याचे हित कसे जपले जाईल याचाही प्रयत्न करीत होते.

१९५३ साली पोट्टी श्रीरामलू यांनी स्वतंत्र आंध्र प्रदेशाच्या स्थापनेसाठी उपोषण केले व त्यातच त्यांचा अंत झाला. लोकक्षोभाच्या भीतीने आंध्र राज्याच्या निर्मितीची घोषणा करण्यात आली. राज्यकर्त्यांनी आजवर लांबणीवर टाकलेला भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. राज्यपुनर्रचना आयोग नेमण्यात आला. हैदराबादमधील वातावरणात विशेषतः तेथील मराठी जनतेत विशेष खळबळ सुरू झाली.

आंध्रच्या पाठोपाठ दक्षिण आणि मध्य भारतात भाषावार प्रांतरचना आता होणार असा अंदाज बांधला जाऊ लागला होता. विदर्भाच्या काही नेत्यांनी, विशेषतः ब्रिजलाल बियाणी यांनी स्वतंत्र विदर्भाचे शिंग फुंकले होते. विदर्भ राज्य लहान होत असेल तर मराठवाड्याने त्यात सामील व्हावे, निदान मराठवाड्याचे काही जिल्हे विदर्भाला जोडले जावे अशी त्यांची मनीषा होती. सुदैवाने मराठवाड्यात विदर्भाच्या स्वतंत्र राज्याला व त्यात मराठवाड्याने सामील होण्याला कोणीही पाठिंबा दिला नाही.

हैदराबाद स्टेट काँग्रेसचे एक जुने मवाळ नेते आणि हैदराबाद विधानसभेचे सभापती काशीनाथराव वैद्य यांनी स्वतंत्र मराठवाड्याची कल्पना मांडली; पण तिलाही कोणीच उचलून धरले नाही.

निजामाच्याविरुद्ध संघर्ष करीत असताना सरंजामदारी जुलुमी सत्ता संपावी त्याबरोबरच लोकभाषेत राज्यकारभार सुरू व्हावा व जबाबदार सरकार यावे हीच मराठवाड्याच्या जनतेची आकांक्षा होती. विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या दोन्हींशी मराठवाड्याचे संबंध असले तरी पंढरपूरचा विठोबा आणि मराठी सांस्कृतिक प्रगतीचे बोधचिन्ह झालेली मुंबई आणि पुणे ही शहरे ज्या भागात होती त्या भागाशी आपण संलग्न व्हावे हे त्या आकांक्षेचे दृश्यरूप होते.

१ ऑक्टोबर १९५३ रोजी आंध्र राज्य अस्तित्वात आले. त्याच दिवशीच्या आपल्या अग्रलेखात अनंतरावांनी जन्मास येत असलेल्या आंध्र राज्याचे स्वागत केले. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात नागपूर येथे महाराष्ट्र आणि विदर्भाच्या काही पुढाऱ्यांची एक बैठक झाली. विदर्भाला न्याय्य वागणुकीचे आश्वासन देणे हा या बैठकीचा उद्देश होता. या बैठकीत भावी महाराष्ट्राच्या राज्यकारभाराबद्दल आणि विदर्भाच्या वाट्याबद्दल काही महत्त्वाच्या तरतुदी असलेला 'नागपूर करार' करण्यात आला. या बैठकीमुळे आणि करारामुळे मराठी भाषिकांचे एकच राज्य होण्याचा मार्ग खुला झाला. या बैठकीला मराठवाड्यातील कोणताही नेता हजर नव्हता. परंतु अटी घालून किंवा करार करून मगच आपण महाराष्ट्रात सामील होण्याचा निर्णय करावा अशी मराठवाड्याची भूमिकाच नव्हती. ८ ऑक्टोबर रोजीच्या आपल्या अग्रलेखात अनंतरावांनी नागपूर कराराचे स्वागत केले; मात्र 'मागासलेल्या मराठवाड्याकडे लक्ष देऊ' म्हणजे काय? असा परखड प्रश्न विचारला. पोकळ आणि मोघम आश्वासने देण्याची जी प्रथा पुढे खूपच रुळली आणि सर्वांच्या परिचयाची झाली त्या प्रथेचा अनंतरावांनी तिच्या प्रारंभकाळातच समाचार घेतला होता.

ब्रिजलाल बियाणी यांनी मराठवाड्यातील काही भागांचा दौरा करून विदर्भाच्या राज्याला मराठवाड्याची जनता अनुकूल आहे व दोन मराठी भाषिक राज्ये झाल्याने जनतेचे अधिक हित होईल, असे म्हटले होते. त्यांच्या या दोन्ही विधानांचा समाचार 'श्री. बियाणींचे धुत्कार' या अग्रलेखात अनंतरावांनी घेतला. नागपूर करार ही

महाराष्ट्राच्या एकीकरणासाठी झालेली महत्त्वाची गोष्ट होती. आपण हा करार करताना सामील नसलो तरी आपण त्यातील भावनेला- महाराष्ट्राच्या सर्व भागांना समान न्याय देण्याच्या भावनेला- पाठिंबा द्यावा म्हणून मराठवाड्यात काँग्रेसजनांच्या बैठकी झाल्या.

२२ डिसेंबर १९५३ रोजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी लोकसभेत राज्यपुनर्रचना आयोग स्थापन करीत असल्याची घोषणा केली. न्या. सय्यद फ़ाजल अली, पंडित हृदयनाथ कुंझरू आणि भारताचे राजदूत सरदार के.एम. पण्णीकर हे तिघे या आयोगाचे सदस्य होते. या आयोगासमोर महाराष्ट्राची बाजू आणि मराठवाड्याची बाजू व्यवस्थित मांडली जावी असा प्रयत्न सुरू झाला. संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात यावा म्हणून संयुक्त महाराष्ट्र परिषदेची पुनर्घटना करण्यात आली. शंकरराव देव अध्यक्ष व भाऊसाहेब हिरे कार्याध्यक्ष असलेल्या या परिषदेत स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, देवीसिंग चौहान, बाबासाहेब परांजपे, फुलचंद गांधी, दिगंबरराव बिंदू वगैरे मराठवाड्यातील कार्यकर्त्यांचा समावेश होता.

निजामाच्या राज्यात आजवर दडपून टाकण्यात आलेल्या मराठी भाषा आणि मराठी साहित्य, संस्कृती यांच्या आकांक्षांना नवी पालवी फुटू लागली होती. मोकळ्या झालेल्या वातावरणात संस्थानातील तेलगू, मराठी आणि कन्नड या तिन्ही लोकभाषांचा राज्यव्यवहार आणि शिक्षण दोन्ही क्षेत्रांत वापर सुरू झाला होता. माध्यमिक शाळांत आजवर सक्तीने लादलेले उर्दू माध्यम आता ऐच्छिक झाले होते आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेत शिकण्याची मुभा मिळाली होती. या तिन्हीही लोकभाषेत शालेय क्रमिक पुस्तके तयार व्हायला प्रारंभ झाला होता.

हैदराबाद संस्थानामध्ये 'मराठवाडा साहित्य परिषद' ही साहित्य संस्था १९४३ साली स्थापन झाली होती. परंतु संस्थानातील वातावरणामुळे फारसे कार्य या संस्थेला करता आले नव्हते. स्वातंत्र्यानंतर या संस्थेच्या कामाला उत्साहाने पुन्हा प्रारंभ झाला. न.शे. पोहनेरकर, भालचंद्रमहाराज कहाळेकर, रा.ब. माढेकर आदींनी संस्थेच्या संघटनात्मक कामात लक्ष घालून तिचा विस्तार वाढवला. ठिकठिकाणच्या शिक्षकांनी साहित्य परिषदेच्या शाखा आणि विशेषतः तिच्या परीक्षांची केंद्रे सर्वत्र स्थापिली. नव्या सरकारात मंत्रीपद भूषवणारे दिगंबरराव बिंदू, फुलचंद गांधी आणि गोपाळराव

एकबोटे यांना मराठी भाषा आणि वाङ्मय यांच्याविषयी प्रेम तर होतोच ; त्याचबरोबर शासनाच्या सेवेत अधिकारपदावर असलेल्या मुरलीधरराव घाणेकर, सेतूमाधवराव पगडी अशा अनेकांनी परिषदेला शासकीय पाठबळ दिले. आजवर अवघड असलेल्या मराठी पुस्तकांच्या प्रकाशनांना हैदराबादेत प्रारंभ झाला होता. सप्टेंबर १९५५ मध्ये 'पुन्हा नभाच्या लाल कडा' या बी. रघुनाथ यांच्या कवितासंग्रहाचे आणि काही महिन्यांनंतर भगवंतराव देशमुख यांच्या 'आलोक' या लघुनिबंध संग्रहाचे प्रकाशन झाले होते. मराठवाडा साहित्य परिषदेचे मुखपत्र म्हणून एक मासिक प्रसिद्ध करावे असा निर्णय परिषदेने घेतला. या मासिकासाठी 'प्रतिष्ठान' हे पैठणचे जुने नाव निश्चित करण्यात आले. डॉ. नारायणराव नांदापूरकर यांची प्रमुख संपादकपदी नेमणूक झाली. संपादक मंडळात अनंत भालेराव यांचाही समावेश होता. हे मासिक सप्टेंबर १९५३ पासून नियमितपणे प्रसिद्ध होऊ लागले. मराठवाड्यातील लेखकांना आपले एक हक्काचे व्यासपीठ या मासिकाने उपलब्ध करून दिलेच; शिवाय मराठी समीक्षा आणि कविता यात मोलाची भर या मासिकाच्या माध्यमातून घातली गेली.

अनंत भालेराव स्वतः वाङ्मयाचे प्रेमी; चांगले वाचक. त्यांना साहित्य संस्थेत रस होताच. संस्थेचे पदाधिकारी न होता तिच्या अभिवृद्धीसाठी सर्व काम करावयास ते तयार असत. 'मराठवाडा' वृत्तपत्र हे तर जणू काही मराठवाडा साहित्य परिषदेचे मुखपत्रच आहे एवढे प्राधान्य परिषदेच्या कार्याच्या प्रसिद्धीला 'मराठवाडा' देई. दादा वाघमारे आणि अनंतराव या दोन्ही संपादकांनी, मराठी भाषा आणि वाङ्मय आणि त्यांच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या साहित्य परिषदेसारख्या संस्था या आपल्या विकासासाठी महत्त्वाच्या आहेत हे लोकांच्या मनावर बिंबविले. या काळात मराठवाडा साहित्य परिषदेशी तिचे एक संवर्धक म्हणून अनंतरावांचा जो संबंध जडला तो त्यांच्या आयुष्यभर कायम राहिला.

राज्यपुनर्रचना होणार आणि मराठवाडा हा पश्चिम महाराष्ट्राला जोडला जाणार ही गोष्ट स्पष्ट होती. विदर्भ वेगळा होणार काय, मुंबईचे भवितव्य काय असेल वगैरे प्रश्न अनिर्णित असले तरी हैदराबाद संस्थानाचे त्रिभाजन होणार हे नक्की होते. मराठवाडा निजामाच्या राज्याचा भाग असताना सरंजामदारी सत्तेने त्याकडे केलेल्या दुर्लक्षामुळे त्याचे मागासलेपण तसेच कायम राखले होते. निजामाने एकूणच जनतेच्या

विकासाकडे दुर्लक्ष केले असले तरी त्यातही मराठवाडा हा राजधानीपासून दूर असलेला भाग आणखीच अविकसित राहिला होता. आता हैदराबाद राज्य त्रिभाजित होणार होते. योजनाबद्ध विकासाला देशात नुकताच प्रारंभ झाला होता. पहिली पंचवार्षिक योजना संपत आली होती आणि दुसऱ्या योजनेचा आराखडा तयार होऊ लागला होता. मराठवाड्याच्या विकासासाठी काही संघटित प्रयत्न करावे लागतील हे लक्षात आल्यावर मराठवाड्याच्या नेते मंडळींनी एकत्र जमून या प्रदेशाच्या विकासासाठी काही निश्चित मागण्या करण्याचे ठरवले. हैदराबाद राज्याच्या वतीने, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी सुचवल्या जाणाऱ्या प्रकल्पात मराठवाड्यासाठी काही मागण्या करण्यात आल्या. मराठवाड्यात सिंचनाचे क्षेत्र कमी असल्यामुळे येथे शेतीसाठी पाणीपुरवठा करणारी धरणे बांधावीत, मराठवाड्यात रेल्वेमार्ग वाढवावेत या त्यातील प्रमुख मागण्या होत्या. यासाठी मराठवाड्यातील सर्व आमदारांनी मिळून एक निवेदनही राज्य सरकारला सादर केले होते.

राज्य सरकारशी झालेल्या विचारविनिमयानंतर योजना आयोगाने पंचवार्षिक योजनेचा जो आराखडा मान्य केला त्यात तेलंगणसाठी पंधरा कोटी तेवीस लक्ष रुपये, हैदराबाद राज्यातील कर्नाटकसाठी एकवीस कोटी एकूणपन्नास लक्ष आणि मराठवाड्यासाठी फक्त दोन कोटी त्र्याहत्तर लक्ष रुपये आले होते. मराठवाड्यावर झालेल्या या अन्यायाच्या विरोधात 'मराठवाडा' वृत्तपत्राने आवाज उठवला.

मराठवाड्याला स्वतंत्र विद्यापीठ असावे ही मागणी प्रत्यक्षात यावयाची असेल तर येथे वैद्यक, अभियांत्रिकी, कायदा अशी व्यावसायिक महाविद्यालये अगोदर स्थापन व्हावी लागतील व अस्तित्वात असलेल्या इतर महाविद्यालयांची संख्या वाढवावी लागेल हेही स्पष्ट होते. स्वामी रामानंद तीर्थांनी नांदेड येथे नांदेड एज्युकेशन सोसायटी स्थापन करून त्याद्वारे पीपल्स महाविद्यालयाची स्थापना केली होती, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या वतीने मिलिंद महाविद्यालय स्थापन केले होते. लातूर येथे अभियांत्रिकी महाविद्यालयाची पूर्वतयारी म्हणून पुरणमल लाहोटी स्मारक पॉलिटेक्निक, स्वामी रामानंद व बाबासाहेब परांजपे यांनी स्थापन करण्याचा प्रयत्न सुरू केला व १९५६ पासून ते सुरू झाले. योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने एका विज्ञान महाविद्यालयाला प्रारंभ झाला होता.

जुलै १९५६ मध्ये औरंगाबाद येथे नागरिकांच्या एका सभेत स्वतंत्र विद्यापीठाची मागणी करण्यात आली होती. त्याच दिवशी गावात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या एका मोठ्या मोर्चाने तीच मागणी केली होती.

मराठवाड्याच्या विकासाबरोबरच राज्यपुनर्रचनेने आणखी काही प्रश्न निर्माण होणार होते. हैदराबाद राज्य सरकारच्या सेवेत असलेल्या मराठवाड्यातील अनेक शासकीय कर्मचाऱ्यांना मुंबई शहरात तर काहींना इतरत्र जावे लागणार होते. या कर्मचाऱ्यांना नव्या सेवेत सामावून घेताना न्याय दिला गेला नाही तर त्यांच्याही गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्याचे काम 'मराठवाडा' वृत्तपत्राला करावे लागणार होते. अनुभव असा आला की, प्रत्येक खात्याच्या आणि प्रत्येक श्रेणीच्या शासकीय नोकरांचे एकत्रीकरण करताना, हैदराबाद राज्यातून आलेल्या राज्य सरकारच्या सेवकावर अन्याय करणाऱ्या भूमिकाच वरिष्ठ नोकरशाहीने घेतल्या. त्यासाठी पुढे राज्य सरकारला मराठवाड्यातील शासकीय नोकरांच्या तक्रारींची दखल घेणारा एक कक्ष स्थापन करावा लागला. काही सरकारी नोकरांना सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन दाद मागावी लागली. मराठवाड्याच्या राजकीय नेतृत्वापेक्षा 'मराठवाडा' वृत्तपत्राला अशा काही बाबतीत जास्त पुढाकार घ्यावा लागला. लोकांच्या तक्रारी वेशीवर मांडाव्या लागल्या. साहजिकच मराठवाडा हे वृत्तपत्र हेच आपले नेते आहे अशीही एक भावना लोकमानसात निर्माण झाली. एखाद्या वृत्तपत्राला एखाद्या प्रदेशातील जनता आपले सर्व भेद विसरून आपला नेता मानते यापेक्षा कोणते अधिक श्रेय वृत्तपत्राच्या वाट्याला येऊ शकेल?

हैदराबाद संस्थान मुक्त झाल्यानंतर जे राजकीय प्रश्न उपस्थित झाले, त्यात सत्ता कोणाच्या हाती असावी हा महत्त्वाचा प्रश्न होता. चळवळीत फारसा पुढाकार नसलेल्या मवाळांना थोडेसे राजसत्तेचे पाठबळ मिळाले आणि तडजोडी करण्याची त्यांची क्षमता अधिक असल्यामुळे ते या डावपेचात यशस्वी ठरले. पुढच्या काळात प्रादेशिकवाद आणि जातीयवाद उपस्थित करून सत्तेचे लोणी आपल्या ताटात ओढून घेण्याचा प्रयत्न हैदराबादेतसुद्धा झाला. या सर्व प्रकाराकडे उद्वेगाने पाहणे एवढेच शक्य होते. मराठवाडा वृत्तपत्राने राजकारणातसुद्धा मूल्यदृष्टी कायम राखली जावी असा आग्रह सातत्याने धरला. काँग्रेस पक्षाच्या धोरणानुसार शेतीसुधारणा घडवून आणाव्यात व कुळांच्या हक्कांचे रक्षण व्हावे यासाठी हे वृत्तपत्र धडपडले. १९५०

साली हैदराबादेत अमलात आलेल्या कूळकायद्यातील तरतुदींना सौम्य करून जमीनदारांचे हित पाहणाऱ्या काही दुरुस्त्या, त्रेपन्न साली राज्य सरकाराने प्रस्तावित केल्या. या दुरुस्त्यांना मराठवाड्याने आणि पुरोगामी डाव्या आघाडीने जोरदार विरोध केला. कॉंग्रेसजनांना त्यांच्याच जाहीर धोरणाची आठवण करून देत, त्यांनीसुद्धा या दुरुस्त्यांना विरोध करावा अशी अनंतरावांनी मागणी केली.

राज्यपुनर्रचना होणार हे ठरल्यावर त्याची पूर्वतयारी म्हणून कोणत्या तालुक्यात कोणती भाषा अधिक वापरली जाते हे पाहून, त्या तालुक्यात न्यायसंस्थेने ती भाषा वापरावी असा हुकूम हैदराबाद उच्च न्यायालयाने काढला. दुर्दैवाने याही प्रकरणात मराठी भाषिकांवर अन्याय झाला. आज महाराष्ट्रात असलेले किनवट आणि राजुरा हे दोन तालुके तेलगू बहुभाषिक आहेत असे समजून, त्यातील कोर्टात तेलगू भाषेचा वापर करावा व संतपूर या बीदर जिल्ह्यातील मराठीबहुल तालुक्यात, कन्नडचा वापर करावा असा आदेश होता. हा आदेश बदलला जावा यासाठी 'मराठवाडा' ने खूप प्रयत्न केले.

लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्स हा जनता लोकशाही आघाडीचा एक घटक पक्ष होता. त्रेपन्न सालाच्या प्रारंभीच या आघाडीत मतभेद तीव्र होण्याला प्रारंभ झाला होता. बावन्नच्या निवडणुकीत प्रचंड मोठा पराभव लीगला पत्करावा लागला व तिचे विधानसभेसाठीचे सर्वच उमेदवार पराभूत झाले होते. कम्युनिस्टांनी आघाडी करावयाची, पण तिचे नेतृत्व आपल्याकडेच असावे व आपल्याला त्याचा राजकीय फायदा व्हावा ही भूमिका येथेही घेतली होती. कामगार, किसान यासारख्या संघटना आघाडीच्या नेतृत्वाखाली चालू नाहीत तर आघाडीनेच ; कामगारांच्या म्हणजे कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली काम केले पाहिजे, असा त्यांनी जाहीर आग्रह धरण्याला प्रारंभ केला होता. जनता लोकशाही आघाडी ही व्यापक जनाधाराच्या आधारे उभी राहू नये असे कम्युनिस्टांचे धोरण होते. गोविंदभाई श्रॉफ हे जनता लोकशाही आघाडीचे सरचिटणीस होते. त्यांनी एप्रिल १९५३ मध्ये सरचिटणीसपदाचा राजीनामा दिला; परंतु तो मंजूर करण्यात आलेला नव्हता. जून १९५३ मध्ये गोविंदभाईंनी कम्युनिस्टांची भूमिका आपल्याला अमान्य असल्याचे जाहीरपणे सांगणारे एक पत्रक मराठवाड्यात प्रसिद्ध केले. कॉ. बद्दम यल्लारेड्डी यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने गोविंदभाईंना उत्तर देणारे

पत्रक प्रसिद्ध केले व त्यात कामगारांचे म्हणजे कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व कसे आवश्यक आहे, आघाडीचे वेगळे नेतृत्व असू शकत नाही अशी भूमिका मांडली. येथून लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्स आणि जनता लोकशाही आघाडी यांचे मार्ग वेगवेगळे होण्याचे निश्चित झाले. पुढे लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्स विसर्जित झाली आणि अनंतराव नंतर बराच काळ पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहून, लोकांचे प्रश्न मांडणारा व सत्तेच्या विरोधात लोकसंघर्षाला पाठिंबा देणारा पत्रकार म्हणूनच काम करत राहिले.

जानेवारी १९५३ मध्ये हैदराबादेत अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले होते. या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षीय भाषणात अध्यक्ष जवाहरलाल नेहरूंची नाराजी पत्करून स्वामी रामानंद तीर्थांनी हैदराबादचे त्रिभाजन करून ; ती ती भाषा बहुल असलेले भाग लगतच्या त्या भाषिक प्रदेशात सामील करावेत अशी मागणी केली होती. स्वतः जवाहरलाल नेहरूंचा हैदराबादच्या विभाजनला विरोध होता. हैदराबाद हे एक दक्षिणी संमिश्र संस्कृतीचे केंद्र म्हणून कायम राहावे असे त्यांना वाटत होते. हैदराबादचे विभाजन झाले नाही तर भाषिक राज्यांची कल्पना अमलात येऊ शकणार नाही हे तर खरेच होते; परंतु त्याचबरोबर अविभक्त हैदराबाद हे सरंजामदारी व्यवस्थेचे आणि जातीय सत्तेचे एक बलाढ्य केंद्र राहिले असते. हैदराबादचे काँग्रेस अधिवेशन संपल्यानंतर हैदराबादेतील हितसंबंधीयांनी हैदराबादच्या त्रिभाजनाविरुद्ध लोकमत तयार करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यासाठी एक उर्दू परिषदही झाली. या सर्व कारवायांना अनंतरावांनी तीव्र विरोध केला. ९ मे १९५४ च्या आपल्या 'हैदराबादेतील संस्कृती संगमाचे थोतांड' या अग्रलेखात संमिश्र संस्कृतीच्या- मुश्तरिका तमद्दुन- या भ्रामक कल्पनेची त्यांनी कडक हजेरी घेतली. संस्कृती म्हणजे रेल्वेचा डबा नाही. ज्या संस्कृतीत सर्वसामान्यांच्या भाषा आणि जीवनपद्धतीला स्थान नाही त्याला संस्कृती कसे म्हणता येईल, असा सवाल त्यांनी विचारला. त्यांनी लिहिले "हैदराबादेतल्या देवड्यांत बुरसटलेल्या कबुतरखान्यात जुने घाण जीवन जगणारे सरंजामदारी नवाब, जहागीरदार आणि त्यांचे खुषमस्करे यांची जीवनपद्धती म्हणजे जर दक्षिणी संस्कृती असेल तर ती संस्कृती त्यांनाच लखलाभ होवो. हैदराबादचा संस्कृती संगम सरंजामदारी निजाम आणि जातीयवादी रझाकार यांच्या अधःपतित आमदानीचा काळा इतिहास आहे. तो त्यांच्याबरोबरच

नष्ट झाला पाहिजे." याच काळात लातूरला मराठवाडा साहित्य संमेलन भरणार होते. संस्थानातील काही हिंदू मवाळ मंडळीसुद्धा स्वतंत्र हैदराबादच्या (संस्थान होते तसेच कायम ठेवण्याच्या) जाळ्यात अडकतील असा संभव दिसू लागला होता. म्हणून अनंतरावांनी आपल्या अग्रलेखात या संमेलनाने त्रिभाजनाला विरोध करणारांचे विचार बाजूला सारून संयुक्त महाराष्ट्राचा जयजयकार करावा असा सल्ला दिला.

स्वतंत्र हैदराबाद जमलेच नाही तर निदान तेलंगण आंध्रात सामील होऊ नये तर त्याचे स्वतंत्र राज्य तयार व्हावे असा प्रयत्न काही मंडळी करीत होती. नारायणदास डागा हे हैदराबादच्या राजकारणाशी संबंध नसलेले गृहस्थ काँग्रेसमधील एका गटाच्या पाठिंब्याने राज्यसभेवर नियुक्त झाले होते. त्यांनी स्वतंत्र तेलंगणला पाठिंबा दिल्यानंतर अनंतरावांनी 'दूध देते म्हणून गाढवी पाळा' या आपल्या उपरोधपूर्ण अग्रलेखात डागांच्या मागणीचा विरोध केला. अनंतरावांची भाषा ही प्रसंगपरत्वे कशी अधिक अर्थवाही बनते याचे उदाहरण म्हणून १ जुलै १९५४ च्या या अग्रलेखातील काही भाग पाहण्यासारखा आहे. मराठवाड्यातील खास शब्दप्रयोग अशा वेळी त्यांच्या लेखनात हमखास येतात. स्वार्थाने प्रेरित होऊन स्वतंत्र तेलंगणचा पुरस्कार करणाऱ्या कृतीला उद्देशून ते लिहितात- 'डागा यांच्या आडतीवर आलेले स्वतंत्र तेलंगणचे हे वक्कल ते हिरीरीने पुकारून गिऱ्हाईकाच्या माथी मारीत आहेत.'

वारकरी कुटुंबात जन्म झालेल्या अनंतरावांनी ज्ञानेश्वर-तुकारामांच्या विचारांचे संस्कार घेतलेले होते; पण ते सामाजिकदृष्टीने अत्यंत पुरोगामी विचारांचे होते. जळगाव येथे १९५४ साली राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या पुनरुज्जीवनानंतर दुसरी महाराष्ट्र परिषद न्या. प्र.बा. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली भरली. यानिमित्ताने अनंतरावांनी लिहिलेला अग्रलेख 'सामाजिक सुधारणेचे सव्यापसव्य' सामाजिक सुधारणेसाठी कठोर उपाययोजनेची आवश्यकता सांगणारा आहे. लोकशिक्षणाच्याबरोबर उपाययोजना जर झाली नाही तर सामाजिक सुधारणा होणारच नाही, असे मत अनंतरावांनी मांडले आहे. आपल्या नाठाळ मुलाला वठणीवर आणण्यासाठी आई जशी कठोर बनते, तसे सरकार आणि समाज यांनी बनण्याची गरज आहे असे त्यांनी प्रतिपादिले आहे.

२२ डिसेंबर १९५३ रोजी लोकसभेत पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी राज्यपुनर्रचना आयोग नेमल्याची घोषणा केली. न्या. सय्यद फाजल अली, पंडित हृदयनाथ कुंझरू

आणि सरदार के.एम. पण्णीकर त्याचे सभासद होते. राज्यपुनर्रचना आयोग मराठवाड्यात आला तेव्हा मराठवाड्याने महाराष्ट्राचे एकच राज्य व्हावे व आम्हाला महाराष्ट्रात सामील करण्यात यावे (वेगळा विदर्भ झाला तर त्यात नको), अशी एकमुखी मागणी केली.

ह्या प्रश्नावर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले असतानाच एक महत्त्वाची घटना महाराष्ट्रात घडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लक्षावधी अनुयायांसह नागपूर येथे बौद्ध धर्म स्वीकारला. या घटनेसंबंधी आपली प्रतिक्रिया व्यक्त करणारा एक अतिशय संतुलित अग्रलेख अनंतरावांनी १८ ऑक्टोबर १९५६ च्या अंकात लिहिला. 'डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर' या आपल्या अग्रलेखात अनंतरावांनी आंबेडकरांच्या या धर्मांतराच्यानिमित्ताने डॉ. आंबेडकर किंवा त्यांचे अनुयायी यांनी हिंदू धर्माविषयी तिरस्कार व्यक्त केला तर त्यामागे त्यांनी आजवर भोगलेल्या अवहेलनेचे दुःख आहे ; हे हिंदूंनी समजून घेतले पाहिजे व आपला विवेक शाबूत ठेवून, त्यांच्या चुकाही पोटात घातल्या पाहिजेत असे म्हटले. धर्मांतरामुळे आजवर दलितांना मिळणाऱ्या सवलती बंद होणार का, असा प्रश्न चर्चिला जात होता. त्याचा उल्लेख करून अनंतरावांनी म्हटले, धर्म बदल्यामुळे ताबडतोब एखाद्या समाजाचे मागासलेपण जाते हे समजणे चुकीचे आहे. धर्म बदलला तरीही दलितांच्या सवलती सरकारने चालूच ठेवल्या पाहिजेत अशी अनंतरावांनी स्पष्ट मागणी केली आहे.

नोव्हेंबर १९५६ पासून 'मराठवाडा' औरंगाबाद या मराठवाड्याच्या राजधानीत प्रसिद्ध होणार होता. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात अनंतराव औरंगाबादला आले आणि त्यांनी तेथील व्यवस्थेची जुळवाजुळव केली. दोन-तीन अंक बंद ठेवून ११ नोव्हेंबर १९५६ ला औरंगाबाद येथून 'मराठवाडा' अर्धसाप्ताहिक नियमितपणे प्रसिद्ध होऊ लागले.

## ७. नवी मांडामांड आणि नव्या चळवळी

औरंगाबादच्या जाधवमंडी भागात कम्युनिस्ट नेते चंद्रगुप्त चौधरी यांच्या बंगल्याच्या आवारातील जागेत अनंतराव आणि त्यांचे कुटुंब राहायला आले. माडीवरच्या एका जागेत एक प्रशस्त हॉलवजा जागा होती. त्या जागेत अनंतरावांची सार्वजनिक बैठक असे. बैठकीच्या एका कोपऱ्यात शारदा मंदिरचे आणि मराठवाडा साहित्य परिषदेचे काम पाहणारे विठ्ठलराव जोशी, आपले सगळे दप्तरच एका छोट्याशा लाकडी कपाटात मांडून बसलेले असत. औरंगाबादमध्ये अनंतराव आल्यानंतर लगेचच त्यांचा लोकसंग्रह आणि मित्रपरिवार वाढू लागला. त्यामुळे मुलांना अभ्यासाला किंवा घरातल्या कोणाला वावरायला त्या हॉलचा उपयोगच राहिला नाही. गुलाबचंद नागोरीसारखा मिस्किल स्वभावाचा स्वातंत्र्यचळवळीतला नेता दुपारच्यावेळी गप्पा मारायला येई आणि हॉलमध्येच आडवा होऊन थोडी डुलकी, थोड्या गप्पा असा त्यांचा क्रम सुरू होई.

औरंगाबाद हे विभागीय केंद्र असल्यामुळे अनेक नवी सरकारी कार्यालये येथे येत होती. हैदराबादहून आणि मराठवाड्यातल्या इतर भागातूनही अनेक सरकारी नोकर औरंगाबादला नोकरीनिमित्त आले होते. निजामी काळात ते सुभ्याचे ठिकाण असले तरी फारशी प्रादेशिक कार्यालये नव्हती व होती त्यातही कर्मचाऱ्यांची संख्या अगदीच मर्यादित. आता औरंगाबादचे स्वरूप झपाट्याने पालटू लागले होते. नव्या पुनर्रचनेने नवे प्रश्नही निर्माण केले होते. या सर्व प्रश्नांसाठी आणि आपली गाऱ्हाणी ऐकून घेऊन जो त्यासाठी भांडेल असे नेतृत्व, 'मराठवाडा' अर्धसाप्ताहिक आणि त्याचे संपादक अनंत भालेराव यांच्या संयुक्त रूपाने औरंगाबादला आणि मराठवाड्याला मिळाले होते. राजकीय पक्षांच्या औरंगाबादेतील नेतृत्वापेक्षाही अधिक विश्वास 'मराठवाडा' आणि अनंतराव यांच्याबद्दल लोकांना वाटू लागला.

'मराठवाडा' अर्धसाप्ताहिकाबरोबरच मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यालयही औरंगाबादेत आले होते. भालचंद्रमहाराज कहाळेकर, रा. ब. माढेकर, श्रीधरराव कुलकर्णी अशी अनेक मंडळी हैदराबादेतच राहणार असली तरी मराठवाडा साहित्य परिषद मराठवाड्यातच असणे आवश्यक होते. हैदराबाद शहर आता तिचे केंद्र म्हणून उपयोगाचे नव्हते. परिषदेच्या धुरीणांपैकी न. शे. पोहनेरकर, भगवंत देशमुख आणि अनंत भालेराव हे तिघेच औरंगाबादेत आले होते. औरंगाबादेत मराठवाडा साहित्य परिषदेची नगर शाखा काम करीत होतीच. ऑगस्ट १९५७ मध्ये परिषदेचे केंद्रीय कार्यालय औरंगाबाद येथे आणण्यात आले. शारदा मंदिर कन्या विद्यालयाच्या एका खोलीत साहित्य परिषदेचा संसार सुरू झाला. मसापचे पूर्वीचे अध्यक्ष रा.ब. माढेकर हेच पुन्हा अध्यक्ष नेमले गेले, तर न. शे. पोहनेरकर हे परिषदेचे चिटणीस झाले. सप्टेंबर १९५७ पासून 'प्रतिष्ठान' हे परिषदेचे मासिक औरंगाबाद येथून प्रसिद्ध होऊ लागले. परिषदेची कार्यकारिणी आणि 'प्रतिष्ठान'चे नवे संपादक या दोन्हीतही अनंतरावांचा समावेश होता. पदाधिकारी कोणीही असले तरी प्रत्यक्ष कार्य आपलेच आहे या श्रद्धेने अनंतराव ते करीत राहणार हे उघड होते.

सराफा भागातील एक जुनी इमारत 'मराठवाडा' कार्यालयासाठी भाड्याने घेण्यात आली होती. मध्यभागी भलेमोठे अंगण आणि चौहोबाजूंनी दुमजली साधी इमारत असे बांधकाम होते. खूपच मोठा दिंडी दरवाजा होता. त्यातून आत आले की उजव्या बाजूला संपादकांची- अनंतरावांची खोली असे. खोलीत दोन्ही भिंतींना लाकडी कपाटे उभी केलेली होती. अनंतरावांच्या टेबलासमोर पाच-सहा खुर्च्या असत. त्याच खोलीत दरवाजासमोरच सहसंपादक असलेले रांजणीकर किंवा खोडवे बसत. अनंतरावांचे अग्रलेख लिहिणे सुरू झाले तरी भेटायला येणारांना प्रतिबंध नसे. लिहित असलेले वाक्य संपले की अनंतराव हातातले बॉलपेन खाली ठेवून आलेल्या माणसाचे स्वागत करीत. ओळखीच्या माणसांचे स्वागत करणारा प्रश्न 'काय महाशय?' असा असे. नवीन आलेला कोणी असेल तर 'काय, कोणीकडे आलात?' असा तो असे. भेटायला कितीही माणसे आली तरी अनंतरावांच्या लेखनाची तार तुटत नसे. भेटणारी माणसे आपल्याला समाजाच्या स्थितीगतीशी जोडतात असेच त्यांना वाटे. हे वागणे संपादकीय कार्यालयातच नव्हते. शेवटच्या काळात मायस्थेनियाने गाठले आणि तुम्हाला ताबडतोब कोणताही संसर्ग होऊ

शकतो म्हणून माणसांना भेटण्याचे टाळा, असा वैद्यकीय सल्ला मिळाला तरी अनंतरावांचा भेटीगाठी बंद करण्याला सक्त विरोध असे. 'माणसांना भेटायचे नाही तर मग जगायचेच कशाला?' असा सवाल ते करीत.

औरंगाबादेत राहायला आल्यानंतर आपण आणि आपले सहकारी यांच्या निवासासाठी, एखादी छोट्या घरांची वसाहत असावी म्हणून जागा घेऊन सन्मित्र कॉलनीच्या उभारणीला मित्रमंडळींनी सुरुवात केली. अनंतरावांच्या दृष्टीने घर फक्त स्वतःला किंवा सहकाऱ्यांनाच नको होते, घर आपण जपलेल्या संस्थांनाही हवे होते. 'मराठवाडा' वृत्तपत्र, ते छापले जाणारे 'जयहिंद मुद्रणालय' आणि ते मुद्रणालय चालवणारी संस्था 'भारत मुद्रक आणि प्रकाशक, लि.' तसेच 'मराठवाडा साहित्य परिषद' या सर्वांनाच घर हवे होते. म्हणून घेतलेल्या जागेत अनंतरावांनी या सर्वांचा संसार वसेल याची तरतूद केली. आज प्रचंड किंमत झालेली खूप मोठी जागा, केवळ एक हजार रुपये नाममात्र किंमत घेऊन, मराठवाडा साहित्य परिषदेला द्यावयास अनंतरावांनी सन्मित्र गृहनिर्माण संस्थेला सांगितले व ती तशी दिली गेली.

नव्या जागेत जेव्हा अनंतराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांची घरे उभी राहिली तेव्हा जाधवमंडीतील चौधरी बंगल्यातील जागा सोडून, अनंतराव सन्मित्र कॉलनीत राहावयास आले. आता पत्नी-मुले यांच्याबरोबरच आई आणि आत्याही होत्या. हळूहळू अनंतरावांचे घर सार्वजनिक कार्यकर्त्यांचे, विचारविनियमाचे आणि बाहेरुन येणाऱ्या कार्यकर्त्यांचे उतरण्याचे ठिकाणही झाले. रोज संध्याकाळी अनंतराव जवळच असलेल्या मराठवाडा कार्यालयातून घरी आले की, थोड्याच वेळात मंडळी हजेरी लावू लागली. गावातल्या सर्व पक्षाचे राजकीय कार्यकर्ते, साहित्य परिषदेचे कार्यकर्ते आणि लेखक, सरकारी कर्मचारी आणि शिक्षक अशांच्याबरोबरच; अनंतरावांच्या वडिलांपासून ज्यांचा घराशी स्नेह होता अशी खंडाळा, शिऊर, वैजापूर भागातील मंडळी यांचाही राबता असे. मराठवाडा वृत्तपत्राचे कार्यालय आणि तो छापणारे जयहिंद मुद्रणालय एकाच इमारतीत होते. दोन्ही संस्था एकमेकांशी जोडल्या गेलेल्या होत्या. मराठवाड्याचे संपादक असलेले अनंतराव भालेराव 'भारत मुद्रक आणि प्रकाशक लि.' या जयहिंद मुद्रणालयाच्या मालक कंपनीचे चिटणीस होते. जयहिंद मुद्रणालयाचे व्यवस्थापक जगन्नाथराव बर्दापूरकर मराठवाड्याचे एक विश्वस्तही होते. नफा कमावण्यासाठी दोन्ही संस्था निघाल्याही नव्हत्या आणि चालतही नव्हत्या. मुद्रणालय नफ्यात येऊ लागले की मराठवाडा

मुद्रणाचे दर कमी केले जात. मुद्रणालय नुकसानीत येईल असे वाटले तर छपाईचे दर वाढवले जात. ही जगावेगळी व्यवहारी दृष्टी दोन्ही संस्थांचे अध्यक्ष असलेल्या गोविंदभाई श्रॉफांची होती.

मराठवाडा वृत्तपत्र आणि त्यासाठी मुद्रणालय चालवणारी कंपनी, हे दोन्हीही एक कुटुंब आहे अशी नुसती भावना नव्हती तर व्यवहारही तसाच होता. अनंतरावांना जेवढा पगार तेवढाच प्रेसच्या व्यवस्थापकाना आणि मराठवाडा पत्राच्या व्यवस्थापकांनासुद्धा, असा गोविंदभाईंचाच नव्हे तर अनंतरावांचासुद्धा आग्रह असे. त्यामुळे काही वेळा कार्यकारी संपादकाला किंवा मुख्य उपसंपादकाला अनंतरावांपेक्षा जास्त पगार द्यावा लागला. संपादक म्हणून २०० रुपये आणि भारत मुद्रक आणि प्रकाशक लि.चे चिटणीस म्हणून ६०० रुपये असे दरमहा ८०० रुपये अनंतराव उचलीत. या तुटपुंज्या पगारातच मुलांची शिक्षणे, रोजचे येणारेजाणारे हे सर्व भागवावे लागे. अनंतरावांच्या पत्नीला- सुशीलाबाईंना ही कसरत करावी लागे. अनंतरावांचा पगार वाढवावा असा ठराव, भारत मुद्रक प्रकाशक लि.च्या बैठकीत एका स्नेह्याने मांडला व सर्वांनीच त्याला संमती दिली; पण अनंतरावांनी स्वतः विरोध करून तो ठरावच मागे घ्यावयास लावला. चळवळीच्या काळात घेतलेले दारिद्र्यातच राहण्याचे व्रत सोडून द्यायला अनंतराव तयार नव्हते.

स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतल्यापासून अनंतराव पूर्ण खादी वापरत असत. तीही तलम नसे. तलम खादी महाग तर होतीच पण ती वापरण्याला लागणारा नाजुकपणा अनंतरावांच्या जवळ नव्हता. धोतर जाडेभरडे आणि तशाच जाड्याभरड्या पांढऱ्या कपड्याचा शर्ट एवढाच त्यांचा पोषाख असे. अगदीच क्वचित प्रसंगी अंगावर खादीचा कोट चढे. अगोदरच अनंतरावांची उंची भरपूर त्यात कोट एक-दोन इंच नेहमीपेक्षा जास्त लांब असे. तोंडावर थोडेसे देवीचे व्रण असलेले, साधेपणा ओतप्रोत साकार झालेले अनंतराव कथाकार दि.बा. मोकाशींना प्राथमिक शाळेतले मास्तर दिसले. मोकाशींनी 'अठरा लक्ष पावलं' मध्ये केलेले हे वर्णन फारसे चुकीचे नव्हते.

प्रवास करतानासुद्धा अनंतरावांच्या काही विशेष गरजा नसत. आपले मित्र सहकारी रेल्वेच्या ज्या वर्गात प्रवास करीत त्याच वर्गात म्हणजे पूर्वीच्या तिसऱ्या आणि

आताच्या दुसऱ्या वर्गातून अनंतरावही जात. मराठवाडा साहित्य संमेलनाला जाणे असो की शासनाकडे एखादे शिष्टमंडळ घेऊन जाणे असो, अनंतराव मित्रांच्या बरोबरच असत. ते कोणी वेगळे आहेत, मोठे आहेत असे कधीही ते जाणवू देत नसत. संमेलनाच्या ठिकाणी सामान्य प्रतिनिधींच्या निवासस्थानातच ते उतरत. मराठवाड्यात विविध क्षेत्रांतील परिचित मित्रांचे संबंध अनौपचारिक असत. अगदीच अचानक कोणी आले तरी कोणाची फारच मोठी गैरसोय होत नसे आणि झाली तरी त्याला ती तशी वाटत नसे. साहित्य संमेलन किंवा इतर कामासाठी कुठे अनंतराव गेले म्हणजे एक-दोन मित्रांना बरोबर घेऊन अचानक परिचिताकडे जात. आम्ही जेवणार आहोत असे स्वतःच जाहीर करीत आणि त्या गृहिणीलाही या अनाहूतांच्या आगमनाचा आनंद होई.

'मराठवाडा' औरंगाबादला आला तेव्हा तो अर्धसाप्ताहिक होता. दर रविवारी आणि गुरुवारी मराठवाड्याचा अंक प्रकाशित होई. 'मराठवाड्यातील जनतेचे मुखपत्र' असे वर्णन वृत्तपत्राच्या नावाच्या शिरोभागी केलेले असे आणि ते शंभर टक्के खरे होते. त्यावेळी मराठवाड्यात सर्वात जास्त प्रतिष्ठा असलेले आणि लोकांचा विश्वास असलेले तेच पत्र होते. मराठवाड्यात तेव्हा अपवाद वगळता दैनिकेच नव्हती. शिवाय एक पथ्य या वृत्तपत्राने पाळले होते की आपण जागल्याची भूमिका करावयाची आहे. लोकांचे प्रश्न आणि त्यांच्या अडचणी मांडणे हेच आपले काम आहे. वृत्तपत्राला आवश्यक असलेली तटस्थ आणि निःपक्षपातीपणाची प्रतिमा 'मराठवाड्या'ला त्यामुळे आपोआप मिळाली.

मराठवाडा प्रदेशाचे मागासलेपण व कमकुवत राजकीय शक्तीमुळे त्याच्यावर होत राहणारे अन्याय, हा अनंतरावांच्या आणि 'मराठवाडा'पत्राच्या जिव्हाळ्याचा विषय होता. मराठवाड्याचे मागासलेपण ही निजामी राजवटीची देणगी होती. राजधानीच्या शहरापासून मराठवाडा दूर व त्यातही ऐतिहासिक कारणाने मराठी माणसावर निजामाचा राग. स्वातंत्र्यानंतर त्यात फार बदल झाला नाही. हैदराबाद राज्य असताना तेलंगण हा लोकसंख्येने बलवान असलेला भाग असल्यामुळे त्यांनीच स्वतःला झुकते माप दिले. हैदराबाद राज्याची सूत्रे मराठी नेतृत्वाकडे आलीच नाहीत. राज्यपुनर्रचना होताना सरकारी नोकरांची वाटणी होऊन त्यांना नव्या राज्यात पाठवल्यावर तेथेही त्यांच्यावर अन्याय झाले. योग्य त्या संवर्गात त्यांचा समावेश झाला नाही. सामावून



एन ४०५८-६अ

घेताना अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. महाराष्ट्राच्या नेतृत्वासाठी यशवंतराव चव्हाण आणि भाऊसाहेब हिरे यांच्यात लढत झाली तेव्हा मराठवाड्याने हिऱ्यांना पाठिंबा दिला. चव्हाण विजयी झाले आणि नंतर राज्याच्या मंत्रिमंडळात मराठवाड्याच्या विकासाचे प्रश्न लावून धरणारे आणि राजकीय इच्छाशक्ती असणारे प्रतिनिधित्व बराच काळ मिळाले नाही. सरकारी नोकरांचे व नंतर मराठवाड्याचे विकासाचे प्रश्न अनंतराव आपल्या वृत्तपत्रात मांडत राहिले. १९६९ साली लिहिलेल्या एका अग्रलेखात मराठवाडा, कोकण आणि विदर्भ या तीनही मागास भागांनी एकत्र आले पाहिजे ; नुसते मुख्यमंत्रिपद मिळाल्याने त्या भागाचा विकास होत नाही अशी भूमिका त्यांनी मांडली. महाराष्ट्रातील या तीनही भागांना तेलंगणप्रमाणे वैधानिक विकास मंडळे मिळाली पाहिजेत अशी त्यांनी मागणी केली.

अनंतरावांची भाषा त्यांच्या व्यक्तित्वातून जन्माला आली होती. त्यांच्या बहुश्रुततेने आणि वाचनाने तिला घडवण्यास साह्य केले होते. वडलांमुळे झालेले वारकरी संप्रदायाच्या वाङ्मयाचे संस्कार ती ल्याली होती. कृत्रिम अलंकरण किंवा शब्दपांडित्यांचे प्रदर्शन याचा तिला अजिबात सोस नव्हता. राजकारणातल्या किंवा समाजकारणातल्या दंभावर हल्ला चढवताना ती अस्सल मराठी आणि त्यातही मराठवाड्याची बने. एखाद्या गोष्टीचा उपहास करताना उपहास वस्तूच्या संदर्भातूनच अनंतरावांची शब्दप्रतिक्रिया जन्माला येई. अशोक मेहतांनी प्रजासमाजवादी पक्ष सोडून काँग्रेसमध्ये स्वतः गेल्यावर आपल्या भूतपूर्व पक्षातील मित्रांना काँग्रेसमध्ये येण्याचे आवाहन केले. प्रजासमाजवादी पक्षातले सुमारे ५०० लोक समारंभपूर्वक काँग्रेसमध्ये दाखल होणार असे जाहीर झाले. सत्ताधारी पक्षात गेले म्हणजे आपले घोडे गंगेत न्हाणार अशी त्या मंडळींची भावना असणार. तेव्हा 'दिल्लीच्या दिशेने उधळलेल्या या सैनिकांचे ५०० घोडे वाकडी वाट करून गंगेत न्हाऊन पुढे जाण्याचे ठरले तर त्या बिचाऱ्या गंगेची फजिती होऊ नये म्हणून आम्ही आपल्यापरीने गंगेला आधी इशारा देऊन ठेवतो की 'गंगे सावधान, घोडे येत आहेत.' जनता पक्षाच्या लोकसभा विजयानंतर जनता पक्षाच्या विजयाचा अश्वमेधी घोडा, महाराष्ट्रात आम्ही अडवणार अशी काँग्रेस नेत्यांनी भाषा केली. या दृष्टांताचा प्रतिवाद करताना अनंतरावांनी लिहिले 'आता गावखोरीच्या वेशीवर लोकशाहीच्या नावाने ठणाणा करणारे हे बारगीर तेव्हा इंदिरा गांधी आणि संजय गांधी यांच्या घोड्यांना खरारा करण्यात मग्न होते. घोड्यांना खरारा करणारे

अश्वमेधाचा घोडा काय अडवणार?' संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर आम्हाला राजीनामे देण्याची परवानगी द्या अशी मागणी करणारा ठराव त्यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने केला होता. राजीनामा देण्यासाठी परवानगी मागायची गरज नसते असे सांगत अनंतरावांनी या ठरावाबद्दल लिहिलेल्या अग्रलेखाचे शीर्षक होते 'गडे, आम्हाला रुसू द्या.'

त्यावेळी मराठवाड्यात दळणवळणाच्या सोयी कमी होत्या. आपल्या भागातील रस्ते, शाळा किंवा टपालखात्याच्या सोयी याविषयीच्या बातम्या आणि वाचकपत्रे मराठवाड्यात भरपूर असत; शिवाय आणखी बातम्या असत त्या वाघ दिसल्याच्या. मराठवाड्यात किनवट वगळता फारसे दाट जंगल नसले तरी झाडी होती आणि त्यात वाघ आणि बिबटेही होते. ते अधूनमधून दर्शन देत आणि लोक घाबरून मराठवाड्याला बातमी पाठवत. या नेहमीच्या बातम्या वगळल्या तर अनंतरावांचा भर असे शेतीविषयक अडचणीवर. मराठवाड्यात बहुतेक शेती जिरायत. पाऊस वेळेवर पडला नाही तर अनंतरावांच्या मनातील चिंता अग्रलेखातून व्यक्त होई. १९७२ साली मोठा दुष्काळ पडला. मराठवाड्यात तर त्याची तीव्रता अधिकच होती. अनेक कुटुंबे गाव सोडून मुंबईकडे काम शोधायला गेली. ठिकठिकाणी दुष्काळी कामे सुरू झाली. गुरांचे फार हाल झाले. अनंतरावांनी दुष्काळाबद्दल फक्त दुःख व्यक्त केले नाही. कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत हेही सांगितले. २२ नोव्हेंबर १९७२ रोजीच्या 'पुढच्या पेरण्यांची काळजी' या अग्रलेखात त्यांनी पुढील पेरण्यात दोन अडचणी येण्याचा संभव आहे, पहिली बियाण्यांची आणि दुसरी मशागतीसाठी लागणाऱ्या गुरांची, याकडे लक्ष वेधले. मराठवाड्यातल्या गुरांपैकी फार थोडी छावण्यात आश्रयाला आली आहेत. दोनशे रुपयालाही कोणी बैल विकत घ्यायला तयार नाही. कसायला गुरे देताना काळीज तुटते. सरकारी छावण्यात प्रत्येक शेतकऱ्याची किमान एक बैलजोडी तरी दाखल करून घ्यावी म्हणजे तेवढी तरी वाचेल असा त्यांचा सल्ला आहे. कधी 'मृगाने बहार केली' तर त्यांचे मन आनंदाने फुलून येई. मराठवाड्याचे तेव्हाचे आर्थिक जीवनच मुळी कोरडवाहू शेतीवर अवलंबून होते.

१९८७ साली मराठवाड्यात पुन्हा एकदा मोठा दुष्काळ पडला. मराठवाडा वृत्तपत्राने दुष्काळग्रस्तांच्या साह्यासाठी एक निधी उभारला. आपल्या वाचकांकडून जमा झालेली एक लक्ष ३८ हजार ३०८ रुपयांची रक्कम एका साध्या समारंभात मुख्यमंत्र्यांच्या

स्वाधीन करण्यात आली. दुष्काळाचा सर्वांत वाईट परिणाम ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होतो. जेथे माणसे आणि त्यांचे पशुधन यांच्या जगण्याचीच मारामार होते तेथे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे कोण लक्ष देत होते? यासाठी 'मराठवाड्या'ने जमा केलेला हा निधी दुष्काळी भागातल्या मुलांच्या शिक्षण साहित्याकडे खर्च झाला तर आम्हाला आनंद होईल अशी विश्वस्तांनी विनंती केली.

अनंतरावांच्या जिव्हाळ्याचा दुसरा विषय होता साहित्य, संस्कृती आणि सामाजिक प्रश्नाबद्दलचे सामुदायिक विचारमंथन. मराठवाड्यातच नव्हे तर जेथे जेथे सांस्कृतिक, सामाजिक किंवा राजकीय महत्त्वाच्या घडामोडी होत, त्याची जाणती दखल मराठवाडा वृत्तपत्र घेत असे. शेतकरी कामगार पक्षात र. के. खाडिलकर आणि दाजीबा देसाई वगैरे नेत्यांचे तात्त्विक वाद झाले आणि शेका पक्षात फूट पडण्याचा संभव निर्माण झाला त्याबद्दलच्या सर्व घडामोडी 'मराठवाडा' वृत्तपत्राने आपल्या वाचकांना कळवल्या. भाटघरच्या चर्चासत्राने राजकीय आचारसंहिता करण्याचा प्रयत्न केला, त्याची दखल विस्ताराने मराठवाड्याने घेतली. साहित्य संमेलने, संगीत संमेलने आणि सामाजिक परिषदा यांचे वृत्तांत, मुद्दाम प्रतिनिधी पाठवून अनंतराव लिहवून घेत व त्याला चांगली प्रसिद्धी देत. मराठवाडा हा महाराष्ट्रात चाललेल्या विचारमंथनापासून आणि सांस्कृतिक व वाङ्मयीन घडामोडीपासून अलिप्त राहू नये याची काळजी अनंतराव सतत करीत होते. एकदा औरंगाबादेत ख्यातनाम समीक्षक मेघश्याम पुंडलिक रेगे यांची सौंदर्यशास्त्रावर व्याख्याने झाली. त्याचा छोटासा वृत्तांत कोणी तरी पाठवला. तो जुजबी वृत्तांत वाचून अनंतरावांनी सुधीर रसाळांना बोलावून घेतले. 'रेगे काय बोलेले हे याला कळालेलेच दिसत नाही. तुम्ही व्याख्यानांना हजर होता. तुम्ही रेग्यांच्या भाषणाचा सविस्तर वृत्तांत लिहून द्या, असे अनंतरावांनी रसाळांना सांगितले. एवढा अवघड विषय किती लोक वाचणार अशी शंका रसाळांनी व्यक्त केली तेव्हा अनंतराव म्हणाले, 'नवे व चांगले त्यांच्या डोळ्याखालून तर जाऊ द्या, हळूहळू त्यांना ते वाचावेसे वाटू लागेल.' रेग्यांच्या भाषणाचा वृत्तांत दोन हप्त्यात अनंतरावांनी प्रसिद्ध केला.

पत्रकार एवढीच अनंतरावांची ओळख त्या काळातल्या मराठवाड्यात राहणे शक्य नव्हते. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेले बहुतेक तरुण कार्यकर्ते काँग्रेसचा त्याग करून विरोधी पक्षात दाखल झाले होते. काँग्रेसमधील चळवळीत असलेली ज्येष्ठ मंडळी नव्या राजकीय साच्यात बसू शकत नव्हती. त्यातल्या अनेकांनी

राजकारणातूनच निवृत्ती पत्करली होती. खुद्द औरंगाबाद शहरात नेतृत्वाची थोडी पोकळीच होती. माणिकचंद पहाडे यांचे निधन झाले होते. गुलाबचंद नागोरी राजकारणातून निवृत्त झाले होते. स. कृ. ऊर्फ भाऊसाहेब वैशंपायन पुन्हा काँग्रेसमध्ये परतले असले तरी त्यांचा प्रभाव फक्त वैचारिक क्षेत्रापुरताच होता. सरस्वती भुवन शिक्षण संस्थेची धुरा ते सांभाळत होते. बहुजन समाजात नेतृत्व निर्माण व्हावे असा प्रयत्न चालू होता. परंतु त्याला वेळ लागणार होता. अशा वेळी पक्षनिरपेक्ष कार्य करणारे गोविंदभाई श्रॉफ आणि पत्रकार अनंत भालेराव ही दोनच माणसे, लोकांना आपल्या प्रश्नाची तड लावण्यासाठी हाताशी होती. लोकांनी त्यांनाच ध्वजदंड मानून हातात घेतले. आपल्यावरील अन्यायाची बातमी मराठवाड्यात यावी, कारण तो आपला हक्कच आहे असे वाचकांनाच नव्हे तर वेगवेगळ्या राजकीय पक्षांनासुद्धा वाटे. गोविंदभाई मोठ्या प्रश्नांसंबंधी अभ्यासपूर्वक बाजू मांडत. त्यांच्याविषयी आदर होता पण सर्वसामान्य माणूस थोडे अंतर राखून त्यांच्याशी वागे. अनंतराव मात्र आपल्याच कुटुंबातील एक असावे असे सर्वांना वाटे. गावाच्या सार्वजनिक प्रश्नापासून व्यक्तिगत अडचणीपर्यंत सर्व काही अनंतरावांजवळ बोलले जाई आणि त्यांच्याकडून मदतीची अपेक्षा केली जाई. व्यापक समाजहिताविषयी आस्था असलेल्या कनिष्ठ मध्यमवर्गीय नेतृत्वाचा अनंत भालेराव एक आदर्श होते.

पत्रकार अनंतरावांना व्यग्र करणारे जे प्रश्न होते त्यात शेतकऱ्यांच्या सुख-दुःखाप्रमाणेच दलितांचे सुख-दुःख हाही होता. औरंगाबाद जिल्ह्यातल्या शिरसगाव येथे एका दलित स्त्रीला नग्न करून गावगुंडांनी तिची धिंड काढली. हे प्रकरण 'मराठवाड्या'नेच प्रकाशात आणले आणि नंतर महाराष्ट्राला कळले. लातूर तालुक्यातल्या माऊलगाव नावाच्या गावात एक आश्चर्य घडले. ग्रामपंचायतीत सरपंच आणि उपसरपंच या दोन्ही जागांवर दलित उमेदवार निवडून आले. गावातल्या दलितेतरांपैकी काहींचे यामुळे डोके फिरले. त्यांनी या दोघा पदाधिकाऱ्यांवर प्रचंड दडपण आणून त्यांना राजीनामे द्यावयाला भाग पाडले. 'जवळच असलेल्या तालुक्याच्या गावी वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे सतराशेसाठ पुढारी आहेत. त्यांना या घटनेने काहीच कसे वाटले नाही?' असा संतप्त सवाल विचारणारा अग्रलेख अनंतरावांनी लिहिला आणि शिक्षा म्हणून पाच वर्षेपर्यंत या गावाची ग्रामपंचायतच रद्द करावी अशी मागणी केली.

मराठवाड्यात १९५० साली हैदराबाद कूळकायद्याचा अमल सुरू झाला होता. दाबदडप करून कुळांचे राजीनामे घेण्याचे प्रयत्न बलदंड जमीन मालक करीत. अशा कुळांच्या गाऱ्हाण्यांना मराठवाड्याने वाचा फोडली. जेथे जमीनमालक कमजोर होता तेथे कुळांना कायद्याने दिलेले सर्व फायदे मिळाले. जेथे जमीनमालक वेगवेगळी साधने वापरू शकत होता तेथे कुळांना मराठवाड्यात येणारी बातमी आणि त्यामुळे अधिकाऱ्यावर पडू शकणारे अप्रत्यक्ष दपडण यांचाच आधार होता.

धर्मांच्या किंवा जातीच्या आधारावर समाजात निर्माण केल्या जाणाऱ्या भिंती व समाजाचे विभाजन हा भालेरावांच्या चिंतेचा कायमचा विषय होता. हैदराबादच्या स्वातंत्र्यलढ्यात जातीय किंवा धार्मिक भेदांना स्थानच नव्हते. स्वातंत्र्यानंतर या प्रवृत्ती वर येऊ लागल्या व पाहता पाहता त्या बलवान झाल्या. अनंतरावांनी अनेक प्रसंगाच्यानिमित्ताने या प्रवृत्तीवर कोरडे ओढलेले आहेत. मिरज शहरात कासम नावाच्या एका मुस्लीम गृहस्थाचा मृत्यू झाला. तो मुस्लीम असूनही विठ्ठलभक्त होता. या त्याच्या पापाची सजा त्याच्या धर्मांध बांधवांनी त्याच्या मृत्यूनंतर त्याला दिली. तो मुस्लीमच नव्हता असे जाहीर करीत त्याला मुस्लीम कब्रस्थानात पुरण्यालाच प्रतिबंध करण्यात आला. मुसलमान असूनही पंढरीचे वारकरी असलेल्या आणि एकादशा करणाऱ्या मुसलमानांची उदाहरणे मराठवाड्यातही होती. परंतु धर्मांधांना अशी उदारता मान्य नसते. ४८ तास कासमचे प्रेत तसेच पडून राहिले व नंतर पोलिसांच्या मध्यस्थीने कशीबशी त्याला स्मशानात जागा मिळाली. या घटनेचा सडेतोड परामर्श घेण्यासाठी अनंतरावांनी 'मुडदेफरास धर्मांध' असा अग्रलेख लिहिला.

खगोल विज्ञानातील संशोधनाबद्दल सी. चंद्रशेखर या मूळ भारतीय वंशाच्या शास्त्रज्ञाला नोबेल पारितोषिक मिळाले. भारतीयांना संशोधन करताच येणार नाही ही पूर्वग्रही टीका ऐकलेल्या चंद्रशेखरांनी, संशोधनक्षेत्र हे त्या समजाचा प्रतिवाद कृतीने करण्यासाठी, देशभक्तीच्या भावनेने मुद्दाम स्वीकारले होते. चंद्रशेखर जर भारतात असते आणि एखाद्या पारितोषिकासाठी भारतातल्या एखाद्या समितीने त्यांच्या नावाचा विचार सुरू केला असता तर काय झाले असते असा प्रश्न अनंतरावांनी विचारला आहे. प्रथम चंद्रशेखर कोण? कुठले? त्यांचा धर्म कोणता? त्यांची जात कोणती

याचाच अगोदर शोध घेण्यात आला असता. नोबेल मिळवणारे खुराणा आणि चंद्रशेखर भारताबाहेर आहेत व नोबेल भारतात नाही म्हणूनच ते त्यांना मिळाले हे विदारक सत्यही ते लिहून जातात.

अनंतरावांनी लिहिलेले मृत्यूलेख त्या व्यक्तीच्या संपूर्ण जीवनाला न्याय देणारे आणि लोकमानसातील तिच्या कर्तृत्वाविषयीची भावना योग्यरीतीने व्यक्त करणारे असत. त्यांच्या एका मित्राने सहज विनोदाने त्यांना एकदा म्हटले की 'वृत्तपत्रात आपल्या आयुष्याची नोंद व्हावी असे कोणाला वाटत असेल तर त्याने तुमच्यापूर्वीच मेले पाहिजे.' हे अक्षरशः खरे होते. कारण जुन्या पिढीच्या अनेक लोकांच्या कर्तृत्वाची फारशी माहितीच कित्येकवेळा चांगल्या पत्रकारांनाही नसते. जयप्रकाशांच्या मृत्यूनंतर अनंतरावांनी लिहिलेल्या मृत्यूलेखात त्यांनी लिहिले. 'सत्वगुणाला सगुण करावयाचे ठरले तर जयप्रकाशजींच्या रूपाचा आश्रय करावा लागेल. क्रांतीचा त्यांना ध्यास होता. परंतु त्यांची क्रांती गांधीजींच्या आदर्शप्रमाणे निर्वैराचा हात धरूनच जाणारी होती... त्यांचे क्रांतिकारकत्व दाहक नव्हतं. त्यांच्या क्रांतीला शीतल असे तेज होते. म्हणूनच त्यांना नंदादीपाची उपमा दिली आहे. नंदादीपाचा प्रकाश अंधारालाही सुसह्य वाटतो. फुलाच्या लोभस व मृदू स्पर्शाने  हा प्रकाश अंधारात शिरतो आणि त्याला उजळून टाकतो. जयप्रकाशजींच्या व्यक्तिमत्त्वाचा हा आगळा विशेष होता.'

नरहर कुरुंदकर यांच्यावर तर त्यांचे अपत्यवत् प्रेम. बालपणापासून त्यांना घडताना अनंतरावांनी पाहिले होते. त्यांनी कुरुंदकरांबद्दलच्या मृत्यूलेखात लिहिले 'कमलपुष्पाच्या पाकळ्या एक एक करून उमलत जाव्या आणि प्रकाशाला उन्मुख होऊन संपूर्ण पुष्प रेषेरेषेने प्रफुल्लित व्हावे अगदी तसे फुलणे चालू असतानाच कुरुंदकरांची जीवनयात्रा संपली. एकाच व्यक्तीत अनेक नात्यांचे संमीलन व्हावे तसे कुरुंदकरांचे विलक्षण व्यक्तिमत्त्व होते. अर्ध्या वाटेवरूनच हा दमदार सवंगडी, सुहृद, चिंतक, अभ्यासक आपल्यातून जावा ही मन विदीर्ण करणारी घटना आहे. कदाचित असेही असेल की इतक्या अप्रूप, संपन्न जीवनाचे आपणच जतन करून शकतो या विश्वासानेही मृत्यूने कुरुंदकरांना उचलले असेल.'

आपल्या वृत्तपत्राचे आणि पत्रकारितेचे प्रयोजन काय याविषयी अनंत भालेरावांची भूमिका  स्वच्छ व स्पष्ट होती. १५ ऑगस्ट १९६८ रोजी प्रारंभ झालेल्या दैनिकाच्या

पहिल्या अंकातील आपल्या अग्रलेखात त्यांनी पुन्हा एकदा त्याचा उच्चार केला आहे. ‘व्यक्तिविरोध आम्ही निषिद्ध मानला. व्यक्तीवर वेळी, प्रसंगी प्रहार करावा लागला तो केवळ त्यांच्या धोरणावर व समाजजीवनावर परिणाम करणाऱ्या त्यांच्या आचरणावर. सहकाराचे, समाजवादाचे, लोकशाहीचे नाव घ्यावयाचे, प्रत्यक्ष आचरणात मात्र या सर्व सिद्धांताना काळिमा फासावयाचा असे जेथे घडले तेथेच व्यक्तीविरुद्ध लेखणी उचलावी लागली. एरव्ही व्यक्तीच्या खाजगी जीवनाशी आम्हाला काही कर्तव्य नाही. मात्र ज्या व्यक्ती समाजाच्या व सर्वसामान्यांच्या हिताच्याआड येतील, दंभ माजवतील, सत्तेच्या मस्तीने धुंद होऊन जनतेच्या डोक्यावरून वरवंटा फिरवू लागतील त्यांना कडवा विरोध करण्याचे आजवरचे व्रत दैनिकातही चालू राहील. आपल्या देशात म. गांधींनी ज्या अनेक चांगल्या परंपरा सार्वजनिक क्षेत्रात रूढ केल्या; त्यांचा त्यांचाच वारसा शिरोभागी मिरवणाऱ्यांनीच विचका उडवला. अशा दांभिकांच्या रंगाढंगाची गय करणे म्हणजे लाचारी पत्करणेच होय. हे अवधान राखून या अपप्रवृत्ती समाजजीवनात निष्प्रभ ठरवणे हे कोणत्याही चांगल्या वृतपत्राचे कर्तव्य ठरते. ‘मराठवाडा’ ते यथाशक्ती करीत राहणार आहे... ‘आम्ही वैकुंठवासी आलो याच कारणासी, बोलिले जे ऋषी, साचभावे वर्ताया’ या अभंगचरणाचा पहिला भाग तुकोबासारख्या संतश्रेष्ठाच्या तोंडी शोभणारा आहे. आपण त्यांची बरोबरी कशी करायची म्हणून आम्ही दुसरा भाग तेवढा दृष्टीसमोर ठेवला आहे. नवे असे आपण काय करणार आहोत? जे थोर पुरुषांनी बोलून ठेवले, सांगून ठेवले तेच साचभावे वर्तणे एवढाच आमचा निर्धार."

अनंतरावांनी संपादक म्हणून भरपूर लिहिले असले तरी मराठवाड्याचा खप या प्रदेशातच असल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात त्यांचे लेखन फारसे वाचनात नव्हते. काही थोडे अग्रलेख मराठवाड्याचे प्रातिनिधिक मत म्हणून गोविंदराव तळवलकर महाराष्ट्र टाईम्समध्ये उद्धृत करीत. तेवढेच बाहेरच्यांना वाचावयास मिळे. अनंतरावांच्या निवडक अग्रलेखांचा एक संग्रह प्रसिद्ध करावा त्याचबरोबर त्यांच्या काही आठवणी मिळाल्या तर त्याही प्रसिद्ध कराव्या असा विचार काही मित्रांच्या मनात आला. अनंतरावांनी संमती दिल्यावर मराठवाड्याच्या फायली अनंतरावांच्या घरी आणून त्यांचे मित्रांनी वाचन सुरू केले. भगवंतराव देशमुख, सुधीर रसाळ आणि नरेन्द्र चपळगावकर हे वाचन करीत. दररोज संध्याकाळी दीड-दोन तास यासाठीची बैठक

होई. हे वाचन चालू असतानाच अनंतरावांनी नाशिकच्या तुरुंगात असताना लिहिलेली एक वही त्यांनी दाखवली. त्यात अनंतरावांनी आपल्या आठवणी लिहिलेल्या होत्या. लेखनाचे स्वरूप ललित अंगाचे असल्यामुळे त्यात काही नावे बदललेली होती. आठवणींचे स्वरूप काटेकोर नव्हते. ललित लेखांचेच स्वरूप त्याला होते. ही दोन्ही पुस्तके 'आलो याची कारणासी' व 'पेटलेले दिवस' १९८५ मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते औरंगाबाद येथे प्रसिद्ध करण्यात आली.

१९५० पासून दिवाळी अंक प्रसिद्ध करण्याला 'मराठवाड्या'ने सुरुवात केली. महाराष्ट्रातील आघाडीचे लेखक आणि जाणते वाचक या दोघांचेही लक्ष या दिवाळी अंकांनी वेधून घेतले. ज्येष्ठ लेखक आणि तरुण प्रतिभावंत या दोघांचेही साह्य मराठवाड्याच्या दिवाळी अंकाला आनंदाने मिळू लागले. कुसुमाग्रज, पाडगावकर, जी. ए. कुलकर्णी असे कवी-लेखक मराठवाड्याला हमखास आपले लेखन पाठवत. 'मराठवाडा' दिवाळी अंकाचा दर्जा आणि अनंत भालेरावांविषयीचा आदर या दोन्हीमुळे हे घडे.

दिवाळी अंकात विशेष विभाग म्हणून कोणता विषय निवडावा याची चर्चा करण्यासाठी अनंतराव काही मित्रांना चर्चेला बोलावत. भगवंत देशमुख, म. द. पाध्ये, सुधीर रसाळ, तु.शं. कुलकर्णी, गो. मा. पवार, दिनकर बोरीकर, चंद्रकांत भालेराव अशी अनेक मंडळी या चर्चांना हजर असत. त्याशिवाय त्या विषयाच्या काही तज्ज्ञ प्राध्यापकांनाही निमंत्रण असे. चर्चेत विषय निश्चित झाला म्हणजे मग लेखकांची निवड करून त्यांना पत्रे जात. 'मराठवाडा' दिवाळी अंकात दरवर्षी एक विशेष विभाग असे. बहुधा तत्कालीन विषयांसंबंधी किंवा एखाद्या इतर महत्त्वाच्या विषयासंबंधी हा विभाग असे. १९५८ साली वेरूळ लेण्यासंबंधी विशेष विभाग देण्यात आला होता. त्यात पुरातत्व खात्याचे अधिकारी म. न. देशपांडे यांचा मोठा लेख होता. १९६० साली महाराष्ट्र निर्माण होत असताना 'गाव, गावकी आणि गावकरी' असा एक विषय घेण्यात आला होता. खेडी, तेथील बलुतेदार, राजकीय पक्ष, सहकारी संस्था, ग्रामपंचायती आणि नवबौद्ध अशा विविध घटकांचा परस्पर संबंध सांगणारा सामाजिक महत्त्वाचा हा विभाग होता. १९७५ साली उर्दू वाङ्मयाचा आढावा घेणारा विशेष विभाग मराठवाड्याने दिला. १९७६ साली आणीबाणी चालू असताना हुकूमशाही हाच विषय घेऊन विविध हुकूमशहांच्या राजवटीबद्दल मराठवाड्याने लेख प्रसिद्ध

केले. १९८२ साली कार्ल मार्क्सच्या स्मृतिशताब्दीनिमित्त मार्क्सवादाच्या समकालीन प्रयोजकतेबद्दल लिखाण प्रसिद्ध झाले.

१९६९ साली मराठवाडा दिवाळी अंकाने 'दलितांचे साहित्य : जाणीवा, प्रवृत्ती आणि प्रेरणा' ही विशेष चर्चा वाचकांना दिली. या विभागात डॉ. म. ना. वानखडे, वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज, बाबूराव बागुल, वा. ल. कुलकर्णी, दि. के. बेडेकर, भालचंद्र नेमाडे, म. भि. चिटणीस, नरहर कुरुंदकर आणि जनार्दन वाघमारे यांचे लेख समाविष्ट होते. दलित साहित्यासंबंधी जे गंभीर विचारमंथन प्रारंभ काळात झाले त्यात मराठवाडा दिवाळी अंकातील या चर्चेचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. खेड्यात राहणारी ग्रामीण जनता आणि नव्याने अस्मितेचा शोध घेणारे दलित हे अनंतरावांच्या आस्थेचा नेहमीच एक भाग होते.

विशाल द्विभाषिक अस्तित्वात आले असले तरी संयुक्त महाराष्ट्राचा लढा संपलेला नव्हता. संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेल्या चळवळीत अनंतरावांनी वेळोवेळी भाग घेतला. प्रतापगडच्या मोर्चात ते सामील झाले होते. मुंबईत अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनाच्या झालेल्या सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला होता. दिल्लीत संसद भवनासमोर सत्याग्रह करण्याचे ठरले तेव्हा त्यातही अनंतराव सामील झाले आणि अल्पकाळ दिल्लीच्या तुरुंगातही राहून आले. सीमाप्रश्नासाठी सचिवालयाला घेराव घालण्यात आला त्यावेळी अनंतराव इतर कार्यकर्त्यांबरोबर सहभागी झालेले होते.

पत्रकार म्हणून काम करताना पत्रकारांच्या अडचणी आणि पत्रकारांची व्यावसायिक आणि नैतिक जबाबदारी या दोन्हीकडे अनंतरावांचे लक्ष असे. हैदराबादला असताना हैदराबाद राज्य श्रमिक पत्रकार संघाचे ते सहा वर्षे अध्यक्ष होते. डिसेंबर १९६१ मध्ये सांगली येथे भरलेल्या महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. पुढच्याच वर्षी त्यांची अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या कार्याध्यक्षपदी निवड झाली. प्रथेप्रमाणे १९६३ साली अहमदनगर येथे भरलेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. वर्षभर कार्याध्यक्ष राहिल्यानंतर संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्याची पत्रकार परिषदेची प्रथा होती. पुढे १९७८ साली मुंबई मराठी पत्रकार संघाने आपल्या वर्धापनदिनी महनीय प्रवक्ते म्हणून त्यांना बोलावून त्यांचा सन्मान केला.

१९६४ साली पुन्हा एकदा समाजवादी पक्षात जोरदार फूट पडली. समाजवादी पक्ष आणि प्रजासमाजवादी पक्ष या अगोदरच दोन फळयात असलेल्या समाजवाद्यांचे एकीकरण करून संयुक्त समाजवादी पक्ष होण्यासाठी पक्षाचे स्थापना अधिवेशन भरले. त्याच्या अध्यक्षस्थानी एसेम जोशी होते. त्यांची मिरवणूक चालू असतानाच मिरवणुकीतील काही प्रसपच्या कार्यकर्त्यांना मारहाण करण्यात आली असा आरोप झाला आणि स्थापना अधिवेशनातच पक्षाचे पुन्हा दोन तुकडे झाले. प्रजासमाजवाद्यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. या घडामोडीचा परिणाम मराठवाड्यात होणे अपरिहार्य होते. 'करंटे लोहियावादी' असा एक खरमरीत अग्रलेख अधिवेशनातील दुर्दैवी घटनेबद्दल अनंतरावांनी लिहिला. अतिरेकी विभूतीवाद पोसणाऱ्या लोहियाशिष्यांचा अनंतरावांनी धिक्कार केला; परंतु फुटलेली फळी पुन्हा सांधली गेली पाहिजे असे कळकळीचे आवाहन केले. विशेषतः नानासाहेब गोरे आणि मधू दंडवते यांना संयुक्त समाजवादी पक्षात आणण्याचा मधू लिमये आणि जॉर्ज फर्नांडिस यांनी प्रयत्न केला पाहिजे असेही त्यांनी लिहिले.

मराठवाड्यातील समाजवादी चळवळ त्या काळात मुख्यतः अनंतरावांच्याच प्रभावाखाली होती. काशीनाथ नावंदर, बन्सीलाल लड्डा यांच्यासारखे पूर्वीपासून समाजवादी पक्षात असलेले कार्यकर्ते होते; परंतु लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्सच्या विसर्जनानंतर अनंतराव आणि त्यांचे स्वातंत्र्यलढ्यातील काही सहकारी यांची कुमक मिळाल्यानंतर समाजवादी चळवळीला बळ मिळाले होते. १९४५-४६ पासून अनंतराव जयप्रकाश आणि एसेम यांचे नेतृत्व मानत होतेच. १९६४ सालीच एसेम जोशींची षष्ट्यब्दी साजरी झाली. त्यावेळी अनंतरावांनी मराठवाड्यात लिहिलेल्या 'ध्येयपुनीत व समर्पित जीवनाची अभंग गाथा म्हणजेच एस. एम.' या शीर्षकाच्या लेखात आपल्या मनातील त्यांच्याविषयीची श्रद्धा प्रकट केली होती. किरकोळ मतभेदांचा बाऊ करीत कार्यकर्ते विभागले गेले म्हणजे कार्यनाश होतो याची यथार्थ जाणीव, अनंतरावांना आणि मराठवाड्यातील समाजवादी कार्यकर्त्यांना होती. अनंतराव समाजवादी चळवळीला पाठिंबा देत असले व त्यात कामही करत असले तरी ते पक्षाचे अधिकृत सभासद नव्हते. संमिश्र विचारांच्या विश्वस्तांनी चालवलेल्या वृत्तपत्राचे आपण संपादक आहोत त्यामुळे आपण पक्षाशी बांधिलकी स्वीकारणे बरोबर नाही असे त्यांनी ठरवले होते. मात्र ते उघडपणे समाजवादी कार्यकर्त्यांना मदत आणि मार्गदर्शन करीत होते.

औरंगाबादेत मराठवाड्यातील निवडक समाजवादी कार्यकर्त्यांची एक बैठक झाली. संयुक्त समाजवादी पक्षात राहावयाचे की प्रजासमाजवादी पक्षात जावयाचे याचा निर्णय करावयाचा होता. बैठकीच्या प्रारंभीच सर्वांनी असे मत व्यक्त केले की, कोणत्याही पक्षात जाण्याचा निर्णय झाला तर आपण सर्व मिळून त्या पक्षात राहू. आपली शक्ती विभागली जाऊ देणार नाही. लोहियांच्या व्यक्तिवादाला आणि त्यासाठी वेळोवेळी पक्षशिस्त झुगारून देण्याला सर्वांचाच विरोध होता; परंतु महाराष्ट्रात जनतेचे आंदोलन उभारावयाचे असेल तर एस. एम. जोशींचे नेतृत्वच त्यासाठी आवश्यक आहे अशीही सर्वांना जाणीव होती. एस. एम. संयुक्त समाजवादी पक्षात कायम राहिले होते. अशा परिस्थितीत अनंतरावांच्या मनात संयुक्त समाजवादी पक्षातच आपण राहावे हा विचार प्रबल होणे स्वाभाविक होते. बापू काळदाते यांच्यासारख्या काहींचा विशेष सहवास प्रजासमाजवादी पक्षात परत गेलेल्या मित्रमंडळींशी होता. त्यांना त्यामुळे निर्णय करणे अधिक अवघड गेले. पण शेवटी सर्वांनी संयुक्त समाजवादी पक्षातच राहण्याचा निर्णय घेतला व मराठवाड्यात तरी समाजवादी कार्यकर्त्यांची विभागणी टळली.

## ८. नवे प्रश्न, नवे संघर्ष

संयुक्त महाराष्ट्र हा मराठवाड्याच्या जनतेसाठी विशेष जिव्हाळ्याचा विषय होता. हैदराबाद संस्थान हे तेलगू, मराठी आणि कन्नड अशा तीन भाषिक विभागांचे मिळून बनलेले व या तिन्ही भाषिकांना आपापल्या भाषिक प्रांतात सामील होण्याची मनोमन इच्छा होती. किंबहुना हैदराबाद संस्थानातील जनतेच्या स्वातंत्र्याची कल्पनाच निजामाचे जोखड झुगारून देऊन, हैदराबादचे त्रिभाजन करून भाषिक राज्यात सामील होणे अशी होती. राज्यपुनर्रचना आयोगाला मराठवाड्यातील सर्व जनतेने, आम्हाला मराठी भाषिक प्रांतात सामील व्हावयाचे आहे अशीच एकमुखी मागणी केली. हैदराबादच्या विधिमंडळाने राज्यपुनर्रचना आयोगाच्या अहवालाविषयी आपले मत व्यक्त करताना, मराठवाडा महाराष्ट्र राज्यात सामील करण्याची अधिकृत मागणी केली होती.

स्वामी रामानंद तीर्थांनी १९५३ साली जानेवारी महिन्यात हैदराबाद येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात, स्वागताध्यक्ष म्हणून भाषण करीत असताना हैदराबादचे त्रिभाजन करा आणि मराठवाडा महाराष्ट्रात, तेलंगण आंध्रात आणि कानडी भाग कर्नाटकात सामील करा अशी स्पष्ट मागणी केली होती व त्यासाठी जवाहरलाल नेहरूंची नाराजीही ओढवून घेतली होती. 'मराठवाडा' वृत्तपत्राची भूमिकाही अशीच होती. स्वामीजी, गोविंदभाई श्रॉफ, आ. कृ. वाघमारे ही मंडळी संयुक्त महाराष्ट्र समितीची काही काळ पदाधिकारीही होती. स्वतः अनंतराव या मागणीला पाठिंबा देणारे लेखन तर करीतच होते; शिवाय चळवळीत प्रत्यक्ष कार्यकर्ते म्हणून भागही घेत होते. प्रतापगडला १९५७ साली पंडित नेहरूंच्या आगमनप्रसंगी जी निदर्शने करण्यात आली त्या निदर्शनात अनंतराव सहभागी होते. त्यानंतर दिल्ली येथे संसद भवनाच्या-समोर सत्याग्रह करण्याचे ठरवले तेव्हा अनंतराव त्या सत्याग्रहात सामील झाले आणि अल्पकाळ दिल्लीच्या तुरुंगाचाही अनुभव घेऊन आले. या सत्याग्रहात

अनंतरावांचे निकट स्नेही नागनाथ परांजपे आणि अझहर खुर्शीद यांनीही भाग घेतला होता. या तिघांनी तुरुंगातून सुटल्यानंतर दिल्लीत काढून घेतलेले एक छायाचित्रही उपलब्ध आहे. तुरुंगातून सुटल्यानंतर परत येताना वाटेत तिघांनी आग्र्याला थांबून ताजमहाल पाहिला.

१९६० साली महाराष्ट्राचे एकभाषिक राज्य अस्तित्वात आले तरी बेळगाव, कारवार, निपाणी, भालकी, संतपूर असा मोठा मराठी भाग कर्नाटकातच ठेवण्यात आला होता. या सीमाप्रश्नात मराठवाड्यालाही विशेष स्वारस्य होते; कारण मराठवाड्याचा भाग असलेल्या बीदर जिल्ह्यातील संतपूर, औराद, भालकी हा प्रदेश मराठवाड्याबरोबर येऊ शकला नव्हता. 'मराठवाडा' वृत्तपत्र या भागात राहणाऱ्या मराठी लोकांची होणारी गळचेपी चव्हाट्यावर आणत होते व त्यांच्या व्यथांना वाचाही फोडत होते. या सीमालढ्यात मुंबईच्या सचिवालयाला प्रतिकात्मक वेढा घालावा असा एक अभिनव कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्र समितीने दिला होता. २४ ऑगस्ट १९६६ रोजी झालेल्या या कार्यक्रमात अनंतराव स्वतः सहभागी झाले आणि हजारो कार्यकर्त्यांच्याबरोबर मुंबईच्या रस्त्यावर संध्याकाळपर्यंत बैठक मारून बसले होते.

१९६३-६४च्या सुमाराला महाराष्ट्रात अन्नधान्याची परिस्थिती गंभीर झाली होती. सर्व देशभरच अन्नधान्याचा तुटवडा होता. धान्योत्पादन आणि धान्य पुरवठा यांच्याविषयीच्या विविध प्रश्नांची व्यापक चर्चा सुरू झाली होती. समाजवादी चळवळीतील एक कार्यकर्ते पन्नालाल सुराणा यांचा 'अन्नधान्याचा व्यापार : काही प्रश्न' या शीर्षकाचा एक लेख ९ जुलै १९६४च्या मराठवाड्याच्या अंकात प्रसिद्ध झाला. 'साखर गोंधळाकडे डोळेझाक करण्यासाठी सोमय्याकडून तीन लाख रुपये घेणारे तल्यारखान व चौगुले कंपनीच्या खर्चाने परदेशवारी करणारे वसंतराव नाईक बड्या व्यापाऱ्यांच्या नफेबाजीच्या आड येण्याचे पातक कसे काय करतील?' असा प्रश्न या लेखात विचारण्यात आला होता. काही अपप्रकार घडलेले आहेत हे लक्षात यावे, परंतु ते सिद्ध करता येण्यासारखा पुरावा मिळणे कठीण असावे अशा वेळी, लेखक त्याबद्दल लिहिताना जी काळजी घेतो ती या लेखात घेण्यात आलेली नव्हती. हा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन पुरवठा मंत्री होमी जे. एस. तल्यारखान यांनी लेखक

पन्नालाल सुराणा आणि संपादक अनंत भालेराव या दोघांना नोटीस पाठवली आणि लेखाबद्दल दिलगिरी व्यक्त करण्याची मागणी केली. तल्यारखानांनी खटला भरलाच तर यानिमित्ताने पुरवठा खात्यातील गोंधळ लोकांच्या समोर आणता येईल असा विचार करून दिलगिरी व्यक्त करण्यात आली नाही. पुढे लेखक आणि संपादक या दोघांवर बदनामीच्या गुन्ह्यासाठी खटला दाखल करण्यात आला.

मुंबईच्या न्यायालयात हा खटला सुरू झाला तेव्हाही क्षमा मागून मुक्त होण्याचा पर्याय शिल्लक होता. परंतु लेखाचे व खटला चालवण्याचे मुख्य उद्दिष्ट पुरवठ्यातील अपप्रकार चव्हाट्यावर आणणे हे असल्यामुळे, क्षमा मागण्याचा पर्याय बचाव पक्षाने मान्य केला नाही. हा खटला मुंबईतील एक सत्र न्यायाधीश झांबरे यांच्यासमोर चालणार होता. या खटल्याच्या काही दिवस अगोदर, फौजदारी कामे चालवण्याच्या रीतीच्या कायद्यातील कलम १९८ ब मध्ये दुरुस्ती करण्यात आली व शासकीय नोकर फिर्यादी असेल व त्याने मागणी केली तर त्याच्या बदनामीचा खटला बंद खोलीत चालावा अशी तरतूद करण्यात आली. या तरतुदीप्रमाणे खटला गुप्तपणे चालणार असल्यामुळे सरकारचा सावळागोंधळ प्रकाशात आणता येण्याची संधीच नव्हती. परंतु त्यानंतरही क्षमा न मागता हा खटला पुढे चालवण्यात आला. अर्थात हा चुकीचा निर्णय होता. साखरेचा व्यापार करणाऱ्या ज्या घाऊक व्यापाऱ्यांनी सुराणा यांना माहिती दिली होती त्यांनी, न्यायालयासमोर साक्ष द्यायला स्वाभाविकपणेच नकार दिला. आरोपीतर्फे काम करणारे सुशील कवळेकर यांनी बराच प्रयत्न केला, पण शेवटी आरोपींना प्रत्येकी तीन-तीन महिने साध्या कैदेची आणि प्रत्येकी पाचशे रुपये दंडाची शिक्षा ३० मार्च १९६६ रोजी झाली. या शिक्षेविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले. तेही ११ एप्रिल १९६६ रोजी न्या. व्ही. ए. नाईक यांच्यासमोर चालून नामंजूर झाले. अपील पूर्णपणे मंजूर होईल अशी अपेक्षाच नव्हती. परंतु अनंत भालेराव आणि पन्नालाल सुराणा यांचा पूर्वेतिहास लक्षात घेऊन प्रत्यक्ष तुरुंगवासाची शिक्षा उच्च न्यायालय आवश्यक समजणार नाही अशी अपेक्षा होती; पण तसेही घडले नाही.

न्यायालयाच्या निर्णयानुसार अनंतराव आणि पन्नालाल सुराणा शिक्षा भोगण्यासाठी निघाले तेव्हा औरंगाबाद आणि मुंबई दोन्ही ठिकाणी त्यांना निरोप देण्यासाठी समारंभ झाले. १५ एप्रिल रोजी सरस्वती भुवन शाळेच्या गच्चीवर सायंकाळी एक अनौपचारिक निरोप समारंभ झाला. त्याला सुमारे दोनशे स्नेहीमंडळी हजर होती. १६ एप्रिलला रेल्वेने मुंबईस जाण्यासाठी अनंतराव निघाले तेव्हा औरंगाबाद रेल्वे स्थानकावर, त्यांना निरोप देण्यासाठी शेकडो मित्र आणि चाहते हजर होते. मुंबईला जो निरोप समारंभ झाला त्याचे तर एसेमच अध्यक्ष होते. मुद्रण आणि लेखन स्वातंत्र्याच्या पुरस्कारार्थ होत असलेला भालेरावांचा तुरुंगवास, ही वेदनेची पण अभिमानाची गोष्ट आहे असे एसेम आपल्या भाषणात म्हणाले. १७ तारखेच्या मराठवाड्याच्या अंकात अनंतरावांनी लिहिलेला 'आता आपली भेट तीन महिन्यांनंतर' अशा शीर्षकाचा अग्रलेख प्रसिद्ध झाला. त्यात आत्मगौरवाची भाषा अजिबात नाही. अतिशय नम्रमपणे आपली भूमिका अनंतरावांनी मांडली आहे. याच दिवशी मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीची बैठक होती. त्यातही अनंतरावांच्या तुरुंगवासाबद्दल दुखः आणि अभिमान व्यक्त करणारा ठराव एकमताने करण्यात आला.

अनंतरावांना तुरुंग नवा नव्हता. निजामी काळात सत्याग्रहाबद्दल त्यांनी तुरुंगवास भोगला होता; मात्र तेव्हा वय तरुण होते. पहिले दोन दिवस भायखळ्याच्या तात्पुरत्या तुरुंगात काढावे लागले. तुरुंगातले अन्न आणि कांजी पोटात ढकलणे अवघड झाले. नंतर त्यांना आणि सुराणांना नाशिकला हलवण्यात आले. तेथे मात्र त्यांना अ वर्ग देण्यात आला. तेथे काही पुस्तकेही मिळाली. प्यारेलालांच्या गांधी चरित्राचा 'द लास्ट फेज' हा शेवटचा भाग व चार्ली चॅपलिनचे आत्मचरित्र त्यांनी वाचून काढले. शिवाय पुढे 'पेटलेले दिवस' या नावाने प्रसिद्ध झालेले आठवणीपर लेखही त्यांनी याच तुरुंगवासात लिहून काढले.

तुरुंगात त्यावेळी सत्याग्रही नव्हते. बहुतेक सर्वसामान्य गुन्हेगारच होते. अनंतरावांच्या त्यांच्याहीबरोबर गप्पा होत. हा माणूस काही वेगळाच आहे असे त्या गुन्हेगारांना वाटे. त्यातील एका पाकीटमाराची अनंतरावांची ओळख झाली. 'कल्याण ते भुसावळ यादरम्यान तुमचे पाकीट मारले गेले तर मला कळवा, तुमची पै न पै परत मिळेल' असे भरघोस आश्वासन त्याने दिले.

अनंतराव काही दिवस प्रारंभी मुंबईच्या तुरुंगात होते त्यावेळी विविध राजकीय पक्षांचे नेते त्यांना भेटून गेले होते. तत्कालीन गृहराज्यमंत्री कल्याणराव पाटील व बाळासाहेब ठाकरे यांचाही त्यात समावेश होता. अनंतराव तुरुंगात असताना सरकारने अनंतरावांची शिक्षा कमी करावी व त्यांना मुक्त करावे अशी मागणी करण्यासाठी, पत्रकारांचे एक शिष्टमंडळ मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना भेटले. परंतु तल्यारखानांच्या संमतीशिवाय असे करता येणार नाही असे सरकारतर्फे सांगितले गेले. स्वतः वसंतराव नाईक मात्र नंतरच्या काळात मतभेद असूनही अनंतरावांचे चांगले स्नेही झाले. शेती आणि शेतकरी हा दोघांच्याही जिव्हाळ्याचा विषय होता.

तीन महिन्यांचा हा तुरुंगवास संपून अनंतराव आणि सुराणा यांची नाशिक तुरुंगातून सुटका झाली तेव्हा औरंगाबाद शहरात त्यांचे मिरवणुकीने स्वागत करण्यात आले. जोरदार पाऊस पडत असतानाही शेकडो लोक मिरवणुकीत भिजत चालले होते. लेखक आणि संपादक या दोघांच्याही हेतूच्या प्रामाणिकपणाबद्दल कोणाच्याही मनात शंका नव्हती आणि लोकांच्या लेखी हा स्वातंत्र्यकाळातला एक सत्याग्रहच होता. जुलै १९६६ मध्ये तुरुंगातून परत आल्यानंतर मराठवाड्याच्या संपादकपदाची सूत्रे अनंतरावांनी 'ठेवितो हा पायी जीव थोडा' असा अग्रलेख लिहून पुन्हा स्वीकारली.

मराठवाड्यात आणि देशात घडणाऱ्या घडामोडींचा वेग आणि अर्धसाप्ताहिकाचा वेग यांचे गणित जमेनासे झाले. बदलणाऱ्या काळात आता आपण वाचकांच्या भेटीला दररोज गेले पाहिजे अशी आवश्यकता वाटू लागली. मराठवाड्याचे दैनिकात रूपांतर करण्याचा निर्णय विश्वस्त मंडळाने घेतला. विश्वस्त मंडळ प्रत्येक निर्णय अतिशय सावधगिरीने घेत असे व त्यामुळे निर्णयाला उशीरही लागत असे. एखाद्या भांडवलदारासारखी विश्वस्त मंडळाची आर्थिक स्थिती नसल्यामुळे, निर्णयांच्या होऊ शकणाऱ्या अनिष्ट आर्थिक परिणामांचाही विचार करावा लागत होता. १९६८ साली १५ ऑगस्टपासून 'मराठवाडा' दैनिक स्वरूपात प्रसिद्ध होणार होता. त्यासाठी एक फ्लॅटबेड रोटरी मशीन विकत घेण्यात आले होते.

दैनिकाचे चार-पाच डमी अंक तयार करून पाहण्यात आले. त्यावेळी मराठवाड्याचे संस्थापक आ. कृ. ऊर्फ दादा वाघमारे यकृताच्या कर्करोगाने आजारी होते. त्यांच्या

कानावर दैनिक करण्याचा निर्णय घालण्यात आला होता. १४ ऑगस्टला दुपारी दैनिकाचा अंक तयार करण्याला प्रारंभ झाला. त्या अंकाची पाने दादांना जवळच असलेल्या त्यांच्या घरी नेऊन दाखवण्यात आली आणि १५ ऑगस्टचा अंक प्रसिद्ध होण्यापूर्वीच आदल्या सायंकाळी दादांचे निधन झाले. दैनिकाच्या पहिल्याच अंकात त्याच्या संस्थापकाच्या मृत्यूचे वृत्त वाचकांना कळवावे लागले.

दैनिक सुरू झाले आणि त्याला प्रतिसादही हळूहळू चांगला मिळू लागला. त्या काळी एखाद्या विभागीय पत्राचा जास्तीजास्त खप जेवढा असावा येथपर्यंत 'मराठवाडा' पोहोचला होता. अनंतरावांचे अग्रलेख आणि त्यांनी आणि त्यांच्या संपादकीय विभागातील सहकाऱ्यांनी सांभाळलेली लोकनिष्ठा, यामुळे वृत्तपत्राची लोकप्रियताही वाढत होती. 'मराठवाडा' वृत्तपत्र सुरू झाले तेव्हापासून मुद्रण व वृत्तपत्र व्यवस्थापन यातले कोणी अनुभवी व तज्ज्ञ मुद्दाम नेमण्यात आले नव्हते. चळवळीचा एक भाग म्हणून अनंतराव संपादक झाले; तसेच त्यांचे काही सहकारी व्यवस्थापक झाले. मराठवाड्यात कामावर घेताना उमेदवाराची त्या कामासाठीची गुणवत्ता नेहमीच पाहिली जाई असे नाही. स्वातंत्र्यचळवळीतील काहींना किंवा त्यांच्या पाल्यांना सामावून घेण्यात आले होते. अनुभवाची किंवा विशेष अर्हतेची कमतरता आपल्या निष्ठेने ही मंडळी भरून काढत.

१९७४च्या सुमारास बिहारमध्ये जयप्रकाशांचे आंदोलन सुरू झाले. संपूर्ण क्रांतीची घोषणा जयप्रकाशांनी दिली होती. बिहारच्या आंदोलनाच्या आगेमागेच गुजरातमध्ये चिमणभाई पटेल सरकारच्या भ्रष्टाचाराविरुद्ध, विद्यार्थ्यांनी नवनिर्माण आंदोलन सुरू केले. आंदोलन सुरू झाल्यानंतर विद्यार्थी नेत्यांनी जयप्रकाशांना मार्गदर्शनाची विनंती केली; त्याप्रमाणे जयप्रकाश गुजराथेत जाऊनही आले. अर्थात ते बिहारमध्ये एवढे गुंतून पडले होते की त्यांना गुजरातसाठी अधिक वेळ देता येणे शक्य नव्हते. बिहारच्या आंदोलनाने देशभर सामान्य माणसात एक नवी आशा जन्माला आली. सरकारच्या अजस्त्र यंत्राशी आपण टक्कर घेऊ शकतो आणि भ्रष्टाचाराच्याविरुद्ध लढू शकतो असा विश्वास या आंदोलनाने निर्माण होऊ लागला. मराठवाड्यातही याच सुमाराला, वसमत येथे नोकरीसाठी घेण्यात येणाऱ्या मुलाखतीला आलेल्या,

शेकडो विद्यार्थ्यांवर गोळीबार झाला आणि त्यात तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. या घटनेची प्रतिक्रिया म्हणून मराठवाडाभर एप्रिल १९७४ मध्ये मराठवाडा विकास आंदोलन सुरू झाले. आपला भाग अविकसित आहे. त्याचा विकास होईपर्यंत नोकऱ्यांसाठी दारोदार फिरण्यापलीकडे, आपल्या हातात दुसरे काही नाही अशी भावना तरुणांमध्ये निर्माण झाली. औरंगाबाद येथेही ही चळवळ पोहोचली. चळवळीचे नेतृत्व गोविंदभाईंनी करावे अशी विद्यार्थ्यांनी इच्छा व्यक्त केली. राजकीय पक्षांच्या नेतृत्वापेक्षा गोविंदभाईंवरच विद्यार्थ्यांचा अधिक विश्वास होता. अनंतरावही चळवळीत गोविंदभाईंचे एक सहकारी बनले. अर्थात त्यांचे काम 'मराठवाडा' वृत्तपत्राची शक्ती चळवळीच्या मागे उभी करणे हेच होते. 'मराठवाडा' हे या मराठवाडा विकास चळवळीचे एक मुखपत्र बनले.

देशातील अनेक ठिकाणी सुरू झालेल्या या चळचळींची गंगोत्री होती बिहार. तेथे जावे आणि ती चळवळ प्रत्यक्ष पाहावी असा विचार अनंतरावांनी केला. निळू दामले तेव्हा मराठवाड्यात काम करत होते. ते प्रथम बिहारमध्ये एकटेच गेले. नंतर काही दिवसांनी अनंतराव, म. द. पाध्ये आणि सुधीर रसाळ हे तिघे बिहारमध्ये पोहोचले. पाटण्याला पोहोचल्याबरोबर जयप्रकाशांना भेटावयाचे होतेच. त्याच दिवशी एसेमही पाटण्यात आले होते. जयप्रकाशांच्या कदमकुव्यातील निवासस्थानी अनंतराव आणि मंडळी पोहोचली त्यावेळी, जयप्रकाश एका नियोजित सभेला जाण्यासाठी निघाले होते. एसेमनी अनंतराव वगैरेंना बरोबर घेऊन जयप्रकाशांना गाठले आणि त्यांची औपचारिक ओळख करून दिली. सर्वच जण हिंदी साहित्य सभेच्या सभागृहात पोहोचले. सभा महिलांची होती. जयप्रकाशांना वक्तृत्व नव्हते, होती ती फक्त तळमळ. जयप्रकाशांची सभा हा श्रोत्यांशी चालेला संवाद असे. भाषणाच्या मध्यावरच जयप्रकाशांनी एसेमची 'माझे जुने समाजवादी स्नेही' अशी ओळख करून दिली आणि अनंतरावांचे नाव घेत मराठवाड्यातील हे पत्रकार आपण येथे काय करतो आहोत हे पाहण्यासाठी मुद्दाम आले आहेत; सगळ्या भारताचे डोळे बिहारवर लागलेले आहेत असा उल्लेख केला.

सुमारे दहा-अकरा दिवस ही मंडळी बिहारमध्ये होती. जयप्रकाशांच्या सहकाऱ्यांपासून, राजकीय नेत्यांपर्यंत आणि नागार्जुनासारख्या लोककवीपर्यंत अनेकांच्या मुलाखती

त्यांनी घेतल्या आणि बिहारचे मानस समजून घेतले. योगायोग असा होता की अनंतरावांच्याबरोबर गेलेल्या दोन्ही मित्रांपैकी पूर्णवेळ पत्रकार कोणीच नव्हते. किंबहुना पत्रकारिता हा त्यांचा विषयच नव्हता; मात्र समाजाचे सर्व प्रश्न, त्यात राजकीयही आले, समजून घेण्याचा आणि ते निर्माण होण्याची कारणमीमांसा शोधण्याचा प्रयत्न करणारे ते दोघेही प्राध्यापक होते. त्या दोघांपैकी पाध्ये हे तरुणपणी चळवळीत भाग घेऊन नंतर अध्यापन क्षेत्रात आलेले आणि स्वामीजींच्या शिक्षणकार्यात सहभागी व्हावयाचे ठरवलेले अर्थशास्त्राचे शिक्षक होते. सुधीर रसाळ वाङ्मयाच्या बरोबरच समाजाच्या सुख-दुःखाचीही कारणमीमांसा शोधण्यात रस घेत होते. बिहारहून परत आल्यावर थोड्याच दिवसांनी मराठवाडा दिवाळी अंकाची तयारी सुरू झाली. स्वाभाविकपणेच बिहार आणि बिहारची चळवळ हाच विषय निवडला गेला. बिहारच्या चळवळीचे एक संपूर्ण चित्र वाचकांसमोर उभे करण्याचा दिवाळी अंकातील या विशेष विभागाने प्रयत्न केला.

या विभागात 'लोकशाही : लोकाश्रयी का मताश्रयी' या शीर्षकाचा एक लेख स्वतः अनंतरावांनी लिहिला आहे. या लेखाच्या प्रारंभी अनंतरावांनी बिहारचे वर्णन करणारा जो परिच्छेद लिहिलेला आहे तो वाचनीय आहे. अनंतरावांची शैली स्पष्ट करणारा आहे.

'पाटणा ही बिहारची राजधानी. गतेतिहासातील अनेक उदयास्त या ऐतिहासिक नगरीने बघितले. पाटलीपुत्र या नगरीचे नाव. केवळ पाटणाच नव्हे तर संपूर्ण बिहारच्या भूमीत कालपुरुषाने भले-बुरे इतिहासाचे रांजण रचिवले आणि भरले. इतिहास घडवणारे, काळचक्राला धाक घालणारे आणि त्याच्या धाकात वागणारे कितीतरी या भूमीवर आले आणि गेले. हजारो वर्षांचा इतिहास या भूमीत ठायीठायी विसावला आहे. संपन्नता आणि दारिद्र्य, साधुत्व आणि पशुत्व, ज्ञान आणि अज्ञान, शौर्य आणि भीती ही सनातन द्वंद्वे येथे येथेच्छ बागडली. ऐहिक जीवनातील दुःखे आणि नश्वरता बघून विद्ध झालेला एक राजपुत्र राजप्रसाद सोडून निघाला आणि बिहारच्या भूमीत गयेला एका बोधीवृक्षाखाली त्याला ज्ञान प्राप्त झाले. शंकराचार्य थेट दक्षिणतेला केरळचा. विश्वदिग्विजयाच्या इर्षेने दक्षिणेतून निघाला आणि सनातन

धर्माची प्रस्थापना करीत गयेपर्यंत आला. केवढी पर्वतप्राय माणसे ! शेरशाह येथेच पराक्रम गाजवून गेला. गुप्त, मौर्य ही घराणी इतिहासाची लाडकी बिहारच्या अंगाखांद्यावर वाढली. अनेकांचे पुरुषार्थ गंगेच्या काठी फुलले आणि अनेकांचे मातीमोल झाले. उरली ती बिहारची सर्वसाक्षी भूमी. पूर्वी होती तशीच. किंबहुना थोडी खंगलेली. जराजीर्ण झालेली. माणसेही तीच, त्यांचे धर्म, त्यांनी जोपसलेली मानवता, मूल्ये, मानवी बुद्धीला कुंठित करणाऱ्या त्यांच्या भौतिक संघटना, जातीपाती, नागडेउघडे स्वार्थ, सारे एका प्रचंड उतरंडीतून घरंगळत आलेले व येणारे.'

बिहारच्या आंदोलनानेच पुढे आणीबाणीला जन्म दिला. आंदोलनाला प्रतिकार करण्यासाठी व ते थांबवण्यासाठी आणीबाणीचा साधन म्हणून उपयोग झाला होता. देशभरातले विरोधी पक्षाचे बहुतेक सर्व प्रमुख कार्यकर्ते तुरुंगात डांबले गेले होते. वेगवेगळ्या राज्यसरकारांचे याबद्दल वेगवेगळे धोरण होते. महाराष्ट्रात प्रत्यक्ष चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना ताबडतोब अटक झाली. मात्र काही नेत्यांबाबत ते प्रत्यक्ष सत्याग्रह करेपर्यंत सबुरीचे धोरण अवलंबवावे असे सरकारने ठरवले असावे. एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे यांना अटक झालेली नव्हती व मराठवाड्यातही अनंत भालेराव, बापू काळदाते वगैरेंना पकडण्यात आले नव्हते. 'मराठवाडा' दैनिकावर इतर वृत्तपत्राप्रमाणेच प्रसिद्धीपूर्व नियंत्रण लागू करण्यात आले होते. सेन्सॉर अधिकाऱ्यांनी काही मजकूर आक्षेपार्ह ठरवला म्हणजे ऐनवेळी तो काढून टाकावे लागे व ती जागा कोरी ठेवून अंक प्रकाशित होई. कोऱ्या जागेत काय मजकूर होता याचा अंदाज वाचकांची कल्पनाशक्ती करी.

सरकार कधी पकडील याची वाट पाहायची की प्रत्यक्ष कृती करून सरकारला पकडण्याला भाग पाडावयाचे असे पर्याय होते. आपण शांतपणे आणीबाणी सहन करीत बसण्याऐवजी तिला विरोध नोंदवू असा निर्णय अनंतरावांनी आणि काळदात्यांनी घेतला. २६ ऑक्टोबर १९७५ रोजी औरंगाबादेतील शहागंज येथील गांधी पुतळ्याजवळ अनंतराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सत्याग्रह केला. झालेली शिक्षा भोगण्यासाठी त्यांना औरंगाबादच्या हर्सूल कारागृहात नेण्यात आले. एक महिना २५ दिवस शिक्षा भोगणे झाल्यानंतर त्यांची व इतर सत्याग्रहींची सुटका करण्यात आली. १९ डिसेंबर

१९७५ रोजी सकाळी अनंतराव तुरुंगातून घरी पोहोचले. सगळा दिवस येणाऱ्या जाणाऱ्यांच्या भेटीमध्ये गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा पोलीस हजर झाले. अंतर्गत सुरक्षा कायद्याखाली-मिसाखाली अनंतराव आणि काळदाते यांना स्थानबद्ध करण्याचा हुकूम बजावण्यात आला. त्यांना नाशिक तुरुंगात नेण्यात आले. जवळजवळ अकरा महिने अनंतराव नाशिकच्या तुरुंगात स्थानबद्ध होते.

स्थानबद्धतेमुळे मुक्तपणे काम करण्यावर बंधने आली असली तरी एक समाधान होते की तुरुंगात अनेक सहकारी बरोबर होते. तुरुंगाच्या बाहेर जेवढ्या मोकळ्यापणाने राजकीय प्रश्नाविषयी चर्चा होऊ शकत होती त्यापेक्षा अधिक मोकळेपणाने तुरुंगात चर्चा होई. मोहन धारियाही याच तुरुंगात होते. बापू काळदाते, मोहन धारिया आणि अनंतराव सामान्यतः एकाच भागात राहात. त्याचवेळी म. द. पाध्ये आणि मराठवाड्यातले अनेक समाजवादी कार्यकर्तेही त्याच तुरुंगात होते. त्यांच्याही अधूनमधून भेटी होत.

अनंतराव तुरुंगात असले तरी लक्ष अर्थातच दैनिक मराठवाड्याकडे होते. मराठवाड्याचे व्यवस्थापक केशवराव देशपांडे अनंतरावांना येऊन भेटत. हिशेबासंबंधीची माहितीही सांगत. काही महत्त्वाचे निर्णय घेणे आवश्यक असेल तर त्याबद्दल अनंतरावांना विचारीत. आणीबाणीतील या तुरुंगावासाच्या काळात अनंतरावांनी आपल्या पत्नीला- सुशिलाबाईंना- काही पत्रे लिहिली आहेत. त्यांच्यातला हा एकमेव पत्रकालखंड असावा. अनंतराव तुरुंगात असताना त्यांच्या सहकाऱ्यांनी अतिशय निष्ठेने व हिंमतीने मराठवाडा चालू ठेवला. संपादक तुरुंगात असले तरी सर्व अडचणीवर मात करण्याची शक्ती अनंतरावांच्या सहकाऱ्यात होती.

१८ जानेवारी १९७७ रोजी इंदिरा गांधींनी निवडणुका जाहीर केल्या. मार्चमध्ये निवडणुका होणार होत्या. २० जानेवारीपासून वृत्तपत्रावरील प्रसिद्धीपूर्व नियंत्रण मागे घेण्यात आले. तुरुंगात झालेल्या विचारविनिमयानुसार चार प्रमुख विरोधी पक्षांनी एकत्र येऊन जनता पक्ष स्थापन केला. २६ जानेवारी १९७७ रोजी सायंकाळी अनंतरावांची व पाध्यांची नाशिक तुरुंगातून सुटका झाली. बापू काळदाते त्यापूर्वीच सुटले होते. अनंतरावांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे औरंगाबादमध्ये आल्यावर मोठे स्वागत झाले. थोड्या विश्रांतीनंतर ६ फेब्रुवारी १९७७ पासून अनंतरावांनी पुन्हा संपादकीय

काम सुरू केले. ७ तारखेला प्रकाशित झालेल्या अंकात 'पंधरा महिन्यानंतर' हा अनंतरावांचा अग्रलेख प्रकाशित झाला. त्यांच्या स्वभावातील ऋजुता आणि संपादक अनंतरावांची नम्रता या अग्रलेखात प्रकट झाली आहे. वाचकांच्या सेवेत पडलेला पंधरा महिन्यांचा खंड हा खाजगी कारणासाठी पडलेला नव्हता. याचे त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

आणीबाणीच्या काळातील तुरुंगवासातून अनंतराव बाहेर आले आणि थोड्याच महिन्यांनी त्यांच्या पत्रकारितेचा मराठवाड्याबाहेर पहिल्यांदाच गौरव झाला. इचलकरंजीच्या अनंतराव कुलकर्णीच्या 'फाय फाऊंडेशन'ने मराठी पत्रकारितेच्या क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना पुरस्कार दिला. त्यानंतर त्यांना अत्रे पुरस्कार आणि आगरकर पुरस्कारानेही गौरवण्यात आले होते.

घाईघाईने स्थापन झालेल्या जनता पक्षाचे पहिले काम निवडणुकींना सामोरे जाणे हे होते. अनंतरावांनी लोकसभेत जावे अशी कार्यकर्त्यांची इच्छा होती. समाजाच्या सर्व स्तरातून या सूचनेचे स्वागत होत होते. वातावरण असे होते की या निवडणुकीत जात किंवा पैसा यांचा प्रभाव फारसा पडू शकणार नाही हे स्पष्ट दिसत होते. पण अनंतरावांनी आपल्या कामाच्या मर्यादा निश्चित करून घेतल्या होत्या. संसदीय प्रतिनिधी म्हणून काम स्वीकारले म्हणजे पत्रकारिता दुय्यम होणार होती. अनंतरावांना ते मंजूर नव्हते. आपण पत्रकार म्हणून करावयाचे काम करीत राहू; हेही लोकांचे प्रतिनिधित्वच आहे अशी त्यांची भूमिका होती. औरंगाबाद लोकसभा मतदारसंघाचा उमेदवार ठरवण्यासाठी जनता पक्षाच्या जिल्हा समितीची बैठक झाली त्यावेळी अनंतरावांनीच बापू काळदात्यांचे नाव सुचवले आणि काळदात्यांची उमेदवारी निश्चित झाली.

निवडणुकीच्या प्रचारात मराठवाडा वृत्तपत्राने कोणती भूमिका घ्यावयाची याबद्दल १० फेब्रुवारी १९७७ रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली. व्यक्तिगत टीका किंवा निंदानालस्ती तर मराठवाड्याने कधी केलीच नव्हती. निवडणुकीकडे लोकशिक्षणाचा एक मार्ग म्हणून पाहावे हेच धोरण पूर्वीपासून अंगिकारले होते. निवडणूक लढवणाऱ्या सर्व पक्षांचे जाहीरनामे संक्षेपाने छापावेत आणि

मराठवाड्यातून निवडणूक लढवणाऱ्या सर्व उमेदवारांचा छायाचित्रांसह परिचय छापावा असे ठरले. लोकशाही मूल्यांचे जतन करणाऱ्या आणि मूलभूत स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या पक्षाला पाठिंबा द्यावा असाही निर्णय झाला. ज्या मूल्यांच्या रक्षणार्थ अनंतरावांनी सत्याग्रह केला होता आणि नंतर मिसाखाली स्थानबद्धता भोगली होती त्याच मूल्यांना आणि ती स्वीकारणाऱ्या पक्षाला पाठिंबा द्यावयाचा निर्णय झाला होता.

तुरुंगातून बाहेर आलेल्या अनंतरावांना जनतेमधल्या नव्या उत्साहाची आणि बदललेल्या राजकीय परिस्थितीची जाणीव होती. जनता पक्ष सत्तेवर आला होता. लोकांच्या अपेक्षा वाढल्या होत्या. 'मराठवाडाला'सुद्धा आपल्या विस्ताराच्या योजना हाती घ्याव्या लागणार होत्या. विश्वस्त मंडळाच्या बैठकीत याबद्दल चर्चा झाली मराठवाड्याचा खप पंचवीस हजारांवर पूर्वीच गेला होता. नव्या वातावरणात तो आणखी वाढू शकत होता. दैनिक सुरू करताना घेतलेले सध्याचे फ्लॅट बेड रोटरी मुद्रणयंत्र अपुरे पडणार होते. त्यासाठी नवे यंत्र घ्यावे लागणार होते. १० एप्रिल १९७७ च्या अंकात नव्या हायस्पीड रोटरी मुद्रण यंत्रासाठी वाचकांनी मदत करावी असे आवाहन प्रसिद्ध करण्यात आले. वाचकांनी आपल्या शक्तीनुसार या आवाहनाला प्रतिसाद देणेही सुरू केले.

आता आपल्याबद्दल सहानुभूती बाळगणारे, आपल्या विचाराच्या मित्रांचा समावेश असलेले सरकार आले आहे. आता शांतपणे वृत्तपत्राच्या वाढीकडे लक्ष देता येईल आणि सामान्य माणसाचे विकासाचे प्रश्नही मांडता येतील असा अनंतराव विचार करू लागले होते. पण राजकारणात असे होत नाही. जेव्हा आपण पुष्कळ दिवस मागे पडलेले लोकांचे प्रश्न हातात घेऊ व ते सोडवण्याला संबंधितांना भाग पाडू असा आपण विचार करतो तेव्हा नियती नवेच प्रश्न घेऊन आपल्यासमोर उभी राहते. मनात जे योजिलेले असते ते बाजूला पडते आणि तिसऱ्याच गोष्टींनी मन व्यग्र होऊन जाते.

१९५९ साली मराठवाडा विद्यापीठ जेव्हा स्थापन झाले त्यावेळी या विद्यापीठाला कोणते नाव द्यावे याबद्दलचा विचार विद्यापीठासाठी नेमलेल्या पळणीटकर आयोगाने

केला होता. या आयोगात नंतर विद्यापीठाचे कुलगुरू झालेले सुंदरराव डोंगरकेरी, कुलसचिव झालेले म. भि. चिटणीस इत्यादींचाही समावेश होता. सर्व नावांचा विचार करून व्यक्तीचे नाव देण्याऐवजी प्रदेशाचे नाव देणेच युक्त होईल असे आयोगाने ठरवून तशी शिफारस केली होती. जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर, पुन्हा एकदा सतरा-अठरा वर्षांनी विद्यापीठाचे नामांतर करावे व या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे अशी मागणी अधिक आग्रहाने होऊ लागली. बाबासाहेबांनी मराठवाड्यात पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या वतीने शिक्षण संस्था उभारून, दर्जेदार उच्च शिक्षण औरंगाबादेत उपलब्ध करून दिले होते व दलित आणि दलितेतर अशा दोन्हीही विद्यार्थ्यांसाठी एक मोठीच सोय झाली होती. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाविषयी, देशभक्तीविषयी आणि त्यांच्या शैक्षणिक कार्याविषयी मराठवाड्यात सर्वांच्याच मनात आदर होता. नामांतर होणे हा दलित जनतेला आपल्या अस्मितेचा मानबिंदू वाटत होता तर आपल्यावरती ही मागणी लादण्यात येत आहे, अशी भावना मराठवाड्यातील काही घटकात होती. पाहता पाहता नामांतराच्या मागणीचा जोर वाढू लागला व या प्रश्नाबद्दल आपण काही भूमिका घ्यावी अशी गरज मराठवाडा वृत्तपत्रालाही भासू लागली.

मराठवाडा वृत्तपत्राच्या विश्वस्त मंडळात या प्रश्नासंबंधी दोन्ही बाजूची मते व्यक्त होत होती. काही नामांतराच्या विरोधात होते तर काहींचा नामांतराला पाठिंबा होता. विश्वस्त मंडळाचा आजवरचा दंडक असा होता की एखाद्या प्रश्नासंबंधी चर्चा करावी, सर्वसाधारण धोरण काय असावे याबद्दलची मते व्यक्त करावीत, परंतु शेवटी निर्णय संपादकांनी घ्यावा. संपादकाचे निर्णयस्वातंत्र्य शक्यतो अबाधित ठेवावे; मतभेदाची चर्चा करावी पण त्याबद्दल संपादकावर दडपण आणू नये. संपादक अनंतरावांना मात्र ही जाणीव होती की, लढ्यातून जन्माला आलेले आपले वृत्तपत्र एक विचारपत्र आहे व हे विचार आपल्या एकट्याचे नसून विश्वस्त मंडळातील आणि बाहेरच्याही आपल्या सर्व सहकाऱ्यांचे असावेत. जेथे असे एकमत नसेल तेथे मग आपण आपला दृष्टिकोन इतरांच्या मताबद्दल आदर बाळगत मांडावा. २२,२३,२४ सप्टेंबर १९७७ रोजी तीन हप्त्यात प्रसिद्ध झालेल्या अग्रलेखात अनंतरावांनी नामांतराच्या प्रश्नासंबंधी वृत्तपत्राची भूमिका मांडली.

आजवर आपण नामांतराच्या प्रश्नाबद्दल काही मत व्यक्त केले नाही तरीही दोन्ही बाजूच्या लोकांनी, आमच्या शांततेला अनेक अर्थात चिकटवून आमचा निषेध केला याचा त्यांनी प्रारंभीच उल्लेख केला. मराठवाड्यात बाबासाहेब आंबडेकरांचे स्मारक जरूर झाले पाहिजे, त्या स्मारकाचे स्वरूप लोकांनी एकमताने ठरवावे, बाबासाहेबांच्या स्मारकासारखी गोष्ट आपल्यावर लादण्यात आली आहे असे कोणाला वाटू नये; ही भूमिका प्रारंभीच सांगून, मराठवाडा हे नाव सर्वांच्याच अस्मितांना सामावून घेणारे आहे म्हणून त्यावेळी त्याचा स्वीकार करण्यात आला हा इतिहासही त्यांनी सांगितला. एखाद्या प्रश्नाबाबत भिन्न भूमिका असणारी व्यक्ती आपली शत्रू आहे असे मानण्याची उतावळी करू नये असे कळकळीचे आवाहन त्यांनी दलितांना केले. मराठवाड्यातील जनतेने हा प्रश्न परस्पर विचारविनियमाने आणि शांततेने सोडवावा, निदर्शनांच्या मार्गाने नव्हे असे त्यांचे आवाहन होते. मराठवाड्यात या निमित्ताने गेल्या दीडशे वर्षांत कधीच न झालेला दलित-दलितेतर संघर्ष शेवटचाच ठरावा व पुन्हा असे कधीही घडू नये अशी त्यांनी शेवटी आशा व्यक्त केली.

नामांतराच्या प्रश्नांनी आणि त्यानिमित्ताने झालेल्या आरोप-प्रत्यारोपाने मराठवाड्यातील वातावरण दूषित करून टाकले. आजवर दलितांच्या सर्व प्रश्नांबाबत अनंतराव आणि मराठवाड्याचे बहुतेक विश्वस्त दलितांच्या बाजूने उभे होते. दलितांवरील अत्याचार आणि दलित विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वाढवण्यासारखे प्रश्न, याबाबत मराठवाड्याची भूमिका दलितांची बाजू मांडण्याचीच होती. नामांतराला 'मराठवाड्या'ने पाठिंबा दिला नाही तरी नामांतर करूच नका, अशी आक्रमक भूमिकाही हिरीरीने या पत्राने मांडली नव्हती. हा प्रश्न सामंजस्याने सुटावा अशी इच्छा व्यक्त करून दोन्ही बाजूंना शांततेचे आवाहन केले होते. असे असतानाही नामांतरवादी कार्यकर्ते नाराज झाले होते. नामांतराचा आग्रह वगळता दलितांच्या सर्व मागण्या व प्रश्न यांच्याबाबत अनंतराव व 'मराठवाडा' त्यांच्या बाजूनेच लढला होता; पण ते सर्व क्षणार्धात विसरले गेले. अनेक बाबतीत एखाद्या समाजघटकाच्याबरोबर तुम्ही असता पण एखाद्या बाबतीत मतभेद व्यक्त केला तर तो कोणी समजून घेण्याच्या मनस्थितीत नसते, याचा त्यांना अनुभव येत होता.

अनंतरावांना व्यथित करणारी आणखीही एक गोष्ट होती. जो माणूस आपल्याबरोबर समाजवादी चळवळीत एवढा दीर्घकाळ आहे, त्याची भूमिका या प्रश्नावर आपल्यापेक्षा वेगळी का ; हे समजून घेण्याचा प्रयत्नसुद्धा अनंतरावांच्या जुन्या समाजवादी मित्रांपैकी व नेत्यांपैकी कोणी केला नाही याचे त्यांना विलक्षण दुःख होते. चळवळीत मतभेद होतात याची परंपरेने चांगलीच जाण असलेल्या, पक्षातील कार्यकर्त्यांनासुद्धा हा मतभेद समजून घ्यावासा वाटला नाही. नामांतराला पाठिंबा देणाऱ्या बाहेरच्या काही राजकीय कार्यकर्त्यांनी, भडक बोलून अनंतरावांवर भलतेच आरोप केले तेव्हाही ; अनंतरावांचे मत वेगळे असेल पण दंगल आणि अशांततेला पाठिंबा देईल इतके बेजबाबदार नेतृत्व अनंतरावांचे नाही, असे महाराष्ट्राला सांगावे असेही त्यांना वाटले नाही. नामांतराची चळवळ जेव्हा उग्र झाली तेव्हा नामांतरवादी आणि नामांतराचे विरोधक या दोघांपैकीही काहींनी, मराठवाडा दैनिकावर मोर्चे आणले आणि मराठवाड्याच्या कार्यालयाची सुरक्षितता चिंतेची गोष्ट बनली. दोन-तीन रात्री अनंतराव आणि बापू काळदाते आपल्या काही मित्रांसह, मराठवाडा दैनिकाच्या कार्यालयासमोर अस्वस्थपणे फेऱ्या मारत जागे होते. बाजू कोणतीही असो, स्वतंत्र वृत्तीचे आणि राजकीय अतिरेकाला शरण न जाणारे वृत्तपत्र, कोणालाच नको असते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

योगायोग असा की दैनिक सुरू झाले त्याच सुमारास मुद्रणक्षेत्रात प्रचंड क्रांती होत होती. खिळेटाईपांच्या साह्याने मुद्रण करण्याऐवजी संगणकीय शब्दजुळणी अस्तित्वात आली आणि त्याच्याहीअगोदर ऑफसेट पद्धतीने मुद्रणाला प्रारंभ झाला. ज्या वेगाने हे तांत्रिक बदल होत होते त्या वेगाने मराठवाडा व्यवस्थापनाने आपल्यात बदल करण्याचे निर्णय घेतले नाहीत. लवकरच टाकऊ होणारे तंत्रज्ञान आणि पद्धती ताबडतोब टाकून द्यावी आणि नव्याचा स्वीकार लगेच करावा, याला धाडस आणि पैसा या दोन्ही गोष्टी लागतात. त्या नसतील तर निर्णयांना विलंब होतो आणि त्याचे परिणाम भोगावे लागतात. १९६८ पासून १९७८-७९ पर्यंत रोटरीवर जुन्या खिळेटाईपात मराठवाडा छापला जात होता. दर दोन-तीन वर्षांनी टाईप नवा पाडून घ्यावा लागे. मात्र इतर कोणती मोठी अडचण आली नव्हती. या काळात इतर काही दैनिकांची

छपाई संगणक जुळणीच्या साह्याने व ऑफसेट मशीनवर होऊ लागली होती. मराठवाड्यातही अशी छपाई करणारी वृत्तपत्रे नंतर थोड्याच काळात आली. कधी ना कधी मराठवाड्याच्या मुद्रणव्यवस्थेलाही नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करावा लागणार होता.

मराठवाडा दैनिक जेथे छापले जात होते त्या जयहिंद मुद्रणालयातील खिळेटाईपांची सर्व सामग्री एकदम भंगारात काढावयाची आणि त्या पद्धतीचे काम करणाऱ्या कामगारांना नुकसानभरपाई देऊन मुक्त करावयाचे हा निर्णय व्यावहारिकदृष्ट्या योग्य होता; पण तो त्वरेने होऊ शकला नाही. त्यात अत्यंत अक्षम्य विलंब झाला. परिणामतः मुद्रणालयावर देणी वाढत गेली. निर्णयाला विलंब होण्यात या सर्व कामगारांविषयी व्यवस्थापनाच्या मनात असलेले प्रेम हेही एक कारण होते. शिवाय नुकसानभरपाई द्यावयाला पैसेसुद्धा नव्हते.

अनंतराव हे संपादकच नव्हते तर संस्थाकुटुंबातले एक ज्येष्ठ होते आणि मराठवाड्याचे विश्वस्तही होते. विश्वस्तांनी आणि व्यवस्थापकांनी विचारविनिमय करून धोरणात्मक निर्णय घेण्याची प्रथा होती तरी त्यात अनंतरावांच्या मताला महत्त्व असे. शेवटी दैनिक त्यांनाच चालवावयाचे आहे ही जाणीव इतरांना असे. दैनिकाच्या विस्तारासाठी घेण्यात आलेल्या निर्णयापैकी दोन निर्णय चुकीचे ठरले आणि त्यांनी दैनिकाच्या स्थैर्यावरच परिणाम केला. त्यावेळी वापरत असलेले रोटरी मशीन सरळ विकून टाकून नवे ऑफसेट मशीन विकत घेण्याऐवजी, आहे त्या रोटरीचेच ऑफसेट छपाईसाठी परिवर्तन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. नवे ऑफसेट विकत घ्यावयास जेवढे पैसे लागले असते त्यापेक्षा फारच कमी पैशात ही दुरुस्ती होणार होती. खिळेटाईपाचे मुद्रण करणाऱ्या रोटरी यंत्रात काही बदल करून, त्यावर डायलिथो पद्धतीचे मुद्रण करण्याचा प्रयोग कुठे कुठे यशस्वी झाला होता. केरळमधील एक वृत्तपत्र व इनाडू वृत्तपत्राची तिरुपती आवृत्ती याच पद्धतीने छापली जात होती. व्यवस्थापक केशवराव देशपांडे स्वतः हा यंत्रपरिवर्तनाचा प्रयोग पाहून आले आणि नंतर मराठवाड्यात तो करण्यासाठी एक तंत्रज्ञाला पाचारण करण्यात आले. दुर्दैवाने हा प्रयत्न साफ फसला. अधूनमधून छपाई बरी येई; पण त्यात

सुबकता आणि रेखीवता नसे. थोड्याच दिवसात पुन्हा मशीनच्या अंगात येई आणि मोठ्या ब्रशने काळे फराटे मारल्यासारखे काळे अंक निघत. हे परिवर्तन कधी तरी यशस्वी होईल या आशेवर चार-पाच वर्षे हा प्रयोग चालला. वाचकांचे प्रेम एवढे की न वाचता येण्यासारखे हे अंकही त्यांनी विकत घेतले. याच काळात संगणकावर अक्षरजुळणीचाही प्रयोग करण्यात आला. त्यावेळी तो प्राथमिक अवस्थेत होता. ब्रोमाईड फिल्मवर आलेली अक्षरे मुद्रणासाठी वापरणे अगर तत्सम इतर प्रक्रियेत अडथळा निर्माण होई आणि भलताच ताप होई.

दैनिकाचा व्याप वाढावा आणि व्यवसायात येणाऱ्या व्यापारी वृत्तीच्या स्पर्धकांना तोंड देता यावे या हेतूने 'मराठवाडा' दैनिकाची आणखी एखादी आवृत्ती सुरू करावी असा विचार १९८६-८७ च्या सुमाराला विश्वस्त मंडळाच्या मनात आला. लातूर हे मराठवाड्याच्या एका कोपऱ्यात असलेले मोठे शहर. तेथे जर मुद्रण झाले तर नांदेड, उस्मानाबाद, बीदरचा मराठी भाग इत्यादीकडे ताजा अंक जाऊ शकेल या विचाराने लातूरला आवृत्ती काढावी असा विचार झाला. त्यासाठी एक नवे ऑफसेट छपाईचे यंत्र काही मित्रांनी वेगळी कंपनी स्थापन करून घेतले आणि ते मराठवाड्याला वापरण्यासाठी दिले. आवश्यक ते संगणकही आले. लातूरमध्ये प्राथमिक जुळवाजुळव झाली आणि ऑगस्ट १९८८ मध्ये लातूर आवृत्तीचे थाटात उद्घाटनही झाले. समारंभ संपला आणि दुसऱ्या दिवशीचा अंक संगणकावर जुळणी होऊन मुद्रणयंत्राला मुद्रण करण्याचा संदेश पाठवण्यात आला. पण मुद्रण सुरूच झाले नाही. शेवटी मुहूर्ताचा अंक हवाच म्हणून एक सहकाऱ्याने हाताने अख्खे पहिले लिहून काढले ते सरळ ऑफसेटवर छापण्याचा विचार झाला. शेवटी पहाटे तीनच्या सुमाराला छपाईयंत्राशी संगणक जुळणीचा सांधा जुळला आणि नियमित मुद्रण झाले. लातूरची आवृत्ती फार मूळ धरू शकली नाही. असा नवा उपक्रम करताना जे भांडवल त्यात ओतावे लागते व मनुष्यबळही उभे करावे लागते तसे लातूरमध्ये झाले नाही आणि लातूरची आवृत्ती बराच तोटा सहन करून बंद करावी लागली.

'मराठवाडा' दैनिक सुरू झाल्यानंतर बीडसारख्या जवळच्या शहरात टॅक्सीने अंक पाठवण्याची व्यवस्था, छपाईयंत्राचे रूपांतर, लातूर आवृत्तीचा प्रयोग या सर्व



(शा.म.मु.) एन ४०५८-१० (११६५—१०-२०१२)

गोष्टीत अनंतराबांचा पुढाकार तर असेच; पण ते एका नव्या उत्साहाने सळसळलेले दिसत. लढ्याच्या काळात जी जिद्द आणि साहस त्यांनी दाखवली होती त्याचा पुन्हा एकदा प्रत्यय येई. परंतु नियतीचे फासे आता उलटे पडत होते. वृत्तपत्र हा प्रचंड भांडवल आणि सर्व प्रकारच्या योग्य-अयोग्य क्लृप्त्या वापरून करावयाचा धंदा आहे असा संकेत रूढ होऊ लागला होता. आता स्पर्धा विचारांची नव्हतीच, होती ती निराळीच होती आणि अनंतरावांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना यशस्वितेचे हे नवे मार्ग ठाऊकही नव्हते आणि पेलणारही नव्हते. नवे ऑफसेट छपाईचे यंत्र विकत घेता न आल्यामुळे, केलेला जुन्या यंत्राच्या रूपांतराचा प्रयोग आणि लातूर आवृत्तीचा प्रयोग हे दोन्ही फसल्याचा मोठा आघात अनंतरावांच्या मनावर झाला.

# ९. शेवटचे पर्व

अनंत भालेरावांना फारसे महाविद्यालयीन शिक्षण घेता आले नव्हते. त्यांच्या बोलण्याचालण्यात आणि वेशात अस्सल मराठवाडेपण होते. शिवाय त्यांच्या वाट्याला एक घाईगर्दीचे आणि सतत चालणाऱ्या संघर्षांचे जीवन आले होते. अनंतरावांचे असे रूप पाहून या माणसाचे इंग्रजी वाचनही चांगले असेल आणि त्याला वाङ्मयाची जाणही उत्तम असेल असे सकृत्दर्शनी कोणाला वाटत नसे; पण हे खरे नव्हते. वाङ्मयाची आवड त्यांना प्रथमपासून होती. लढा संपल्यानंतर हैदराबादमध्ये १९४९ च्या सुमाराला ते जेव्हा आले तेव्हा काही निवडक इंग्रजी पुस्तके त्यांनी मिळवून मुद्दाम वाचली. विशेषतः, ज्या मार्क्सवादाचा पुरस्कार लढ्याच्या काळात त्यांनी केलेला होता त्याचे प्रत्यक्ष रूप कम्युनिस्ट देशात कसे पाहावयास मिळाले याबद्दल विशेष वाचावे असे त्यांना वाटले. जिलासचे New Class, इरेनबर्गचे Not by bread alone, हॉवर्ड फास्टचे The Naked God अशी पुस्तके त्यांनी या काळात वाचली. मराठवाड्याचा दिवाळी अंक काढण्याला प्रारंभ झाला तेव्हापासून मराठीतील नवे लेखन विशेषतः कथा ते आवडीने वाचत असत. जी. ए. कुलकर्णी यांच्याशी त्यांचा थोडा पत्रव्यवहारही होता. जी. एं.च्या प्रतिभेविषयी त्यांच्या मनात आदर होता. मात्र जी.एं.ची एखादी कथा आवडली नाही तर तसे ते स्पष्ट नोंदवत. हैदराबादला असताना 'सिनिक' नावाने लिहिणारे दा. गो. देशपांडे त्यांचे विशेष स्नेही झाले होते. त्यांच्या गप्पात आणि पत्रव्यवहारातही वाङ्मय एक महत्त्वाचा विषय असे. अनंतराव औरंगाबादला आले, दा. गो. शासकीय सेवेत असल्यामुळे इतरत्र गेले आणि दोघांचा नित्य सहवास संपला. पुढे काही वर्षांनंतर थोडीफार सवड मिळाली आणि काही वाचन झाले तर त्याबद्दल बोलणे होई ते, भगवंतराव देशमुख आणि सुधीर रसाळांच्याबरोबर. आज कोणाला फारशी माहिती नाही पण अनंतरावांनी 'भारद्वाज' या टोपणनावाने मराठवाडा दिवाळी अंकात तीन-चार कथाही लिहिल्या आहेत.



एन ४०५८-१०अ

१९८२-८३च्या सुमाराला अनंतरावांना मायस्थेनिया ग्रेव्हीस या व्याधीने गाठले. काम करता करता त्यांची एक पापणी हळूहळू खाली येई आणि डोळा आपोआप बंद होई. ते त्यांच्या प्रथम लक्षातही येत नसे. पुढे हे वाढत गेले तेव्हा तपासण्या सुरू झाल्या. हृदयाच्या मागे असलेल्या व सामान्यतः प्रौढ होताना गळून पडणाऱ्या एका ग्रंथीतून होणारा स्राव हा मायस्थेनियाचे कारण आहे असा एक सिद्धांत होता. काही व्यक्तींच्या बाबतीत अपवाद होऊन ही ग्रंथी गळून पडत नाही व त्यातून होणाऱ्या स्रावामुळे व्याधी सुरू होते असे म्हटले जाई. मुंबईला के.ई.एम. इस्पितळात, अनंतरावांवर शस्त्रक्रिया करून ही ग्रंथी काढून टाकण्यात आली. अनंतराव यावेळी इस्पितळात असताना अनेक स्नेही भेटून गेले. त्यातल्या एक होत्या दुर्गाबाई भागवत. अनंतरावांना धीर देण्यासाठी आपल्या खास शैलीत त्या म्हणाल्या 'तू रे मेल्या माझ्या अगोदर कसा जाशील?' दुर्गाबाईंचे उद्‌गार त्यांच्या अकृत्रिम स्नेहाचे प्रतीक होते.

या शस्त्रक्रियेचाही फारसा उपयोग झाला नाही. तेव्हा या व्याधीला बरोबर घेऊनच आपल्याला काम करावयाचे आहे असे अनंतरावांच्या लक्षात आले. मायस्थेनियामुळे व त्याच्या प्रतिकारार्थ दिल्या जाणाऱ्या औषधामुळे, माणसाची प्रतिकारशक्ती कमी होते व दुसऱ्या माणसांकडून जंतूसंसर्ग ताबडतोब होऊ शकतो. अनंतरावांना तुम्ही आता फारशा भेटीगाठी घेऊ नका असे डॉक्टरांनी सांगितले तेव्हा 'माणसांना भेटायचे नसेल तर जगायचेच कशाला?' असा प्रश्न त्यांनी विचारला होता. अग्रलेख लिहिण्यापुरते ते कार्यालयात जात. इतर वेळी घरी असत; पण तेथे विश्रांती कमी. माणसांचा राबता चालूच राही.

आपल्या आजाराचे स्वरूप लक्षात घेऊन अनंतरावांनी 'मराठवाड्या'च्या दैनंदिन जबाबदारीतून मुक्त होण्याचे ठरवले. नोव्हेंबर १९८५ मध्येच वयाची ६५ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व विश्वस्तांनी निवृत्ती पत्करली होती. त्याचवेळी अनंतरावांनीही विश्वस्तपद सोडले होते. आता विश्वस्त मंडळात काशीनाथ नावंदरांचा अपवाद वगळता जुन्यातले कोणी नव्हते. नावंदरांच्या अध्यक्षतेखाली नवे विश्वस्त मंडळ काम करू लागले. सर्व जुने विश्वस्त सल्लागार म्हणून बैठकीला बोलावले जात. फेब्रुवारी १९८६ मध्ये अनंतरावांनी आपण संपादकपद सोडत असल्याचे कळवले. १ मार्चपासून त्यांची

निवृत्ती अमलात आली. त्या दिवसापासून 'मानद संपादक' म्हणून त्यांचे नाव छापले जाऊ लागले. 'मराठवाड्या'त दर शनिवारी 'कावड' या नावाचे एक सदर ते लिहू लागले. दैनिकाच्या रोजच्या कामाशी त्यांचा संबंध उरला नसला तरी धोरणात्मक निर्णय असेल किंवा एखाद्या बाबीत काही अडचण आली असेल तर अनंतरावांपर्यंत ती गोष्ट येईच. औपचारिक जबाबदारी नसली तरी अपत्यवत सांभाळलेल्या संस्थेच्या काळजीतून निवृत्त व्हायला त्यांचे मन तयार नव्हते. अगदी मृत्यूच्या अगोदर चार-पाच दिवसपर्यंतसुद्धा दैनिकाशी संबंधित काही प्रश्न त्यांना व्यग्र करीतच होते.

पंधरा-सोळा महिने अनंतरावांनी मानद संपादक म्हणून आपले नाव राहू दिले व लेखनही केले. त्यानंतरमात्र हेसुद्धा आपण सोडून द्यावे व वेतन किंवा मानधन अजिबातच घेऊ नये असा निर्णय त्यांनी मनोमन घेतला. आपण दैनिकाचे फारसे काम करीतच नाही तर मानधन कशासाठी अशी त्यांची भूमिका होती. ५ सप्टेंबर १९८७ रोजी त्यांनी व्यवस्थापक केशवराव देशपांड्यांना एक पत्र लिहिले व आपला हा निर्णय त्यांना कळवला.

'प्रिय श्री केशवराव,

स. न. वि. वि.

कालच आपल्या माणसाने ऑगस्ट महिन्याचे माझे वेतन घरी आणून दिले. मी तुम्हाला याआधी थोडीशी कल्पना दिली होती असे स्मरते. खरे म्हटले तर जेव्हापासून मी आजारी पडलो तेव्हापासून मी कसलेही काम न करता घरी बसून फुकट पगार घेतला. आपल्या संस्थेची परिस्थिती व नव्या विश्वस्तांसह तुम्ही सर्वजण जी धडपड करीत आहात ती आठवली की मला अपराधित्वाची जाणीव होते. परंतु माझाही नाईलाज होता.

आता मात्र मी माझ्यापुरता निर्णय केला असून इतःपर माझे नाव वेतनाच्या अगर मानधनाच्या यादीत ठेवू नये व मला वेतन देऊ नये. मी ते स्वीकारणार नाही. हे मी नैतिक कर्तव्याच्या जाणिवेतून लिहित आहे. त्यात औद्धत्य असेल तर क्षमा करावी.

मी जरी पगार घेणार नसलो तरी मी रूढ अर्थाने निवृत्त होत नाही. नियमाने मी आधीच निवृत्ती स्वीकारली आहे. परंतु आपल्या दोन्ही संस्थांशी माझे जीवन इतक्या घनिष्ठपणे जोडले गेले आहे की, मी या संस्थांपासून वेगळा होऊच शकत नाही. माझ्या कार्यशक्तीला आता फार मर्यादा पडल्या आहेत. तरीही माझ्याकडून होईल ते काम मी आनंदाने करीन, तुम्ही हक्काने सांगावे. लिहिता येणे परत शक्य झाले तर मी मराठवाड्यातच लिहीन व विनामुशाहिरा लिहीन. या संस्थांनी मला इतके दिले आहे की त्यांचे उपकार या जन्मात तरी फिटणार नाहीत. तुम्हा सर्व सहकाऱ्यांचा मी मनापासून उतराई आहे. तुम्हा सर्वांचे भावी आयुष्य सुखाचे जावो.'

तुमचा स्नेहांकित

**अनंत भालेराव**

अनंतरावांनी हे पत्र लिहून मानधनही नाकारले व दैनिकातून संपूर्ण निवृत्ती घेतली. त्यापूर्वीच दोन महिने यदुनाथ थत्ते आणि पन्नालाल सुराणा यांची संपादक म्हणून नावे छापली जाऊ लागली होती. वृत्तपत्राचे दैनंदिन कामकाज, पूर्वीपासून अनंतरावांचे सहकारी असलेली मंडळी चांगले पार पाडत असली तरी वृत्तपत्रांच्या विचारांची दिशा स्पष्ट होण्यासाठी, या उभयतांचा उपयोग होईल या विचाराने ही योजना करण्यात आली होती. विश्वस्त मंडळाच्या या विनंतीला उत्तर देताना यदुनाथांनी स्पष्ट सांगितले होते की 'मला औरंगाबादला राहून काही काम करता येणे शक्य नाही. माझे नाव संपादक म्हणून छापण्याचा उपयोग आहे असे तुम्हाला वाटले तर तसे छापण्यास माझी संमती आहे. मात्र माझी ही मर्यादा लक्षात घ्या. तसेच मी मानधन अजिबात घेणार नाही.'

प्रत्यक्ष कामकाज करण्यासाठी पन्नालाल सुराणा मात्र आले. त्यांनी पूर्वी स्वीकारलेली इतर कामे सांभाळत मराठवाड्यात काम सुरू केले. योगायोग असा की १९८० च्या सुमारास पन्नालालजींनी काशीनाथ नावंदरांना पत्र लिहून मराठवाडा वृत्तपत्रात काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती. अनंतराव तेव्हा भावाच्या निमंत्रणावरून कॅनडाला

जाण्याच्या घाईत होते. पण नावंदरांकडून ही गोष्ट कळताच अनंतरावांनी व्यवस्थापकांना पत्र लिहून सुराणांना अवश्य बोलावावे व त्यांच्या दर्जाप्रमाणे (शक्यतर माझ्या बरोबरीची-संयुक्त संपादकासारखी) जागा निर्माण करून त्यांना कामावर घ्यावे असे कळवले होते. असे दिसते की काही कारणामुळे पन्नालाल तेव्हा येऊ शकले नाहीत.

हैदराबाद मुक्तिसंग्रामात मराठवाड्याने घेतलेल्या सहभागाबद्दल अधिकृत माहिती सांगणारे काही लेखन उपलब्ध नव्हते. स्वामी रामानंद तीर्थ स्मारक व संशोधन समितीने हे काम बऱ्याच काळापूर्वी काही व्यक्तींना करावयास सांगितले होते; पण त्यांनी ते प्रत्यक्ष सुरुच केले नव्हते. जसजसा काळ जात होता तसतशी साधने लुप्त होत जात होती. अद्याप लढ्यात प्रत्यक्ष भाग घेणारे पुष्कळ कार्यकर्ते हयात होते आणि कागदोपत्री संदर्भही मिळवता येण्याजोगे होते. अनंतरावांनी हे काम हाती घ्यावयाचे ठरवले. जवळजवळ तीन वर्षे अनंतराव हे संशोधन आणि लेखन करीत होते. प्राॅरंभी अनंतरावांचे लेखन त्यांनी पाहिलेल्या संदर्भावरून त्यांचे मत व्यक्त करणारे, विधान करणारे असे. संशोधनात्मक लेखनात असे चालणार नाही; तुमचे विधान जरी बरोबर असले तरी त्याचा आधार कोणता हे त्याच ठिकाणी नमूद करावयास पाहिजे, असा आग्रह सुधीर रसाळ आणि भगवंतराव देशमुखांनी धरला. अनंतरावांनी ती सूचना स्वीकारली आणि लेखनात जागोजाग संदर्भ नमूद करण्यास प्रारंभ केला. एखाद्या पीएच.डी.च्या विद्यार्थ्यालाही लाजवेल अशा शिस्तीने अनंतरावांनी संदर्भ गोळा केले. पुराभिलेख खात्यातील फायली मिळवल्या. पुस्तके गोळा केली. स्वातंत्र्यसैनिकांना माहिती पाठवण्यास सांगितले. तुरुंगात जे होते त्यांचे कागदोपत्री पुरावे होते. पण सरहद्दीवर जे प्रतिकार शिबिरात होते त्यांचे सरकारी अभिलेख उपलब्ध असणे शक्य नव्हते. अशा सर्व शिबिरांच्या प्रमुखांकडून लेखी टिपणे मागवण्यात आली. त्या शिबिरात असलेल्या इतर कार्यकर्त्यांच्या निवेदनाशी व इतर संदर्भांशी ती ताडून पाहण्यात आली. एवढेच नव्हे तर ज्यांचा मुक्तिलढ्याला विरोध होता ती रझाकार संघटना आणि इत्तेहादुल मुस्लमीनच्या पाठीराख्यांनी लिहिलेली उर्दू पुस्तकेही अनंतरावांनी मुद्दाम मागवून घेतली. त्यांच्या दृष्टिकोनातून लढ्याचे चित्र कसे दिसले आहे हेही त्यांनी अभ्यासिले. त्यानंतर अनंतरावांनी लेखनाला प्रारंभ केला.

पुन्हा अनंतरावांच्या घरी दररोज संध्याकाळी बैठका सुरू झाल्या. भगवंतराव देशमुख, सुधीर रसाळ, नरेन्द्र चपळगावकर हे तर नियमित असतच; याशिवाय दिनकर बोरीकर आणि इतर मित्रही हजर असत. अनंतरावांनी एखाद्या प्रकरणाचा काही भाग लिहून ठेवलेला असे व त्याचे वाचन सुरू होई. वाचन पूर्ण झाले म्हणजे किंवा कधी ते होत असतानाच काही सूचना किंवा आक्षेप सांगितले जात. त्याबद्दल अनंतराव विचार करीत व काही नोंद करीत. हा क्रम सुमारे सात-आठ महिने तरी चालला होता. यासाठी येणाऱ्या मित्रांना दररोज काहींना काही तरी खायला द्यावे आणि चहाही द्यावा असा अनंतरावांचा आग्रह असे आणि सुशिलाबाई आतिथ्यशील होत्या हे खरे, परंतु त्यांच्या इच्छेलाही वास्तवाच्या काही मर्यादा होत्या. घरात काय शिल्लक आहे याची अनंतरावांनी कधी चिंताच केली नव्हती. ते फक्त बैठकीतूनच 'यांना काही तरी द्या' असा आदेश देत.

कधी कधी समर प्रसंग ओढवे. काही खाण्याचे व चहा आलेल्या मित्रांना दिला नाही तर अनंतराव (ते मित्र गेल्यानंतर) सुशीलाबाईंना रागवत. एके दिवशी मी (नरेन्द्र चपळगावकर) व सुधीर रसाळ नेहमीच्या वेळी अनंतरावाच्या (आम्ही त्यांना अण्णा म्हणत असू) घराचे फाटक उघडून आत आलो तर व्हरांड्यात आमचीच वाट पाहत असलेल्या सुशीलाबाई घाईने पुढे अंगणात आल्या व हळू आवाजात आम्हाला म्हणाल्या, 'घरात दूध आणि साखर दोन्ही नाही. अण्णा चहा सांगतील. आम्ही आताच घेतला आहे, आता पुन्हा नको असे सांगा.' असे सांगून त्या घरात गेल्या. अनंतरावांच्या आमच्यासारख्या कनिष्ठ स्नेह्यावर सुशीलाबाईंचे आपल्या मुलाइतकेच प्रेम असे. स्वभाव इतका मोकळा की एखाद्या अडचणीच्या वेळी असे स्पष्ट सांगताना त्यांना अजिबात संकोच वाटत नसे.

हैदराबादच्या स्वातंत्र्यसंग्रामातील मराठवाड्याचा सहभाग सांगणारा इतिहास सिद्ध करण्यास अनंतरावच सर्वस्वी पात्र होते. एक तर त्यांना उर्दू चांगले येत होते. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी भागच घेतला होता असे नाही तर त्या लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या मंडळींच्या जवळ असण्याची व त्यांच्या निर्णयप्रक्रियांना साक्षीदार असण्याची संधी त्यांना मिळाली होती. प्रत्यक्ष तुरुंगवास आणि सरहद्दीवरील प्रतिकार शिबिरात

करण्यात आलेली साहसी कामे या लढ्याच्या दोन्ही स्वरूपात ते सहभागी होते. जेव्हा लढा संपून सत्तेत सहभागी होण्याची संधी आली त्यावेळी झालेल्या दुर्दैवी मतभेदांची व त्यांच्या परिणामांची धग लागलेल्या व तरीही आपल्या विचारांशी निष्ठा राखलेल्या कार्यकर्त्यांपैकी ते एक होते. या लढ्याबद्दल त्यांच्या मनातल्या आत्मीयतेमुळे इतिहासलेखकाला आवश्यक असलेली सत्यनिष्ठा आणि अशा लेखनासाठी लागणाऱ्या परिश्रमाची तयारी ही दोन्ही त्यांच्याजवळ होते. अनंतरावांनी हे पुस्तक लिहिले नसते तर यातला बराचसा इतिहास आणि त्याचे एका समकालीनाने आणि सहभाग्याने केलेले विश्लेषण आपल्याला अनुपलब्धच राहिले असते.

हैदराबादच्या जनतेने दिलेला मुक्तिलढा हा भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याचा एक भागच असला तरी त्याचे स्वरूप खूपच वेगळे होते. निजामाच्या राज्यात राजकीय पारतंत्र्याबरोबरच सांस्कृतिक आणि धार्मिक पारतंत्र्यही भोगावे लागत होते. सर्वसामान्य जनतेची या दुहेरी पारतंत्र्यात झालेली घुसमट अनंतरावांनी आपल्या या इतिहासग्रंथात संदर्भासह व साधार व्यक्त केली आहे. अनंतरावांची लेखनशैली अशी आहे की, ते सांगत असलेल्या इतिहासाचा काळ वाचकांच्या समोर स्पष्ट उभा राहतो. या ग्रंथाला 'केशवराव कोठावळे' पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

पाकिस्तानबद्दल आपण एक पुस्तक लिहावे असा विचार त्यांच्या मनात बरेच दिवस घोळत होता. आपल्याला उर्दू येत असल्यामुळे आपण पाकिस्तानात प्रसिद्ध झालेली उर्दू पुस्तकेही आणि उपलब्ध असलेले इतर उर्दू संदर्भही पाहू शकतो याची त्यांना जाणीव होती. हैदराबादच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास लिहित असताना जागा झालेला त्यांच्यातला संशोधक आता पाकिस्तानविषयीचे संदर्भ हुडकीत होता. परंतु ते पुस्तक लिहिण्याला सवड मिळू शकली नाही.

हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामाबद्दलच्या या पुस्तकानंतर नॅशनल बुक ट्रस्टसाठी स्वामी रामानंद तीर्थांचे चरित्र त्यांनी लिहिले. त्यांच्या हयातीत प्रसिद्ध झालेले त्यांचे शेवटचे पुस्तक म्हणजे 'कावड' या सदरातील लेखांचा संग्रह. तो १९९० साली प्रसिद्ध झाला. अग्रलेख, स्वातंत्र्यसंग्रामातील आठवणी, स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास या सगळ्यापेक्षा एक वेगळ्या स्वरूपाचे लेखन कावडमध्ये आहे. तात्कालिक घटनांचे संदर्भ कुठे

आहेतच. परंतु मुख्यतः अनंतरावांची बहुश्रुत सुसंस्कृतता यां ललित लेखनात दिसते. केवळ शैलीला प्राधान्य देणारे हे ललित निबंध नाहीत. अनेक लेखात अनंतरावांची मूल्यदृष्टी दिसते. सत्ता किंवा पद गेल्यानंतर अस्वस्थ झालेले व सार्वजनिक ठिकाणी येण्याचे टाळणारे माजी मंत्री आणि सत्तापदावरून निवृत्त झाल्यानंतर पूर्वीच्या पट्टेवाल्याने पूर्ण दुर्लक्ष करून अवमानित केलेला अव्वल तालुकदार अशी व्यक्तिचित्रे लिहिताना स्वतःचे माणूस म्हणून मोठेपण, पदापेक्षा अधिक टिकाऊ असते याचा संस्कार वाचकांच्या मनावर ते करतात. धर्माच्यापलीकडे गेलेले लोखंडे मास्तर आणि मनोहर सोनदेसारखा मोठ्या बाराखडीतील मित्र यांची व्यक्तिचित्रे आणि एसेम गेल्यानंतर त्यांनी लिहिलेला 'हे मृत्यो, तुलाच अपवाद का नाही?' हा चटका लावणारा लेख या संग्रहात आहे. काळाने थोडी सवड दिली असती तर असे आणखी लेखन अनंतरावांकडून झाले असते.

'कावड' लिहीत असतानाच काही व्यक्तिचित्रे अनंतरावांच्या मनात आकार घेत होती. त्यांचे वडील काशीनाथबुवा, एकमेकांशी गुंतागुंतीचे बहुपदरी नाते असणारी त्यांची आई आणि आत्या अशा काही कुटुंबीयांबरोबरच अगदी निकटचे मित्र असलेले आणि चळवळीतही सहकारी असलेले नागनाथ परांजपे, गोविंदभाई, बाबासाहेब परांजपे आणि दादा वाघमारे यांच्यासारखे लढ्यातले ज्येष्ठ मार्गदर्शक, विठ्ठलाच्या नामसंग कीर्तनात जोडले गेलेले 'रायरंदाचा गजानन' किंवा 'मास्तर' यांच्यासारखे वारकरी यांच्या व्यक्तिरेखा तर त्यांनी उभ्या केल्याच आहेत; त्याचबरोबर परभणी आणि सेलू यासारख्या गावांनाही प्राप्त झालेले व्यक्तिमत्त्व त्यांनी उलगडले आहे. या व्यक्तिचित्रांपैकी अनंतरावांच्या हयातीत त्यांच्या वडलांचे व्यक्तिचित्र फक्त 'मौजे'त प्रसिद्ध होऊ शकले. आणखी दोन व्यक्तिचित्रे अनंतरावांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाली. बाकी सारी 'मांदियाळी' या पुस्तकातच प्रथम प्रकाशित झाली.

का कुणास ठाऊक, मांदियाळीकडे मराठी रसिकांचे जेवढे लक्ष जावयास हवे होते तेवढे गेले नाही. मराठीतील एक अस्सल पुस्तक दुर्लक्षित राहिले. एखाद्या कुशल चित्रकारासारखे व्यक्तीचे किंवा गावाचेही विशेष अनंतराव असे नोंदवतात की, त्यातून बाह्यरूपाबरोबरच अंतरंगाचाही ठाव लगेच लागावा. या पुस्तकात सर्वात जास्त

चटका लावतात ते वारकरी भाववृत्तीचे गडद रंग. ते पाहिले म्हणजे वाटते स्वातंत्र्याच्या चळवळीने या माणसाला पंढरीच्या वाटेवरून मधेच ओढून दुसऱ्याच वाटेला नेले. त्याच्या मुखातून वेगळ्याचा घोषणा आणि लेखणीतून वेगळेच विषय बाहेर पडले. पण अंतःकरणात मात्र सतत टाळ-मृदंगाचा नाद आणि तुकयाची वाणीच उमटत होती. अनंतरावांच्या लेखनात, अग्रलेखातही अनेकवेळा संतवचने येतात. तीही बहुधा तुकारामाची आणि त्यातही व्यावहारिक जीवनासंबंधीच्या तुकारामाच्या परखड अभिप्रायाची. नाठाळाशी सामना करण्याचे व्रत घेतलेल्या अनंतरावांना तुकारामाच्या खड्या बोलाचा आधार मिळे. तोही शोधावा लागत नसे. त्यांच्या शब्दातून तो आपोआप स्रवे.

अनंतरावांनी त्यांच्या वडलांच्या शेवटच्या क्षणांचे जे वर्णन केले आहे ते वाचकाचे डोळे पाणवणारे आहे. डॉक्टरांनी अंतकाळ जवळ आल्याचे सूचित करताच वडलांनी सुनेला-सुशीलाबाईंना ज्ञानेश्वरी काढायला लावली. बारावा अध्याय वाचायला प्रारंभ कर म्हणून सांगितले. बाहेर जमलेले टाळकरी भजन करतच होते. वडलांचे ओठ हलत होते. कोणी म्हणाले 'जवळ कान ने. काही सांगायचे असेल.' अनंतरावांनी कान जवळ नेला तर ज्ञानदेवीचा हळू पण स्पष्ट उच्चार आणि मधूनच 'विठ्ठल, विठ्ठल.' दादा शांत झाले तेव्हा बाराव्या अध्यायाची ओवी वाचणे चालू होते. विठ्ठल भक्तीच्या धाग्याने जोडलेल्या आणि त्यांचे कुटुंबीयच झालेल्या अनेक जातीपातींच्या माणसाचे अनंतरावांनी या पुस्तकातल्या काही प्रकरणात मनोज्ञ दर्शन घडवले आहे.

१९८७-८८ च्या सुमाराला वृत्तपत्रसृष्टीतील उल्लेखनीय योगदानाबद्दल अखिल भारतीय पातळीवर एका पत्रकाराला गौरवून एक लक्ष रुपयांचे बी. डी. गोयंका पारितोषिक त्याला देण्यात येणार आहे व ही निवड करण्यासाठी ; भारतीय समाजजीवनातील नामवंतांची एक समिती नेमण्यात आली आहे, अशी जाहिरात काही मित्रांच्या वाचनात आली. त्यांनी अनंतरावांचे नाव या पारितोषकासाठी सुचवण्याचे ठरवले. अर्थात अनेक अडचणी होत्या. अखिल भारतातून एकाच व्यक्तीची निवड होणार होती. अनंतरावांचे लेखन मराठीत. तेव्हा समिती त्याची कितपत दखल घेईल याचीही शंका होती. अनंतरावांना सुगावा न लागू देता हे करावयाचे होते. त्यांच्या

निवडक अग्रेलखांची कात्रणे जमा करून त्याचा तीन-चार ओळीत इंग्रजी सारांश लिहून तयार करण्यात आला. अनंतरावांच्या जीवनकार्याविषयी एक टिपणही इंग्रजीत लिहिले. या सर्व गोष्टी अनंतरावांना नकळत समितीकडे पाठवण्यात आल्या.

देशभरातून अनेक नावे सुचवली गेली होती. पण समितीने हा पहिलाच पुरस्कार एका देशी भाषेत लेखन करणाऱ्या पत्रकाराला दिला. विज्ञान भवनात झालेल्या एका शानदार समारंभात ख्यातनाम कन्नड लेखक शिवराम कारंथ यांच्या हस्ते हा सन्मान पुरस्कार अनंत भालेराव यांना दिला गेला. या प्रसंगी त्यांच्या कार्याबद्दल जो निर्देश करण्यात आला त्यात म्हटले होते 'अनंत भालेराव हे पत्रकारितेची एक श्रेष्ठ परंपरा चालवणारे झुंजार पत्रकार आहेत. त्यांचे सर्व आयुष्य व लेखन पददलितांचे, छोट्या शेतकऱ्यांचे, भूमिहीन शेतमजुरांचे आणि समाजातल्या वंचितांचे प्रश्न मांडण्यासाठी राबले आहे. त्यांचे गद्य एक आगळी शैली असलेले आहे. त्यांच्या भाषेतील सामर्थ्य आणि दृढविश्वास तसेच त्यांची परिष्कृत लेखनशैली यांच्या तळाशी ग्रामीण जनतेची स्पंदने असतात. त्यांचे लेखन हृदयस्पर्शी होण्याचे कारण म्हणजे त्यातली मानवी दुःखाची कणव. मानवाचे दुःख हाच त्यांच्या उत्तुंग प्रतिभेचा चिंताविषय आहे.'

दुसऱ्या दिवशी दिल्लीतच अनंतरावांच्या अभिनंदनार्थ काही खासदार मित्रांनी एक चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यात उत्तमराव राठोडांसारख्या मराठवाड्यातील काँग्रेस खासदाराचा पुढाकार होता.

मराठी वृत्तपत्रसृष्टीची पहिली शंभर वर्षे सामान्यतः लोकजागृती, लोकशिक्षण, विशिष्ट मतप्रणालीचा प्रचार किंवा एखाद्या लोकनेत्याच्या विचारांचा व प्रतिक्रियांचा प्रसार हीच वर्तमानपत्रांची उद्दिष्टे होती. वृत्तपत्र हे मतप्रचाराचे किंवा चळवळीचे हत्यार होते. म्हणूनच लोकनेत्यांनी स्वतः वृत्तपत्रे काढली किंवा मित्रांना त्यासाठी उत्तेजन दिले. बाळशास्त्री जांभेकर, विष्णुशास्त्री पंडित, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, भगवंतराव पाळेकर, बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी अशा सर्व लोकनेत्यांना आणि समाजमार्गदर्शकांना आपद्धर्म म्हणून पत्रकार व्हावे लागले. त्यांचे विचार, त्यांचे म्हणणे लोकांपर्यंत पोहोचावे हे त्या वृत्तपत्रांचे जीवितकार्य होते. ऐतिहासिक

अपघाताने बाकीच्या महाराष्ट्रापासून वेगळे पडलेल्या मराठवाड्याच्या भवितव्याची काळजी करणारे, आनंद कृष्ण वाघमारे याच परंपरेतील लोकशिक्षक पत्रकार होते. स्वातंत्र्यानंतरही शिल्लक राहिलेले मराठवाड्याच्या विकासाचे प्रश्न व समाजाच्या पुढील मार्गक्रमणासाठी, त्याला प्रगतीची आणि समतेची दिशा दाखवणारे विचार सांगण्यासाठी, 'मराठवाडा' पत्राची आवश्यकता होती. हे काम करण्यासाठी त्यांनी चळवळीत असलेल्या आपल्या तरुण सहकाऱ्याची निवड केली. अनंत भालेरावांनी जसे सत्याग्रह केले, संघटना बांधली, सशस्त्र चळवळ केली तशीच व त्याच भावनेने पत्रकारिताही केली. ज्या काळात अनंतराव पत्रकार झाले त्या काळात वृत्तपत्रविद्या शिकवणारी महाविद्यालये, विद्यापीठे नव्हती. वाचकांत लोकप्रिय होण्यासाठी कोणत्या युक्त्या वापराव्यात याचा विचाराच त्यावेळी आवश्यक नव्हता. वृत्तपत्रे संपादकांच्या अग्रलेखासाठी व त्याच्या विचारासाठी मुख्यतः विकत घेतली जात. मराठीत अशा विचारपत्रांची समृद्ध परंपरा आहे. वाघमारे-भालेरावांचा 'मराठवाडा' हे या परंपरेतील शेवटचे वृत्तपत्र होते. वृत्तपत्रे हा तेव्हा जीवननिष्ठेचा भाग होता, तो किफायतशीर धंदा पुढच्या काळात झाला. लोकरंजन आणि त्यासाठी लोकानुनय हे मार्ग नंतर शोधले गेले. आकर्षक छपाई आणि ग्राहकांना लोभवणारी आधुनिक विक्रयकला यांचा आश्रय नंतर घेण्यात आला. या नव्या वातावरणाशी जुळवून घेणे भालेरावांच्या पत्रकारितेला शक्यच नव्हते. ते आपले जुन्याच मूल्यांना चिकटून बसले होते. सत्तेतील एका उच्चपदस्थाने दिवाळीनिमित्त पत्रकारांना सुटकेसेस भेट दिल्या. अनंतराव ती घ्यायला तर गेलेच नव्हते; परंतु नंतर ती त्यांच्या घरी पाठवण्यात आली तेव्हा त्यांनी ती सरळ परत पाठवली.

अनंतरावांचे व्यक्तित्व हे एक गंमतीचे रसायन होते. वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि संतांची वाणी त्यांच्या मनोभूमिकेचा एक भागच झाली होती. पण वारकऱ्यांचेही कर्मकांड त्यांना मान्य नव्हते. अनंतराव कधी देवळात गेले नाहीत, कधी देवाच्या मूर्तीसमोर भक्तिभावाने त्यांनी हात जोडले नाहीत. ना. सी. फडके यांनी हैदराबाद लढ्याच्या पार्श्वभूमीवर एक कादंबरी लिहिण्याचा विचार केला होता. ते हैदराबादला आले असताना त्यांनी अनंतरावांना बोलावून घेतले आणि त्यांच्याशी बातचीत करून त्यांच्या लढ्यातील आठवणी जाणून घेतल्या. पुढे फडक्यांनी लिहिलेल्या

'सितारा मंजील' या कादंबरीचे अनंतराव एक नायक आहेत. पण त्यात फक्त अनंतरावांचे नाव आहे. बाकी नायक खास फडक्यांच्या कादंबरीत शोभेल असाच आहे. फडक्यांच्या कादंबरीतंत्रात बसणारा नायक अनंतरावांच्यात सापडणे अवघड होते.

मार्क्स आणि गांधी या दोन्हींचेही अनुयायी बनू पाहणाऱ्या गोविंदभाई श्रॉफांबरोबर अनंतरावांची वैचारिक बैठक तयार झाली होती. परंतु तात्त्विक चर्चा आणि लांबलचक ठराव यांच्यात अनंतरावांना फारसा रस नव्हता. त्यांना रस होता माणसांत. माणसांच्या प्रश्नांत. त्यांच्या सुखदुःखात. ते माणसांतच रमत. माणसांचा माणूस असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. आपल्या वाट्याला जे काम आले, जी भूमिका आली ती समरसून त्यांनी केली. अनंतराव हे एक ध्येयनिष्ठ पत्रकार आहेत एवढी गोष्ट मराठवाड्याबाहेर सर्वांना माहीत होती. पण त्यांच्या कर्तृत्वाचा आणि अनुभवाचा लाभ व्यापक क्षेत्रात लोकांना उपलब्ध करून द्यावा अशी कोणी योजना केली नाही. तेवढी सवडच अनंतरावांच्या ज्येष्ठ मित्रांना लाभू शकली नाही.

अनंतराव आता वयाने नसले तरी मायस्थेनियाने थकत चालले होते. मायस्थेनियामुळे शरीराच्या इतर रक्तवाहिन्या जशा बाधित होत होत्या तसेच हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या वाहिन्यांचेही होऊ शकत होते. काही वर्षांपूर्वी मुंबईत जेव्हा त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली तेव्हा एका डॉक्टरांनी 'एके दिवशी तुम्ही बिछान्यातच मरण पावलेले तुम्हाला आढळून येईल' असे सांगितले होते. रुग्णालयातही अनंतरावांची विनोदबुद्धी शाबूत होती. 'मी अचानक मरू शकेन, पण मी मेल्याचे मलाच कसे आढळून येईल?' असे त्यांनी उत्तर दिले होते.


मायस्थेनियाच्या जोडीला डोळ्यात काचबिंदू होण्याचा आजारही अनंतरावांच्या भेटीला आला. डोळ्याचे डॉक्टरसुद्धा आठ-दहा दिवसांनी येऊन भेटून जात. पण डोळ्यात आपल्याला जाणवणारी विकृती ही मायस्थेनियाचाच परिणाम असावी असे गृहीत धरल्यामुळे त्याबद्दल वेगळे उपचार झालेच नाहीत. जेव्हा काचबिंदू झाल्याचे लक्षात आले तेव्हा फार उशीर झाला होता. एक डोळा गमवावा लागला होता.

५ जून १९९० रोजी कविवर्य कुसुमाग्रजांच्या हस्ते अनंतरावांचा नागरी सत्कार करण्यात आला. अनंतरावांचे मराठवाडाभरातील सहकारी, मित्र आणि चाहते या कार्यक्रमाला हजर होते. आपल्या भाषणात कुसुमाग्रजांनी अतिशय समर्पक शब्दांत अनंतरावांच्या जीवनाचे वर्णन केले. "अनंत भालेराव हे वयाने तीर्थरूप आहेत; पण कर्तृत्वाने ते एक तीर्थक्षेत्र आहेत. ते केवळ एक थोर पत्रकार नाहीत तर समाजातील शिवशक्तीचे संवर्धन करणारे फार मोठे आधारस्तंभ आहेत. भालेरावांसारखी माणसे पुरुषार्थाची उपासना करतात. त्यांच्या नजरा हारासाठी शोध घेत नाही. सुगंध देणे हा फुलांचा, वाहणे हा नदीचा आणि प्रकाश देणे हा चांदण्याचा स्वभाव आहे. त्याचप्रमाणे निष्काम कर्मयोग हा अनंतरावांसारख्या माणसांचा स्वभाव असतो. प्रकृतीने थोडेसे थकलेले अनंतराव आजही 'कावड' घालतच आहेत. प्रकृतीची साथ असेल तसे ते लिहित राहतील. सामाजिक न्यायाच्या लढ्याला त्यांनी आपले आशीर्वाद द्यावेत. कोणत्याही उद्दिष्टासाठी लढणाऱ्या नवागत तरुणांना त्यांच्या आशीर्वादाने प्रेरणा आणि बळ मिळणार आहे.'

२५ ऑक्टोबर १९९१ रोजी अनंतरावांना हृदयविकाराचा झटका आला. औरंगाबादच्याच एका रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले. तेथेच आणखी एक हृदयविकाराचा झटका येऊन २७ ऑक्टोबर १९९१ रोजी त्यांचे निधन झाले.

अनंतरावांच्या अंत्ययात्रेत विविध राजकीय विचार असणारे मराठवाड्यातील शेकडो कार्यकर्ते आणि त्यांचे चाहते हजर होते. जीवनाच्या विविध क्षेत्रांतली सामान्य माणसेही त्या यात्रेत सामील झाली होती. हा त्यांच्यासाठी उपचार नव्हता. अनंतरावांना त्या सर्वांच्या आयुष्यातही काही स्थान होते. जीवनाच्या संघर्षात आपले सुख-दुःख सहानुभूतीने ऐकून घेणारा आणि ते जाणून घेणारा आपला एक सुहृद, आपण आज गमावला आहे अशी त्यांची भावना होती. सर्वात पुढे शिऊरहून आलेली काही भजनी मंडळी होती. टाळ-मृदंगाच्या घोषात ते 'आम्ही जातो अमुच्या गावा, आमचा रामराम घ्यावा' हा तुकोबाचा अभंग आळवत होते. जणू अनंतरावांच्या मनातली अंतकाळीची भावनाच ते व्यक्त करीत होते.

अनंतरावांच्या मृत्यूबरोबर मराठी पत्रकारितेतील ध्येयनिष्ठ पत्रकारितेचे एक युग संपले.



## न्या. नरेन्द्र पुरुषोत्तम चपळगावकर

मुंबई उच्च न्यायालयाचे भूतपूर्व न्यायाधीश.
समाजेतिहास, मराठी वाङ्मय, कायदा आणि राज्यशास्त्र यांचे अभ्यासक.
पुण्याच्या आयएलएस विधि महाविद्यालयात फोर्ड अध्यासनाचे मानद प्राध्यापक व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे गुणश्री प्राध्यापक म्हणून गौरव.
'कर्मयोगी संन्यासी' महाराष्ट्र फाऊंडेशनचे पारितोषिक.
'राज्यघटनेचे अर्धशतक' महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पारितोषिक.
'विधिमंडळे आणि न्यायसंस्था' राज्यशासनाचा बॅ. नाथ पै पुरस्कार.
'तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ' महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पारितोषिक.
माजलगाव येथे भरलेल्या २६व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष - २००४.

१३, जयनगर, औरंगाबाद ४३१ ००५.
दूरध्वनी : ०२४० - २३३११६६